Keshav, of course, has not very precisely stated the real intention of the journey. But apparently, in his opinion,[51] it was to save the Marhattha kingdom in the Karnatak from the hands of the Great Moghul. The disorder and confusion then prevalent there and especially the serious illness of Haraji Rajah may have been the immediate causes for the hasty departure. But the news recorded in the Diary of Fort St. George[52] on 14th November 1689, i e immediately after the arrival of Rajaram at Jinji, says: "Wee haveing certaine advice that Rama Rajah King of the Moorattaes is come privately from His Kingdome of Punnarree, to the Chingye country leaving his Uncle (?nephew Shahu) in charge of the Kingdome[53] and family (?Yesubai) to manage to Warr against the Mugull, his designe of comeing hither being reported to divert the Mugull's army from thence and joine with severall Gentue Naigues and raise a considerable army to retake the Gulcondah and Vizapore Kingdomes, wch. there is great probability of, both places being at present very weakly guarded...". This note of a very contemporary and early version is quite complete and appears to give the real intention of the journey because it is corroborated by the letters[54] issued by Rajaram later on

51 Srg. I – 45, Srg. IV – 61 and 67-8.

52 Diary and Consultation Book of 1639, R. Ft. St. G., p. 92.

53 There is no evidence to show that the Marhattha Capital was removed from Rayagad at this time.

54 Vide note note 18 supra.

It, thus, leaves no doubt about the chief aim of the journey, which was to deliver up the two Deccani Muslim kingdoms from the hands of the Moghul with the help of the Karnatak Chiefs. This object reminds us that the Hindu King and his Ministers had adopted merely a protective measure, and was not at all out for war against the Muslim faith. Though Aurangzeb's overzeal for his religious sentiments, especially in his oldage, had gone to encourage some of his officers, to some extent, to cause inroads on the Hindu religion and temples, the Hindu King showed great conciliation and considerable tolerance towards the Muslim faith even at a moment when his own kingdom was at stake and particularly when direct provocation was being offered by certain Muslim officials. Perhaps, it is the misapprehension of both the chroniclers of the early 19th century and later Historians which is responsible for tracing religious prejudices in the great Marhattha struggle for independence at the close of the 17th century.

Lastly, before I conclude, I must thank Mr. Samb Murthi Row of the Saraswati Mahal Library for his kindly supplying me with a copy of the manuscript, my friends Prof. Potdar and Mr. G. B. Nare for their help in the work of editing the Sanskrit text and its translation, and Mr. Dattoba Gupte for drawing maps, without which help it would not have been possible for me to place this humble service in its present form at the disposal of the readers and scholars of the Marhattha History.

Vijayadashami,
20th October 1931,
678, Budhawar, Poona.

*V. S. Bendrey.*

and Gadag–Lakshmishwar route. Roughly, the route may be determined as Panhala, Krishna, Gokak Saundatti, Gadag–Lakshmishwar, Hirra on the Tungabhadra, Bednur, Ambur, Vellore and Jinji.

Keshav, of course, has not very precisely stated the real intention of the journey. But apparently, in his opinion,[51] it was to save the Marhattha kingdom in the Karnatak from the hands of the Great Moghul. The disorder and confusion then prevalent there and especially the serious illness of Haraji Rajah may have been the immediate causes for the hasty departure. But the news recorded in the Diary of Fort St. George[52] on 14th November 1689, i e immediately after the arrival of Rajaram at Jinji, says: "Wee haveing certaine advice that Rama Rajah King of the Moorattaes is come privately from His Kingdome of Punnarree, to the Chingye country leaving his Uncle (?nephew Shahu) in charge of the Kingdome[53] and family (?Yesubai) to manage to Warr against the Mugull, his designe of comeing hither being reported to divert the Mugull's army from thence and joine with severall Gentue Naigues and raise a considerable army to retake the Gulcondah and Vizapore Kingdomes, wch. there is great probability of, both places being at present very weakly guarded...". This note of a very contemporary and early version is quite complete and appears to give the real intention of the journey because it is corroborated by the letters[54] issued by Rajaram later on

51 Srg. I – 45, Srg. IV – 61 and 67-8.

52 Diary and Consultation Book of 1639, R. Ft. St. G., p. 92.

53 There is no evidence to show that the Marhattha Capital was removed from Rayagad at this time.

54 Vide note note 18 supra.

It, thus, leaves no doubt about the chief aim of the journey, which was to deliver up the two Deccani Muslim kingdoms from the hands of the Moghul with the help of the Karnatak Chiefs. This object reminds us that the Hindu King and his Ministers had adopted merely a protective measure, and was not at all out for war against the Muslim faith. Though Aurangzeb's overzeal for his religious sentiments, especially in his oldage, had gone to encourage some of his officers, to some extent, to cause inroads on the Hindu religion and temples, the Hindu King showed great conciliation and considerable tolerance towards the Muslim faith even at a moment when his own kingdom was at stake and particularly when direct provocation was being offered by certain Muslim officials. Perhaps, it is the misapprehension of both the chroniclers of the early 19th century and later Historians which is responsible for tracing religious prejudices in the great Marhattha struggle for independence at the close of the 17th century.

Lastly, before I conclude, I must thank Mr. Samb Murthi Row of the Saraswati Mahal Library for his kindly supplying me with a copy of the manuscript, my friends Prof. Potdar and Mr. G. B. Nare for their help in the work of editing the Sanskrit text and its translation, and Mr. Dattoba Gupte for drawing maps, without which help it would not have been possible for me to place this humble service in its present form at the disposal of the readers and scholars of the Marhattha History.

Vijayadashami,
20th October 1931,
678, Budhawar, Poona.

*V. S. Bendrey.*

ॐ

केशवकविकृत

# छत्रपति राजाराम महाराज यांचें चरित्र

## समालोचन

### कवि व काव्य

तंजावरचा सर्फोजी महाराजांच्या सरस्वती महालांतील हस्तलिखित-ग्रंथसमुच्चय महाराष्ट्रीयांस प्रसिद्ध आहेच. या ग्रंथालयांतील संस्कृत विभागाचे सूचीग्रंथ संभाजीविषयक साधनांच्या शोधार्थ तपासले. त्यावेळीं वरील चरित्र आढळलें. या संस्कृत विभागाचे दोन सूचीग्रंथ तयार झाले आहेत. एक इसवी सन १८८०त छापला असून तो डॉ. ए. सी. बर्नेल यानीं तयार केला होता. दुसरा व विस्तृत असा सूचीग्रंथ पी. पी. एस्. शास्त्री यांनीं रचला असून तो खंडशः प्रसिद्ध झाला आहे. या ग्रंथाच्या आठव्या खंडांत पृष्ठ ३२६३ ते ३२६५वर या हस्तलिखित चरित्राचें सविस्तर वर्णन दिलें आहे. डॉ. बर्नेलनेंहि या ग्रंथाचा उल्लेख आपल्या सूचीच्या १६१व्या पृष्ठावर क्रमांक ७६पुढें केलेला आहे. परंतु डॉ. बर्नेलनें या ग्रंथाची गणना रामायणांत करून "रामाभिषेकः" या नांवाखालीं त्याचें रूपवर्णन दिलें आहे. त्यामुळें महाराष्ट्रीय संशोधकांची थोडी दिशाभूल झाली व गु. राजवाडे व माझे मित्र प्रसिद्ध शोधक कै. सदाशिव महादेव दिवेकर यांच्या

दृष्टिक्षेपांतून हा ग्रंथ सुटला. मात्र इ. सन १९३०त छापलेल्या शास्त्री यांच्या नवीन बृहत्सूचींत या ग्रंथाचें वर्णन "राजारामचरितम्" या मथळ्याखालीं आल्यानें महाराष्ट्राच्या इतिहासास त्याचा उपयोग करून देण्याची संधि मला लाभत आहे.

नवीन बृहत्सूचींतील काव्यग्रंथविभागाखालीं अनुक्रमांक ४२२९पुढें या ग्रंथाचें वर्णन दिलें आहे. त्यांतील महत्वाचा भाग असा: "हा ग्रंथ ९,$\frac{७}{१०}$ × ४$\frac{१}{२}$ इंच लांबीरुंदीचा आहे. लिखाण कागदावर असून उजवे बाजूस आहे. एकंदर पृष्ठसंख्या ३४ असून प्रत्येक पृष्ठावर सहा ते आठ ओळी लिहिलेल्या आहेत." बहुतेक सर्व ग्रंथ अनुष्टुपांतच रचला असल्यामुळें प्रत्येक ओळीची अक्षरसंख्या सोळा आहे हें निराळें सांगण्याची जरूर नाहीं. "लेखनलिपि देवनागरी असून ग्रंथिका ३०० आहेत. या काव्याचे एकंदर पांच सर्ग असून काव्य पूर्ण आहे. मूळ हस्तलिखित प्रत चांगल्या स्थितींत आहे. मात्र या ग्रंथाची तेथें एकच प्रत असून ती अद्यापि अप्रकाशित आहे. केशव पंडित हा या ग्रंथाचा कर्ता आहे."

हें हस्तलिखित खास केशव पंडिताचा मूलग्रंथ आहे किंवा नकल आहे हें समजण्यास खात्रीचें गमक नाहीं. तो नकल आहे असें अनुमान काढण्यास मात्र जागा आहे. ग्रंथाचें लेखन पुष्कळच बिनचुक असल्यानें हा ग्रंथ मूळच असावा असा भास होतो. परंतु या प्रतींतील देशदेशांतराप्रमाणें उच्चारभेदानें सहज हातून घडणाऱ्या चुकांवरून ही प्रत नकल असावी असें मानण्यास जागा आहे. "काल" "कलि" "भूपाल" "महीपाल" इत्यादि सामान्य शब्द लिहितांना "ल" व "ळ" असे दोन्हीहि वर्ण योजले आहेत. सुमारें ७३ जागीं "ल" चे ऐवजीं "ळ" लिहिला आहे. नकलकाराशिवाय ही चूक घडणार नाहीं. ग्रंथकार कोणतीहि प्रचलित वर्णयोजना करण्यास अधिकारी असतोच. त्याचप्रमाणें

कमी अधिक कानामात्रा देण्यांत व अक्षरलोपादि ज्या चुका झाल्या आहेत त्या सुमारें १५ असून त्यावरूनहि ही प्रत नकल आहे असेंच अनुमान निघतें. तसेंच कर्नाटक हा शब्द "कर्नाटक" व "कर्णाटक" अशा दोन्हीहि तऱ्हेनें लिहिला आहे. मात्र ही प्रत व्याकरण व इतर शास्त्रीय दृष्टीनें बरीच शुद्ध आहे. अवग्रहाचा सात ठिकाणीं केलेला लोप वर्ज केला — जुन्या हस्तलिखितांत अवग्रहाचा नेहमींच लोप केलेला आढळतो — तर फक्त तेराच जागीं व्याकरणदृष्ट्या क्षुल्लक चुका झालेल्या दृष्टीस पडतात व अवघ्या तीनच ठिकाणीं पाठांतर दिलें आहे. सारांश, नकलकाराच्या उपरिनिर्दिष्ट चुका अगदीं अल्प आहेत. अर्थात् या नकलेंत मुळांतील महत्त्व कायम राहिल्यास नवल नाहीं. तसेंच प्रत्यक्ष घडलेल्या ज्ञात इतिहासावरून कांहीं ठिकाणीं शब्दयोजना सहज बदलतां आली असती; परंतु ती बदलण्याचा ज्याअर्थीं प्रयत्न झाल्याचें दिसत नाहीं त्याअर्थीं प्रस्तुतची प्रतहि समकालीन असावी असें अनुमान करण्यास जागा आहे. ग्रंथ पूर्ण आहेसा वाटतो. परंतु श्लोकसंख्येला अनुक्रम नाहीं. जेथें संख्यांक दिला आहे तेथें तो अव्यवस्थितपणें दिलेला आहे.

केशव कवीची माहिती इतरत्र उपलब्ध नाहीं. त्याचें आणखी एखादें काव्यहि अद्यापि आढळण्यांत आलें नाहीं. परंतु त्यानेंच आपली जी कांहीं माहिती काव्याच्या उपोद्घातांत दिली आहे तीवरून हा कवि राजाराम महाराजांचा समकालीन होता यांत शंका राहत नाहीं. ग्रंथारंभीं रामवाल्मिकींना नमस्कार केल्यानंतर "ज्या क्षेत्रांत श्रीमान् परशुरामाचें पूजन केलें जातें त्या क्षेत्रांतील रहिवासी, विधिज्ञ, सत्यवादी, शुचिर्भूत, शास्त्रप्रविण, षट्कर्म करणारा, उत्तम बुद्धिमान्, भगवद्भक्तिपरायण, प्राणिमात्रांच्या हितांत रत असणारा, केवळ न्यायानेंच मिळविलेल्या धनावर आपल्या कुटुंबाचें परिपोषण करणारा असा ब्राह्मण" असें त्यांनीं आपलें वर्णन केलें आहे. यावरून कवि कोंकणांत परशुराम क्षेत्रीं म्हणजे चिपळूण किंवा त्याच्या आसपासच्या एखाद्या गांवीं

रहाणारा असला पाहिजे असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं. सन १६८९च्या सप्टेंबरांतील नवरात्रमहोत्सवांत पाराशर म्हणजे पन्हाळगडावर राजारामानें जें बिल्वशाखार्चन केलें त्यासाठीं "विद्वान केशवानें ब्राम्हणादिकांना निमंत्रण दिल्याचा" उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणें विजयादशमीच्या मुहूर्तावर राजारामानें कर्नाटकास जाण्याकरितां प्रस्थान करतेसमयीं म्हणजे १४ सप्टेंबर रोजीं 'स्वस्त्ययन' गाण्यांत "केशवादि विशेषत: होते" असें म्हटलें आहे. यावरून हा केशव कवि राजारामाचा समकालीन असावा यांत शंका नाहीं व तें सिद्ध करण्यास अधिक पुराव्याची अपेक्षाहि धरण्याचें कारण नाहीं. परंतु ग्रंथरचनेचा काल चरित्रांतच दिला असल्यानें कवीच्या व काव्याच्या समकालीनत्वाबद्दल अगदीं विपुल असा पुरावा उपलब्ध आहे. "शुक्लवर्षे माघमासे शुक्लपक्षे शनेर्दिने चतुर्थ्यां माविवृत्तांतं राजारामजयावहं" "तनुते" "पंडित: केशवाभिध:" असा सुरवातीस उल्लेख केला आहे. हा ग्रंथलेखनाचा काल इंग्रजी तारखेंत सांगावयाचा तर तो ४ जानेवारी १६९० येतो. या कालांतील तपशिलांत खरेजंत्रीप्रमाणें तिथिवारांचा पूर्ण मेळ बसत आहे. प्रसंगनिर्देशावरूनहि लेखनाचा वरील कालच कायम ठरतो. कवीला १६८९तील नवंबरच्या सुरवातीला रायगड मोगलांनीं घेतला हें वृत्त ग्रंथसमाप्तीपर्यंत समजलें नव्हतें असें दिसतें. यावरून हा कवि पन्हाळ्याजवळ आसपास राहिला असावा किंवा बहुश: कर्नाटकांत गेला असावा असें वाटतें व हा ग्रंथ महाराष्ट्रांतील अपयशी बातम्या त्याच्या कानावर जाण्यापूर्वीच संपूर्ण झाला असावा.

त्रिपाठ्यांचा एक केशव नांवाचा पुरोहित शिवाजीच्या पदरीं होता. तो महाराजांस रामायण महाभारत सांगत असे. शिवाजीमहाराजानंतर संभाजीसहि त्यानें रामायण महाभारत सांगितलें व त्याबद्दल त्याला इ. स. १६८४त इनाम मिळाल्याचा उल्लेख आहे. नंतर त्याच्या मुलानें आपला बाप राजाराम महाराजांबरोबर जिंजीस गेल्याचें व तेथें गेल्यावर निवर्तल्याचें

वर्तमान सांगणारीं व नव्या सनदा करून मागणारीं पत्रें लिहिलीं त्यांतील एक दोन प्रसिद्ध झालींहि आहेत. आतां हा केशव व प्रस्तुत काव्याचा लेखक हे एकच किंवा नाहीं हें सांगण्यास कांहींच साधन नाहीं. परंतु नवरात्रांत कवीनें घेतलेला पुढाकार व बारकाईची माहिती याचा विचार केला तर या केशव पुरोहितानेंच हें चरित्र लिहिणें शक्य दिसतें. कदाचित् हा पुरोहित जिंजीस जातांच मृत्यू पावला असावा. त्यामुळें या ग्रंथांत याच कालांत घडलेली व मागाहून समजलेली माहिती दिली गेली नसावी. परंतु आधाराशिवाय तर्क करण्यापलीकडे अधिक मजल मारतां येणार नाहीं.

काव्य या दृष्टीनें हा ग्रंथ फारसा महत्वाचा ठरेल असें मला वाटत नाहीं. भाषा व रचना साधी सरळ व सोपी आहे. लेखन तत्कालीन पद्धतिप्रमाणें सुरवातीस कथापुराणांच्या थाटाचें झालें असून विवेचनांत स्वप्नवृत्तांत व भविष्यकथनाचाच मार्ग स्वीकारला आहे. जर कवीनें वृत्तबद्ध विवेचन करण्याची खटपट केली नसती तर हा एक निर्दोष व उत्तम असा ऐतिहासिक गद्य ग्रंथ ठरला असता. या काव्यांत अलंकार उपमा वगैरे नाहींत. एखादी कल्पनेची भरारी आढळलीच तर ती राजाराम विष्णूचा चवथा रामावतार किंवा औरंगझेब हा पुराणांत उल्लेखिलेला कुभांड राक्षस ठरविण्यापलीकडे फारशी गेलेली नाहीं. प्रथम सर्गाच्या शेवटीं "केशव राजारामाच्या जयाचें व प्रधानांच्या प्रभावाचें वर्णन अनेक पद्यांत करील" अशी कवीनें थोडीशी आत्मप्रशंसा केली आहे. आत्मप्रशंसा म्हणण्याचें कारण इतकेंच कीं, या सबंध काव्यांत अनुष्टुप छंदच योजला आहे. फक्त प्रथम सर्गांत एक आर्या व एक शार्दूलविक्रीडित, दुसऱ्या सर्गाचे शेवटीं एक पुष्पिताग्रा, तृतीयाचे शेवटीं एक इंद्रवज्रा, चतुर्थाचे शेवटीं उपेंद्रवज्रा व पंचमाचे शेवटीं शार्दूलविक्रीडित इतकीच काय ती वृत्तभिन्नता या काव्यांत आढळते. मात्र यांतील सुरवातीची "जयति रघुवंशतिलकः०।" ही आर्या कांहीं रामलहरीसारख्या स्तोत्रांतहि आढळते. यावरून कदाचित् असें अनुमान काढतां येईल कीं,

शेवटीं एखादा भिन्नवृत्ताचा श्लोक घालून या काव्याला महाकाव्याचें स्वरूप देण्याचा कवीचा विचार असावा. मात्र कवीच्या वरील गुणदोषांमुळें आपणांस सन १६८९ सालांतील कांहीं प्रसंगांची सविस्तर निर्दोष व विश्वसनीय अशी नवीन माहिती मिळाली आहे. कदाचित् या ग्रंथाची काव्य या दृष्टीनें जरी प्रशंसा करितां आली नाहीं तरी इतिहासग्रंथ या दृष्टीनें याची किंमत बहुमोल ठरेल यांत मुळींच संदेह नाहीं.

## पहिला सर्ग

या काव्याचे पांच सर्ग असून सुमारें २७५ श्लोक आहेत. पहिल्या सर्गांत कवीनें ग्रंथलेखनाचें प्रयोजन कोणतें याचा खुलासा केला आहे. "संभाजी महाराजांनीं यमधर्म स्वीकारल्याचें म्हणजे ते मारले गेल्याचें वर्तमान ऐकून, व या घोर कलियुगांत महान् म्लेंच्छांचा विजय होत असून दुरात्मा म्लेंच्छराजानें सर्वत्र वर्णाश्रमधर्माचा उच्छेद आणि सर्व धर्मक्षेत्रांचा नाश केलेला आहे असें पाहून आतां लोककल्याणाचा मार्ग कोणता म्हणून चिंता पडली तेव्हां शंकरांनीं सर्व लोकांच्या हितासाठीं व भक्तांवर अनुग्रह करण्याकरितां हा भाविवृत्तांत कवीच्या स्वप्नांत येऊन सांगितला" असें म्हटलें आहे. हाच भाग कवीनें भार्गव-शंकरांच्या संवादानें पुन्हा सविस्तर सांगितला आहे. त्यात भार्गवशिष्य भार्गवाचा शंकराला निरोप देतांना विनंती करतो कीं, "हे स्वामिन्, सह्याचलावर स्थापन केलेला परशु सांप्रत सार्वभौमपदाचा अभिमान धरून आलेल्या कलिपुरुषानें उत्सादित केला आहे; तरी त्याचें दमन करण्यासाठीं कांहीं उपाय योजा." त्यावरून शंकरांनीं राजारामाचा भाविवृत्तांत कथन करून भार्गवाला अभय दिलें. हा प्रकार नारदांनीं पाहिला व तो कवीनें त्याचे तोंडून सांगविला.

नंतर या विनंतीस उत्तर म्हणून शंकरांनीं औरंगझेब हा पूर्वीचा कुमांड राक्षस असून त्याच्या तपावर संतुष्ट होऊन त्याला सार्वभौम

केला आहे असें सांगितलें. मात्र "तो जेव्हां गर्वानें भार्गवाश्रमाचा नाश करील व ब्राम्हण्यानें परिपूर्ण असें रामराज्य घेण्याची इच्छा धरील तेव्हां तो पराभव पावेल" अशी अट घातल्याचेंहि सांगितलें. हा काल आतां समीप आला असून भोसलेवंशांत राजाराम म्हणून विष्णूचा चवथा रामावतार होईल व तो या कुलांडाचा गर्व हरण करील असें भविष्य सांगितलें. परंतु नारदानें प्रश्न केला कीं, राजारामाचें राज्य औरंगझेबानें हरण केलें आहे; तर तें त्याचें राज्य त्याला परत कसें मिळेल ? तेव्हां शंकरांनीं प्रत्युत्तर दिलें कीं, राजाराम नीळकंठ मोरेश्वराला संमत असलेल्या प्रल्हादपंताच्या सल्यावरून महाराष्ट्रांतील कारभार रामचंद्रपंत आमात्याकडे सोपवून प्रल्हादादि ब्राम्हण व बाहिरजी घोरपड्यांसह चंदीस जाईल व तेथें तो आपलें साम्राज्य स्थापन करील. तेव्हां पुन्हां नारदानें शंका घेतली कीं, शत्रूनें घेरलेल्या व पादाक्रांत केलेल्या त्या राज्याचें संरक्षण रामचंद्रपंत साधनसामुग्रीशिवाय कसें करूं शकेल. त्याचेंहि शंकरानें समाधान केलें. शंकर म्हणाले, "राजारामाचें तें राज्य, अनेक डोंगरी किल्ले, म्लेंच्छराजांनीं घेतलेले कित्येक गिरिदुर्ग व त्याचप्रमाणें म्लेंच्छराजांनीं कैद केलेलें व पळवून लावलेलें सैन्य सत्यवचनानेंच तो लवकर आपल्या ताब्यांत घेईल. नंतर आपल्या सैन्यानिशीं म्लेंच्छराजाच्या सेनापतीला जिंकील व म्लेंच्छराजानें घेतलेल्या राजारामाच्या सर्व किल्ल्यांवर पुन्हां आपला अधिकार स्थापन करील. राजा हें ऐकून संतोष पावेल व स्वदेशांतील व कर्नाटकांतील सैन्यानिशीं येऊन म्लेंच्छराजाचा पराभव करील. नंतर तो त्या सचिवोत्तमाचा सन्मान करून आपल्या स्त्रीपुत्रांसह व प्रधानमंत्र्यांसह सर्व किल्ल्यांत श्रेष्ठ अशा रायगडावरील उत्तम सिंहासनावर आरूढ होऊन श्रीरामाप्रमाणें पृथ्वीचें पालन करील."

सारांश, कवीनें आपल्या विषयाची या प्रथम सर्गांत प्रस्तावना केली आहे. या प्रस्तावनेंतील ऐतिहासिक भागाचे कवि पुढील चार सर्गांत विस्तारानें स्पष्टीकरण करणार असल्यानें त्याचा विचार त्या त्या सर्गाखालीं

येईल. विशेषत: या सर्गांत तत्कालीन परिस्थितीचें वर्णन आलें असल्यानें त्याचेंच येथें विवरण करूं. संभाजीच्या मृत्यूनंतर कोंकणांत मोंगलांनीं घाला करून जाऊन परशुराम क्षेत्र लुटलें. परंतु यापूर्वीची कांहींच हकीकत कवीनें दिलेली नाहीं. मात्र संभाजीनें यमधर्म स्वीकारल्यानें आतां कसें होईल या साधारण पौरजनांत उत्पन्न झालेल्या चिंतेवरून संभाजीवर कोंकणांतील तरी जनता दिलदिलासा ठेवून होती ही गोष्ट निश्चित ठरते. त्याचप्रमाणें परशुराम क्षेत्र लुटणें व रामराज्य घेण्याची इच्छा करणें हीं दोनच कारणें औरंगजेबाचा नाश करण्यास पुरेशीं आहेत असें मानण्यांतहि हीं दोन्हींहि कारणें नुकतींच घडल्याचें ध्वनित होतें. जेधे शकावली व इतर तत्कालीन साधनांवरून हा प्रत्यक्ष अनुभवून सांगितलेला वृत्तांत खरा ठरतो. परंतु कवीनें शेवटीं राजाराम चंदीहून परत येऊन औरंगझेबाचा पराभव करून "रायगडावरील सिंहासनावर पुत्रपौत्रादिकांसह आरूढ होऊन राज्य करील" म्हणून ज लिहिलें आहे तें सर्व काल्पनिक असल्यानें चुकीचें ठरल्यास नवल नाहीं. परंतु या उल्लेखावरून कवीला रायगडास वेढा पडल्याचें व विशेषत: रायगड मोंगलांनीं घेतल्याचें माहित नसावें हेंहि सिद्ध होतें. रायगडाला वेढा घातला ही गोष्ट जर त्याला माहित असती तर त्यानें तसा उल्लेख केला नसता. यावरून कवि महाराष्ट्रांतून कर्नाटकांत गेला असावा व ज्या अर्थी कर्नाटकांतील शेवटपर्यंतची हकीकत तो सविस्तर व बारिकसारिक तपशिलासह देतो त्याअर्थी तो राजारामाच्याच तुकडीबरोबर कर्नाटकांत गेला असें अनुमान काढण्यास हरकत दिसत नाहीं. त्याचप्रमाणें या उल्लेखावरून कवीला राजारामाच्या गृहांतील माहिती नसावीसें दिसतें. राजारामाला अद्यापपर्यंत मूल झालें नव्हतें, असें असतांनासुद्धां पुत्रादिकांचा उल्लेख केला आहे. त्याशिवाय सबंध चरित्रांत शाहू येसूबाई ताराबाई वगैरेंचा उल्लेख नाहीं हीहि गोष्ट कवीचें राजगृहांतील खासगी माहितीबद्दलचें अज्ञान व्यक्त करते. मात्र कवीनें ज

"ऐश्वर्यानें युक्त असा तो राजा नंतर स्वदेशांतील व कर्नाटकांतील सैन्या-निशीं औरंगझेबाचा पराभव करील" म्हणून लिहिलें तें अगदीं वस्तुस्थितीला धरून आहे. राजारामास कर्नाटकांतील राजेरजवाडे येऊन मिळूं लागतांच त्यानें आपण कर्नाटकांतील सैन्य देशीं घेऊन येतो व स्वदेशांतील सैन्यानें या सैन्यास मिळून औरंगझेबावर चाल करून जावयाचें व नंतर कुत्बशाही व आदिल-शाही मोगलांपासून सोडवावयाची अशा अर्थाचीं पत्रें स्वदेशांतील सरदारांस १६८९च्या दिसेंबरानंतर लिहिलीं होतीं हें जेधे देशमुखांनीं या आज्ञेस ता. २२ मार्च १६९०रोजीं दिलेल्या प्रत्युत्तरांवरून स्पष्ट होत आहे. अर्थात कवि लिहितो त्याप्रमाणें बेत घाटत होता यांत शंका घेण्याचें कारण रहात नाहीं. कवीनें दिलेली भविष्यकालीन फलश्रुती जरी चुकली असली तरी बाकीची सर्व हकीकत वस्तुस्थितीला धरून व पूर्ण माहितीनें लिहिली आहे असें आढळून आल्यास नवल नाहीं. कवीनें औरंगझेबाला पूर्वीचा कुभांड किंवा कुलांड राक्षस असें म्हटलें आहे. माझे मित्र वे. चित्रावशास्त्री हे या कुभांडाचा उल्लेख प्रसिद्ध बाणासुराचा मंत्री म्हणून पुराणांतरीं आला असल्याचें सांगतात. परंतु कुभांडाचा औरंगझेबाशीं संबंध जोडण्यांत वैशिष्टय कोणतें हें जाणण्याकरितां कुभांडाची कथा चाळणें जरूर आहे. कालाभावीं हें करितां आलें नाहीं.

कवीनें रामचंद्रपंत "सत्यवचनानें" लोक मिळवील असें म्हटलें आहे तें फार महत्त्वाचें आहे. यावरूनहि तत्कालिन मराठी राज्याच्या परिस्थितीचा बोध होतो. औरंगझेबाच्या विरुद्ध लोक जमविणें अद्यापि तितकें कठीण झालें नव्हतें. लोकांचा मराठी राज्याच्या सामर्थ्यावर भरंवसा असल्याचें हें द्योतक आहे. सारांश, संभाजीकालीन परिस्थिति जितकी दुरावस्थेप्रत गेली होती म्हणून आतां समजली जाते तितकी ती गेलेली नव्हती हें मानण्यास हा समकालीन पुरावा आहे.

राजारामानें अद्यापि पराक्रम गाजविला नसता त्याला रामावतार कां लेखलें हाहि एक प्रश्न आहे. परंतु याचें विवरण पुढें तिसऱ्या सर्गांत करणें विशेष सोयीचें आहे.

**दुसरा सर्ग**

प्रथम सर्गांतील शिवनारदसंवादाचा थाट पुढील अध्यायांत क्वचितच दृष्टीस पडतो. कवीनें प्रसंगांचें सरळ वर्णन केलें आहे. दुसऱ्या सर्गांत रामचंद्रपंताच्या कारभाराचें वर्णन आहे. परंतु प्रारंभीं कर्नाटकांतीलहि कांहीं मजकूर आला आहे. कवि लिहितो कीं, राजा कर्नाटकास गेलेला ऐकून औरंगझेबानें आपलें सैन्य तिकडे रवाना केलें व तो खासाहि मागोमाग निघाला. रामचंद्रपंतावरहि कांहीं मुसलमान सरदार पाठविले व वीस मुक्काम चाऊन गेल्यावर त्याला राजारामाकडील वृत्तांत समजला कीं, कर्नाटकांतील राजे एक होऊन त्यांनीं महाराजाला विविधप्रकारचें धन आणि मोंगलांचा पाडाव करण्यास योग्य अशी सेना त्याच्या मदतीस दिली आहे. या मित्र राजांच्या मदतीनें राजाराम लढाई देण्यास येत आहे असें ऐकून म्लेंच्छ सेनापती घाबरला व कसाबसा सैन्यांतून निघून गेला. दरम्यान म्लेंच्छ सरदारांनीं देश उद्ध्वस्त करण्यास प्रारंभ केला. पवित्र क्षेत्रांना वेढा दिला व कांहीं किल्ले घेतले. मराठ्यांचे लोक शत्रूला जाऊन मिळूं लागले तेव्हां आपलें राज्य विस्कळित झालेलें पाहून रामचंद्रपंतानें परशुरामपंताचा सल्ला घेतला. परशुरामपंतानें सल्ला दिला कीं, "हें राज्य सकल म्लेंच्छांनीं व आपल्यांतील कांहीं दुष्ट लोकांनीं लुटलें आहे. आपले किल्ले आपल्याच लोकांनीं व शत्रूंनीं बळकाविले आहेत. सांप्रत विशाळगड मात्र तुमचा आहे. किल्ल्यावरील सामुग्रीहि परिपूर्ण आहे. परंतु सध्यां देश सर्व बाजूंनीं यवनांनीं व्यापिला आहे. स्वामी दूरदेशीं आहेत. खजिना विपुल आहे. तरी पराक्रम केला पाहिजे." हा सल्ला रामचंद्रपंताला आवडला व त्यानें संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांस निजामावर पाठविलें. रामचंद्रपंतहि खासा निघून महिमत-

गडावरून संगमेश्वराला गेला. तेथें मोगली सरदाराचा पराभव करून घोडे पाडाव केले. नंतर शृंगारपूरच्या बंडखोरांना कैद करून तो गुणवंतगडाला गेला. तो गड काबीज केला. तेथील शत्रूच्या लोकांस हांकून देऊन आपले लोक ठेवले. नंतर सुंदरगड वश केला. तेथून दंतपाटणच्या राजाला जिंकून तो पायदळासह वसंतदुर्गाला गेला.

इकडे निजामाला जिंकण्यासाठीं पाठविलेल्या संताजी घोरपड्यादिकांनीं प्रथम निजामाचा पराभव करून नंतर त्याचे हत्ती घोडे व पुष्कळ द्रव्य हरण केलें. तेव्हां अंगावर जखमा झालेला निजाम कसाबसा जीव बचावून करविरास पळून गेला. नंतर घोरपड्यादि मंडळी रामचंद्रपंताला जाऊन मिळाली. लोकहि येऊन त्यांना मिळूं लागले.

वरील तीन उल्लेखांतील पहिला उल्लेख कर्नाटकांतील हालचालींबद्दलचा असून अगदींच औपचारिक आहे. परंतु या उल्लेखावरून कांहीं प्रसंग व काल यांचा मेळ घालतां येतो. राजा कर्नाटकास गेलेला ऐकून यवनेश्वरानें सैन्य रवाना केलें व आपणहि मागोमाग निघाला असा उल्लेख आहे. हा उल्लेख झुल्फिकारखानाला १६८९च्या अखेरीस रायगड पडल्यानंतर चंदीवर पाठविला त्याचा असावा. कारण यवनेश्वर वीस मुक्काम चालून गेल्यावर कर्नाटकांतील राजे एक होऊन राजारामास सैन्य व द्रव्य यांसह सहाय्य करित असून राजाराम त्याच्या सरदाराबरोबर लढाई देण्यास जात आहे, तो सरदार हें ऐकून कचरला वगैरे हकिकत यवनेश्वराच्या कानावर गेल्याचें लिहिलें आहे. औरंगझेबाचा कोरगांवचा मुक्काम आक्टोबरा-नंतर हालला. तेव्हां हा सर्व मजकूर १६८९च्या नवंबर दिसेंबराच्या सुमाराचा आहे. परंतु ह्या प्रसंगाचा पुढील सर्गांत विचार होणार असल्यानें या दुसऱ्या सर्गाच्या मुख्य विषयाकडे वळतो.

दुसऱ्या सर्गाचा मुख्य विषय म्हणजे रामचंद्रपंताच्या महाराष्ट्रांतील हालचाली होत. राजाराम पन्हाळ्याहून कर्नाटकांत रवाना झाल्यानंतरचा

हा मजकूर आहे. "माझ्या हातीं सोपविलेलें हें राज्य" "माझें स्वामी-महाराज तर दूर देशीं आहेत" वगैरे रामचंद्रपंताच्या तोंडीं घातलेलीं वाक्यें व "महाराजानें तुमच्या हातीं सोपविलेलें हें राज्य" "स्वामी दूर देशीं आहेत" हीं परशुरामपंताचीं वाक्यें या सर्गांत वर्णिलेला मजकूर राजाराम पन्हाळा सोडून गेल्यानंतरचा आहे असें स्पष्ट करणारीं आहेत. अर्थात यावरून १४ सप्टेंबरनंतर रामचंद्रपंताच्या हातीं विशाळगड व त्यावरील भरपूर खजिना इतकींच काय तीं बाकी होतीं व अशा स्थितींत तो खासा विशाळगडावरून महिमतगडावर व तेथून संगमेश्वराला गेला. तेथें मोगली सरदाराचा पराभव करून घोडे पाडाव केले. तेथून शृंगारपूरच्या बंडखोरांना शासन देऊन व कैद करून गुणवंतगड काबीज केला व तेथें आपले लोक ठेवून सुंदरगड वश करून घेतला व दंतपाटणच्या राजाला जिंकून वसंतगडाला पायदळासह गेला. म्हणजे ज्यावेळीं पन्हाळ्याचा वेढा चालूच होता त्यावेळीं उत्तरेकडील सर्व दुर्घट असा डोंगराळ मुलुख रामचंद्रपंतानें आपल्या कबजांत आणल्यामुळें मोगली हल्ल्यांना बराच पायबंद बसला. साधारणत: हा सप्टेंबर-आक्टोबरचाच मजकूर असावा. हा मजकूर नवा आहे. ब्रिटिश व सरकार या दोघांनांहि याचा सुगावा असल्याचें दिसून येत नाहीं.

दरम्यान राजाराम कर्नाटकाकडे गेल्यानंतर संताजी घोरपडे धनाजी जाधव प्रभृति मंडळी निजामावर पाठविल्याचा उल्लेख आहे. संताजी वगैरे मंडळींनीं निजामाचा पराभव करून त्याचे हत्ती घोडे व पुष्कळ द्रव्य हरण केलें. निजाम जखमी होऊन करवीरास गेला. नंतर घोरपडे रामचंद्रपंताला येऊन मिळाले. ईश्वरदासच्या "प्रसंगावलींत" खान-इ-झमान फत्तेजंग खान यानें कोल्हापुराजवळ निकराची लढाई दिली. त्यांत तो व त्याचा मुलगा जखमी झाले. तेव्हां त्याच्यासाठीं डॉ. सेबास्टिअन पाठविल्याचा उल्लेख आहे तो याच प्रसंगाला धरून आहेसें वाटतें. वरील हकीकती-

वरून संताजी घोरपडे व धनाजी जाधव हे दोघेजण राजारामाबरोबर जिंजीस गेले नाहींत व चिटणिस आणि प्रो. सरकार हे ही सर्व मंडळी जिंजीस गेल्याचा जो उल्लेख करितात तो चुकीचा आहे असें यावरून सिद्ध होत आहे. रामचंद्रपंताच्या या मोहिमेचा भौगोलिकदृष्ट्या विचार केला तर त्यावरून रामचंद्रपंत डाव्या बाजूनें व संताजी धनाजी मंडळी उजव्या बाजूनें जाऊन विशाळगड संगमेश्वर पाटण कऱ्हाड यांमधील अत्यंत दुर्घट असा घाटमाथ्याचा मुलुख आपल्या कबजांत आणण्याकरितांच निघाले होते व ही मोहिम यशस्वी झाल्यानें मराठ्यांचा सुटलेला आसरा त्यांना पुन्हां प्राप्त झाला व सुरक्षितपणाचें एक महत्वाचें स्थान मिळालें. उलट ज्या शेख निजामानें व त्याच्या मुलानें संभाजीस पकडून देऊन व नंतरच्या कोंकणांतील मोहिमेंत जें यश मिळविलें होतें तें सर्व यावेळीं पुरा मोड झाल्यानें नाहींसें झालें व त्यांचा दराराहि मोडला. या विजयानें रामचंद्र-पंताकडे साहाजिकच पुन्हां लोक येऊन मिळूं लागले. बिकट प्रसंगींहि आश्रय करण्यास योग्य अशी जागा मिळाल्यानें पराक्रमेच्छु शूर मंडळी व सैन्य रामचंद्रपंताकडे आलीं. रामचंद्रपंतालाहि हुरूप आली व त्यानें कोणा "सिंह" नांवाच्या वीराला जिंकण्यासाठीं जाण्याचें ठरविलें. रायगडावर पाठविलेला राजा किशोरसिंहाचा तर हा उल्लेख नसेलना! बहुधः तोच असावा. कारण आक्टोबरच्या सुरवातीस रायगडच्या वेढ्याचा जोर होताच. वेढा उठविणें हें आवश्यक म्हणून ही तयारी असावी. परंतु ही मंडळी जाण्या-पूर्वीच किल्ला मोंगलांच्या हस्तगत झाला असावा. जर कवीनें "सिंह" या शब्दानें राजा किशोरसिंहाचेंच वर्णन केलें असेल तर वरील रामचंद्र-पंताची मोहीम १४ सप्टेंबर ते ३० आक्टोबर १६८९च्या दरम्यानची आहे हें ठरविण्यास एक चांगलेंच गमक मिळत आहे.

या सर्गात "मारेरायमुखांश्चोरान् शृंगारपूरनिवासिनः बंदिकृत्य" म्हणून उल्लेख आला आहे. परंतु हे शृंगारपूरनिवासी बंदींत घातले गेलेले

मारेरायमुखांभोरान् कोण याचा मला उलगडा झाला नाहीं. भोरच्या घोर नांवाच्या देशमुखांना उद्देशून हा उल्लेख आहे असें म्हणावें तर ते शृंगारपुरीं इतक्या दूर येऊन पुंडाई करितील असें वाटत नाहीं. बहुधः "मारेरायमुखान्" या ऐवजीं "मालेरायमुखान्" असें वाचलें तर या वाक्याचा अर्थ लागू शकतो. मालेराई व चोराचोरी करणाऱ्या शृंगारपूरच्या रहिवाश्यांना बंदींत घातलें असा जर सरळ अर्थ केला तर वस्तुस्थितीला धरूनच होईल. या सुमारास येथें मालेराई चालू असल्याचे उल्लेख सांवतवाडीकरांच्या एक दोन पत्रांत आढळतात. यावरून हा दुसराच अर्थ सयुक्तिक वाटतो.

**सर्ग तिसरा**

तिसऱ्या सर्गांत राजाराम प्रतापगडावरून पन्हाळ्यास आल्यानंतरचा मजकूर आहे. यांत विशेषतः नवरात्र महोत्सवाचें सविस्तर वर्णन दिलें आहे. परंतु प्रथमारंभीं कवीनें राजाराम महाराजांचें स्वभाववर्णन केलें आहे. विशेषतः जर हा भाग जरा चिकित्सापूर्वक वाचला तर कवीनें राजारामाला विष्णूचा चवथा रामावतार लेखतांना त्याच्या दृष्टिसमोर त्यास अवतारी ठरविण्यास कोणते गुण राजांत वास करीत होते व या गुणांच्या उच्चत्वावरून राजाराम अवतारी पुरुष बनला कीं तसें उल्लेखिण्यास कांहीं इतर कारणें असलीं पाहिजेत याचा बोध होतो. केशव लिहितो कीं, वीरव्रतांत अशिक्षित, सुकुमार, प्रवासी लोकांचे क्लेश न अनुभविलेला, मनूपासून आतांपर्यंत झालेल्या राजवंशांतील कोंवळा कोंब, सुरूप, राजलक्षणसंपन्न, प्रिय बोलणारा, लोकांचें प्रिय करणारा, जनतेचा प्राणरूप असलेला, तेजस्वी, महाविक्रम, केवळ त्याचा प्राणच असलेली अशी त्याची पट्टराणी, सिंहासनलालसेनें महिपालांचा पाडाव करणारा त्याचा पिता श्रीशिवछत्रपति व ज्वलज्वलन तेजाप्रमाणें चमकणारा भाऊ संभाजी यांच्या विरहित असलेला राजाराम जिकडे तिकडे प्रजा लुटली जात असतांना, सर्वत्र चोरचोरटे कंटकाप्रमाणें पसरले

असतांना व विपुल पावसानें मार्गांतील नद्या तुडुंब भरून गेल्या असतांना कर्नाटकांत कसा गेला असा प्रश्न कवीनें इंद्राच्या तोंडून नारदाला विचारला आहे.

राजाराम यावेळीं एकोणीसवीस वर्षांचा होता. कवीनें केलेल्या ह्या वर्णनाशीं चिटणिसादि मंडळीनें केलेलें वर्णन जुळतें व प्रवासांत शीघ्रगतीनें पळण्याची वेळ आली असतां बहिरजीच्या खांद्यावर बसूनच मार्ग आक्रमावा लागला ही गोष्ट लक्षांत घेतां वरील वर्णनांत अतिशयोक्ति केली आहे असें म्हणण्याचें कारण दिसत नाहीं. परंतु हें जर वर्णन खरें तर राजारामाला रामावतार म्हणण्याचें कांहीं विशेष कारण होतें किंवा राजा विष्णूचा अवतार व नांव राजाराम म्हणून ही उपमा दिली एवढेंच, असा प्रश्न पडतो. कवीनें याच काव्यांत सर्व सरकारी कारभाऱ्यांना देवांश म्हटलें आहे. त्यावरून असें दिसतें कीं, केवळ रूढ पद्धतीप्रमाणें राजाला विष्णूचा अंश मानून नामसाम्यावरून चवथा रामावतार म्हटलें आहे इतकेंच. यावरून राजारामाच्या स्वभावाचा व इतर पराक्रमाचा कयास बांधणें सयुक्तिक होणार नाहीं. या राजारामवर्णनांत शिवाजीला "महाराजेन पित्रास्य घातुकेन महीभृतां। श्रीशिवछत्रपतिना सिंहासननिषेदुषा॥" असें म्हटलें आहे. यांतील 'घातुकेन' ही शब्दयोजना उचित होईल किंवा नाहीं हें आपणांस ठरवतां येणार नाहीं. परंतु एकंदर कवीच्या लिहिण्याच्या पद्धतीवरून या 'घातुकेन' शब्दाचा अर्थ 'शासन करून' "मारून काढून" "पाडाव करून" यापेक्षां अधिक निंदाप्रचुर अर्थानें घेण्याचें कारण दिसत नाहीं. कारण कवीचा तसा हेतू असण्याचाहि संभव नाहीं.

राजारामवर्णनानंतर नवरात्र महोत्सवाचें वर्णन दिलें आहे. तें असें: महाराजानें प्रधानपुरुषांबरोबर खलबत करून पन्हाळगडावरील वरप्रदायिनी दुर्गादेवीच्या पूजनास नवरात्राच्या प्रतिपदेपासून आरंभ झाला. धूपदीप-निरंजनादि त्रिकालपूजन, नानाप्रकारचे नैवेद्य, त्याचप्रमाणें जप, ब्राम्हण-

भोजनें, नटनर्तकांची गाणीं, यौवन व मद यांनीं प्रमत्त झालेल्या अनेक वारयोषितांचें अहोरात्र चालणारें नानाप्रकारचें नृत्यगायन, त्याचप्रमाणें विशेषेंकरून हातीं डमरु व गळ्यांत भयंकर मुंड धारण करणाऱ्या तुळजा-भवानीच्या भक्तींनें आसक्त झालेल्याचें तांडव, शिरें तुटतांना ओरडणारे व तावडतोब स्वर्गास जाणारे सहस्रावधि बकरे व मेंढे यांचें असंख्य बलिदान, कुमारीपूजन, साध्वी सुवासिनींचें पूजन व भोजन, नाना देशांतून आलेल्या बंदीजनांचा स्तुतिपाठ आणि नानाप्रकारचे इतर मनोहर देखावे वगैरेंनीं राजानें भवानीला संतुष्ट केलें. देवीनें स्वप्नांत येऊन बिल्वशाखावत करण्यास सांगितलें तेंहि त्यानें केलें. भवानीनें अभय दिलें. नंतर नवमीला होम झाला. पारितोषकें बिदाम्या यथासांग दिल्या. अशारीतीनें लोकांच्या मनाला आनंद देणारा तो भवानीचा नवरात्र यज्ञाचा महोत्सव त्या चक्रवर्ति भूपतीनें संकटविरहित संपादल्यानें तो राजा मनांत संतोष पावला. सारांश, हा वार्षिक उत्सव सालाबादप्रमाणेंच झाला. यावरून संभाजीच्या कारकिर्दीत अशाच प्रकारच्या वार्षिक उत्सवाचें वर्णन थोड्या अतिशयोक्तिनें करून कलशाच्या वाममार्गी प्रकाराचें हिडीस असें वर्णन चिटणिसानें त्यास जोडल्यानें जणु काय हा देव्युत्सव संभाजीनें नवीनच सुरू केला व तोहि कलशाचें बोलें आचरला असें भासविलें आहे. शिवाजी भवानीचा भक्त. भवानीच्या उत्सवाचा प्रकार जपजाप पाठ होम वगैरे अनादिकाला-पासून चालत आलेले. होमांत बली देण्याचीहि चाल फार पुरातन. असें असतांना केवळ कलशावरील रागामुळें चिटणिसानें व त्यांच्यामागून इतरांनीं या देव्युत्सवाचें प्रकरण अतिशयोक्तीनें खुलवून लिहिलें व त्यानंतर पंचपन्नास वर्षांनीं शाक्तमार्गाचा जो प्रसार झाला त्यांतील कांहीं भाग यांत घुसडून देऊन संभाजीबद्दल निंदाव्यंजक, जो मजकूर लिहिला तो काल्पनिक आहे असें या राजारामानें केलेल्या उत्सवाचा हा मजकूर वाचून कोणालाही वाटेल यांत शंका नाहीं.

**सर्ग चवथा**

चवथ्या सर्गात तुंगभद्रेपर्यंतचा राजारामाचा प्रवास वर्णिला आहे. परंतु प्रथम विजयादशमीच्या सुमुहूर्तावर निघालेल्या स्वारीचें वर्णन दिलें आहे. शमी व आपटा या दोन वृक्षांचें पूजन झाल्यानंतर राजा परत मंदिरांत आला. तेथें उदार अंतःकरणाच्या व प्रेमवर्धन करणाऱ्या त्याच्या बायकांनीं (दारानीं) त्याला नीरांजनांनीं ओवाळलें व त्यानें स्त्रियांच्या सांत्वनांत ती रात्र घालविली असें म्हटलें आहे. यावरून राजारामाचा कबिला रायगडावरून यापूर्वीच पन्हाळ्यावर आला होता असें दिसतें. मासिर-इ-अलमगिरीवरून प्रो. सरकारनीं व इतर कांहींनीं राजारामाचा कबिला म्हणजे बायकामुलें रायगडावरून पकडून नेल्याचें लिहिलें आहे तें चुकीचें दिसतें. एक तर राजारामाला त्यावेळीं मूलबाळ नव्हतें. दोन बायका होत्या. त्या पकडल्या जाऊन नंतर सोडल्याचा उल्लेख कोठेंच नाहीं. शिवाय रायगड मोगलांचे हातीं जाण्यापूर्वीच राजारामाचा कबिला रायगडावरून सोडवून आणणें शक्य होतें. ज्याअर्थी कवीनें "तत्रनीराजितो दारैरुदारैः प्रेमवर्धनैः। अतिचक्राम रजनीं सांत्वयन्वामलोचनाः।" असें म्हटलें आहे व राजारामाच्या बायका यानंतर स्वतंत्र असल्याचें दिसतें त्याअर्थी राजारामाचा कबिला नवरात्राच्या पूर्वींच म्हणजे १६८९च्या सप्टेंबरापूर्वी पन्हाळ्यावर आणला गेला होता असें सिद्ध होत आहे.

विजयादशमीनंतर लवकरच पन्हाळा मोंगली सरदारानीं वेढला. तेव्हां त्यानें शंकराजी नारायण सचीवाकडे कोरीगडाभोंवतालचा राज्याचा भाग सोंपवून बाकीचा रामचंद्रपंताकडे दिला. संताजी धनाजी व शंकराजी आणि पायदळ व घोडदळ हींहि रामचंद्रपंताचे हवालीं केलीं. ब्राम्हणादिकांना दानें देऊन गाईला प्रदक्षिणा घातली व तो पांथोचित वेष धारण करून कर्नाटकास जाण्यास निघाला. शंकराजी व रामचंद्रपंत यांच्यांत कामाची पूर्वी वाटणी झाली होती ती सांप्रत बदललेली आहे म्हणून शंकराजीनें सन १६९०च्या

१२ दिसेंबरच्या जाहीरनाम्यांत नमूद केलें आहे. परंतु सर्व लष्करी कारभार रामचंद्रपंताकडेसच होता हें शंकराजीपंतानें रामचंद्रपंताच्या हाताखालीं केलेल्या अनेक लढायांच्या उल्लेखांवरून स्पष्ट होत आहे.

राजाराम पन्हाळ्याहून निघाला तो केव्हां निघाला हा मुद्दा प्रो. सरकार यांनीं वादग्रस्त केला आहे. त्यांचें म्हणणें असें कीं, जेधे शकावलींत जें राजाराम आश्विन वद्य ८मीस म्हणजे ता. २६ सप्तेंबर १६८९ रोजीं पन्हाळ्याहून निघाला म्हणून लिहिलें आहे तें चुकीचें आहे. त्यांच्या मतें ३० जून १६८९च्या सुमारासच राजारामानें पन्हाळा सोडला. त्यांनीं आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ टीपेंत पुढीलप्रमाणें खुलासा केला आहे. "Z. S. says that Rajaram fled from Raigadh to Pratapgadh on 10 Chaitra Badi (=5 April 1689), issued from Panhala on 8 Ashwin Badi (=26 Sep.) and reached Vellore on 11 Kartik Badi (=28 Oct.). The initial and final dates are correct, but in the middle one I suggest Asharh for Ashwin (thus getting 30 June for the departure from Panhala) because it is hardly possible for a man to cover the 500 miles from Panhala, via Bednur to Vellore in the 32 days (26Sep. —28 Oct.) that Z. S. gives to this journey. Moreover, we know from the contemporary imperial history Masir-i-Alamgiri (328) that Rajaram went through many adventures after leaving Panhala; he was overtaken by the Mughals on an island in the Tungabhadra on the frontier of Bednur, escaped from the ring of his enemies and was concealed by the Rani of Bednur and subsequently allowed to go away. A week or two of time must be allowed for these causes of delay but Z. S's dates leave no room for them in the last part of Rajaram's journey." (p. 25 Vol. V - Aurangzeb).

प्रो. सरकार यांनीं केलेली ही सर्व मांडणी केवळ तर्कावर रचलेली आहे. तिला इतर कांहीं लेखी पुरावा नाहीं. प्रो. सरकार यांची विचारसरणी सयुक्तिक असली तरी तिची उभारणी चुकीच्या समजावर केली असल्यानें चुकीची ठरत आहे. एक तर प्रत्यक्ष नवरात्रमहोत्सवांत भाग घेणाऱ्या माणसानेंच हें काव्य लिहिलेलें असल्यानें प्रो. सरकारच्या तार्किक अनुमानांस अधिक मान्यता देणें बरोबर नाहीं. आणि या तत्कालीन पुराव्यास योग्य तें महत्त्व दिलें तर जेधे शकावलींतीलच तारीख बरोबर असली पाहिजे. प्रो. सरकार यांची चुकी होण्याचें मुख्य कारण म्हणजे राजारामाचें मंडळ अगदीं सुरुवातीपासून तों थेट वेलूरास पोहोंचेपर्यंत कापडी वेषांत पायींच गेलें हा भ्रामक समज होय. पुढील हकीकतींत राजाराम पांथोचित वेष (म्हणजे कापडी वेष नव्हे) धरून निघाला असें ह्मटलें आहे. इतकेंच नव्हे तर बराचसा सुरुवातीचा प्रवास घोड्यावरून मध्यंतरीचा बहिरजीच्या खांद्यावरून व नंतरचा पुन्हा घोड्यावरून झाला असल्याचें लिहिलें आहे. सारांश, वस्तुस्थितीची खरी माहिती नसल्यामुळें प्रो. सरकार यानीं केलेलें अनुमान चुकीचें ठरत आहे. तेव्हां प्रो. सरकारांच्या ह्मणण्याप्रमाणें जेधे शकावलींत आश्विन हें आषाढाऐवजीं चुकीनें पडलेलें नसून यथायोग्यच आहे.

यानंतर कवीनें प्रवासास निघालेल्या मंडळींतील मुख्यमुख्य व्यक्तींचें वर्णन केलें आहे. त्यांतील सारांश असा: "पुढें सेनापति, मागें मानसिंह (बहुधा घोरपडे) प्रल्हाद निराजी व त्याचा हस्तक कृष्णाजी अनंत, नीलकंठ मोरेश्वर त्याचा धाकटा भाऊ (बहिरो) आणि हस्तक उद्धव, नीळकंठ कृष्ण पारसनीस, खंडो बल्लाळ ज्यांच्यामध्यें मुख्य आहे असे चांद्रसेनीय चित्रगुप्त कायस्थ, खंडोजी कदम, बाजी कदम व इतर लोक राजाबरोबर गेले. मोहिनी पडलेल्या त्या म्लेंच्छ सेनापतीच्या रक्षकांनीं त्या घोड्यांवर बसून व परस्परांत मिसळून घोळक्यानें पन्हाळ्यावरून जाणाऱ्यांना ओळखलें नाहीं. मार्गांतील अनेक अडचणींतून जात असतांनाहि

ते खिंकाळणारे व धावणारे घोडे त्या दुरात्म्यांना दिसले नाहींत. ते नद्याहि पार गेले. राजारामाच्या मागून जाणारांना ती रात्र लहान वाटली. सकाळीं ते कृष्णातीरीं पोहोंचले. तेथें त्यांनीं ( २७ सप्टेंबर ) यथाविधि स्नान पितृतर्पण वगैरे केलीं. पाणी गुडघ्यापर्यंत लागलें. उतारवाट मिळाल्यानें ते नदीपार झाले. याप्रमाणें राजा शत्रूच्या मुलखांतून जात असतां तो पुन्हां एका मोठ्या नदीजवळ ( वर्धा नदीजवळ ! ) आला. तेंसमयीं शत्रूच्या अनुचरांना खबर लागली व ते पाठलाग करूं लागले. तेव्हां बहिरजी आपला भाऊ मालोजी घोरपडे यासह राजाच्या सेवेला पुढें सरसावला व म्हणाला कीं, माझी व सचिव यांची सेवा घेऊन महाराजांनीं कर्नाटकास चलावें. मार्गांत जीं जीं विघ्नें येतील तीं तीं निवारण करूं. नंतर ते सर्व ती नदी पार उतरून गेले. परंतु शत्रूनें सर्व वाटा रोखून धरल्यानें राजाच्या मालाईतांना शत्रूशीं ठिकठिकाणीं बहुत युद्ध करावें लागलें. शत्रुसैन्य मोठें आहे व आपलीं वाहनेंहि थकलीं आहेत हें पाहून संताजी जगताप व रूपसिंह भोसले राजास म्हणाले कीं, शत्रु सर्व बाजूनें चालून आला आहे. तरी आम्ही येथें त्याच्याशीं लढाई देऊन विजय मिळवूं. परंतु आपण येथून निसटून जावें. नंतर त्या दोघांचें शत्रूबरोबर महायुद्ध झालें तें सर्व लोकांनीं व राजारामानेंहि पाहिलें. परंतु शत्रुसैन्य मोठें आहे हें पाहून राजानें सैन्याच्या तोंडावर संताजी जगतापाला ठेवून तो रूपसिंहाला बरोबर घेऊन पुढें गेला. गांव, गवळीवाडे, दुर्ग, खेडीं, खोरीं, चांडाळगृहें वगैरे मागें टाकीत टाकीत राजा तुंगभद्रेच्या तीरावर येऊन पोहोंचला. नदी अगाध आहे, शत्रू पाठीवर पुन्हां चालून येत आहेत व देशाचे अधिपतीहि दुष्ट आहेत असें जाणून राजा सेनापतीला म्हणाला कीं, हे महाबाहो रूपसिंहा, तूं एकटा असून शत्रू पुष्कळ आहेत. तसेंच हा देशहि युद्धाला योग्य नाहीं. काल बलवान आहे. तरी तूं मनांत संकोच न धरतां मजबरोबर चल. परंतु रूपसिंह एक पाऊलहि ढळला नाहीं. तो राजाला म्हणाला, तुम्ही आपल्या इच्छेप्रमाणें

पुढें निघून जा व लवकरच स्वराज्य प्राप्त करून घ्या. तुमच्याबरोबर मी आलों तर, हे भूपती, यवनांनीं वेढलेले आपले सर्व लोक निःसंशय नाश पावतील.

वरील हकीकतीवरून राजारामाबरोबर बरीच मंडळी असावीत. कदाचित् मासिर-इ-अलमगिरीच्या आधारें प्रो. सरकार ह्मणतात त्याप्रमाणें २००. असतील. सर्व अश्वारूढ होते. ही सर्व मंडळी पन्हाळगडच्या वेढ्यांतून मोगली रक्षकांच्या दृष्टीस न पडतां जेधे शकावलीप्रमाणें ता. २६ सप्टेंबरला गडावरून निसटली ती दुसऱ्या दिवशीं सकाळीं म्हणजे ता. २७ सप्टेंबरला कृष्णातिरीं पोहोंचली. नंतर चिटणीस लिहितात त्याप्रमाणें ते जर गोकर्ण म्हणजे गोकाक व सौधा म्हणजे सौंदत्तीवरून गेले असें धरलें व ते तेथून जर बेदनूरच्या हद्दींत जावयाचे तर कवीच्या ह्मणण्याप्रमाणें जी मोठी नदी लागली ती वर्धा नदी असली पाहिजे. परंतु या नदीवर येण्यास धारवार हुबळी बंकापूर करजगी हाच मार्ग होय. वर्धा नदीजवळ पोहोंचण्यापूर्वीच शत्रूस खबर लागल्याचें कवि लिहितो. बहुधा ही खबर हुबळी आणि बंकापूर याच्या दरम्यांतील प्रवासांत लागली असावी. कारण ईशरदासच्या प्रसंगावलींत लक्ष्मीश्वरच्या प्रांतांतून जात असतां रूपसिंह भोसल्यानें सिद्दी अबदुल कादिर किंवा मासिर-इ-अलमगिरीच्या प्रमाणें सय्यद अबदुल्ला खान यास जखमी केल्याचा जो उल्लेख आहे तो याच टापूंतील असावा. कारण पुढें कवि लिहितो: "परंतु शत्रूनें सर्व वाटा रोखून धरल्यानें राजाच्या माणसांना शत्रूशीं ठिकठिकाणीं बहुत युद्ध करावें लागलें. रूपसिंह भोसले व संताजी जगतापानें युद्ध केलें तें सर्वांनीं पाहिलें. राजारामानेंहि पाहिलें. यावरून ईशरदासानें लिहिल्याप्रमाणें हा पहिला झगडा सिद्दी अबदुल कादिरशीं झाला असावा. परंतु कवि लिहितो त्याप्रमाणें शत्रुसैन्य मोठें आहे असें पाहून संताजी जगतापास शत्रुसैन्याची वाट अडविण्यास ठेवून राजा रूपसिंहाबरोबर तुंगभद्रेकडे गेला व तुंगभद्राकांठीं आला. परंतु पुन्हां पाठीवर सैन्य चालून येत आहे व

देशाचे अधिपतीहि दुष्ट लोक आहेत हें जाणून रूपसिंहाला राजानें लढाई न देण्याविषयीं आग्रह केला. परंतु त्याला तेथून राजाबरोबर तुंगभद्रा पार जाणें योग्य वाटलें नाहीं. तसें केल्यास शत्रू आपल्या लोकांचा नाश करील अशी त्याची अटकळ होती. इकडे अबदुल कादर जखमी झाल्यामुळें मासिर-इ-अलमगिरीवरून प्रो. सरकार लिहितात त्याप्रमाणें सैयदानें आपला मुलगा हसन अलीखान यास सैन्यासह पाठविला. त्यानें जोराचा पाठलाग करून तीन दिवसांत राजारामाच्या तुकडीला तुंगभद्रेवर गांठलें. आणि याच शत्रूची हालचाल समजताच राजारामानें रूपसिंहास तुंगभद्रा उतरून जाण्यास सांगितलें. परंतु रूपसिंहानें तें न ऐकतां राजारामास पार जाण्यास सांगून आपण कांहीं लोकांसह तुंगभद्रेच्या अलीकडे वाट अडवून राहिला. इतक्यांत शत्रूनें त्यांना वेढलें. येथपर्यंतचीच हकीकत चवथ्या सर्गांत दिली आहे. ती दुसऱ्या पुराव्यास कशी जुळती आहे ह्याचें वर दिग्दर्शन झालेंच आहे. मात्र वरील हकीकतीवरून पांथोचित वेष धारण केलेली ती सर्व मंडळी घोड्यावरूनच प्रवास करीत होती व लक्ष्मीश्वराच्या प्रांतांत शिरेपर्यंत अडचणीशिवाय येऊं शकली. प्रथम विरोध झाला तो वर्धातटीं झाला व दुसरा आतां तुंगभद्रातीरीं होणार आहे असें यावरून दिसतें. आतां येथ-पर्यंत येण्यास किती अवधी लागला हें नक्की सांगतां येत नाहीं. परंतु वर्धा नदीपासून शत्रू मागें लागला असतां व चकमकी झडत असतां ७०-८० मैलांचा प्रवास करून तुंगभद्रेपर्यंत पोहोंचण्यास तीन दिवस लागल्याचें दिसतें. यावेळीं मऱ्हाटमंडळाचीं वाहनें थकलीं होतीं व त्यांना आडरस्त्यानें मार्ग आक्रमिणें आवश्यक होतें हीहि गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. बहुधा राजारामाला पन्हाळ्याहून येथपर्यंत येण्यास तीन आठवडे लागले असावेत. बहुतेक सर्व प्रवास शत्रूच्या मुलुखांतून करावयाचा होता. त्यामुळें हा प्रवास शक्य तितका शीघ्रगतीनें केला असल्यास नवल नाहीं.

## पांचवा सर्ग

पांचव्या सर्गात तुंगभद्रेवर आल्यानंतरची हकीकत दिली आहे. ती अशी:—आपले सर्व लोक शत्रूनें घेरले गेले आहेत असें जाणून व रूपसिंह तेथून हालण्यासहि तयार नाहीं हें पाहून राजाराम बहिरजीला म्हणाला कीं आपलें सर्व मंडळ म्लेंच्छांनीं वेढलें आहे. बाहेर पडण्याला मार्ग नाहीं. तरी आपण यांतून निघून जाऊं या. तेव्हां सर्व बाजूला सबल असे शत्रूचे मुख्य लोक उभे असतां व त्याचप्रमाणें मार्गांत संकटांचीं जाळीं पसरविलीं असतांहि तो शस्त्रधारी साहसी राजारामाला खांद्यावर घेऊन नृपतीस समयोचित अशा सर्व उपकरणांसह शत्रूमधून निघून गेला. कोणताहि अडथळा झाला नाहीं. राजा जात असतां राजाचे सर्व अनुचर चिंता व भय यांनीं व्याकूळ झाले व राजाचें कल्याण असो असें म्हणाले. नंतर त्या भिन्न जातीय लोकांतील कांहींनीं कापडींचा म्हणजे यात्रेकरूंचा, कांहींनीं भिकाऱ्यांचा, कांहींनीं बैराग्यांचा, कांहींनीं व्यापाऱ्यांचा वेष घेतला. कांहीं तसेच तेथें गुप्तपणें राहिले. राजाराम बहिरजीसह तुंगभद्रा नदी ओलांडून पार गेला. नदीतीरावर भोजन झालें. नंतर मित्र नोकरचाकर स्नेही-संबंधी यांचेकडून केली जाणारी सर्व सेवा एकट्या बहिरजीनेंच केली. अशारीतीनें त्या दोघांनीं मार्ग आक्रमिला. राजा आपली सीमा ओलांडून बहिरजीसह कासीमखानाच्या असंख्य सेनेंत जाऊन रहात असे. परंतु बाजारच्या रस्त्यानें जात असतां, सैनिकांत मिसळला असतां, राजमार्गांत संचार करित असतां, धनिक लोकांबरोबर संभाषण करित असतां, घोडे किंवा रत्नें विकत घेत असतांनाहि कासिमखानाच्या गुप्तपणें फिरणाऱ्या हेरांनीं राजाला व बहिरजीला ओळखलें नाहीं. याप्रमाणें राजा अंबूर नांवाच्या शहरांतील एका देवालयांत येऊन राहिला. तेथून बहिरजीला बाजी काकडे याजकडे पाठविलें. बहिरजीनें काकड्यास सर्व वृत्तांत समजाविला. बाजी काकडे आपल्या लोकांसह राजारामास येऊन भेटला. नजरनजराणे दिले.

नानाप्रकारचीं वाद्यें वाजविलीं. तोफांचे आवाज काढले. बराच महोत्सव झाला. याप्रमाणें भोसलेवंशाचा तिलक राजाराम महाबळी दिल्लीशानें पर्वतासारखीं विघ्नें उत्पन्न केलीं असतांहि सर्व म्लेंच्छांना श्रीविष्णूच्या तेजानें मोहित करून त्यांचा पराभव करण्यासाठीं कर्नाटकांत विजयी होऊन राहिला.

प्रो. सरकार यांनीं मासिर-इ-अलमगिरीवरून हसन अलीखान जोरानें कुच करून येऊन राजारामाच्या मंडळाला त्यांचे म्हणण्याप्रमाणें तुंगभद्रेच्या कांठीं सुभानगड व हिरा या गांवांजवळ गांठलें असें म्हटलें आहे. "The Marathas who had taken refuge in an island were attacked at night, surrounded and over-powered, after a bloody fight. Many were put to the sword, and a hundred of their chiefs—including Hindu Rao, Ankoji (Vyankoj) a son of Shivaji I, Baharji and Mania Ghorpare—were made prisoners. But Raja Ram contrived to escape with his bare life while the others were carrying on the fight." यानंतर बेदनूरच्या राणीनें राजारामाला आश्रय दिल्यावरून तिला शासन करण्यासाठीं सैन्य रवाना झालें. तेव्हां तिनें राजारामास पळवून खंडणी देऊन प्रकरण मिटविलें. याप्रमाणें मजकूर प्रो. सरकारनें नमूद केला आहे. या मजकुराशीं कवीनें दिलेला मजकूर बराच जुळता आहे. मासिर-इ-अलमगिरींत अंकोजी म्हटलें आहे त्याऐवजीं केशव कवीनें म्हटल्याप्रमाणें रूपोजी किंवा रूपसिंह पाहिजे. हा शिवाजीचा मुलगा आहे हा मासिरीच्या लेखकाचा भ्रम आहे. हिंदुराव व बहरजी आणि मनिया घोरपडे अशा आणखी तीन निरनिराळ्या व्यक्ति मासिरींत दिल्या आहेत. बहिरजीलाच हिंदुराव असा किताब होता. तेव्हां हिंदुराव निराळी व्यक्ति धरली तर नंतरचा बहरजी हा नीळकंठ मोरेश्वराचा बहिरोबा असावा. मनिया घोरपडे मालोजीस उद्देशून म्हटलें असलें पाहिजे. सारांश, कैद झालेल्या लोकांची जी यादी मासिरींत दिली

आहे त्यांत कांहीं गैरसमजानें मजकूर दिला गेला असावा असें दिसतें. बहिरजी घोरपडे राजारामाला खांद्यावर मारून सर्वांस नकळत निघून गेला असें केशव पंडित लिहितो. इतरत्रहि बहिरजीनेंच राजारामाला जिंजीस नेलें असा उल्लेख आला आहे. परंतु हा उल्लेख करतांना परस्परविरोधी ह्मणजे याचवेळीं बहिरजीस कैद केलें गेलें व तो विजापुरांत कांहीं दिवस कैदेंत राहून नंतर तेथून तो पळून गेला असाहि उल्लेख आला आहे. सारांश, कालदृष्टीनें अशक्य कोटींत जाणारा हा मजकूर इतिहासांत केवळ निरनिराळ्या प्रसंगांच्या कालाबद्दलच्या निश्चित माहितीच्या अभावीं शिरला आहे इतकेंच यांतून तात्पर्य निघतें. परंतु केशव कवीनें केलेला खुलासा इतका स्पष्ट आहे कीं, त्यायोगें कालदृष्ट्या अक्षम्य व परस्परविरोधी अशी ही माहिती आपणांस इतिहासांतून दूर करणें सोपें झालें आहे. सारांश, तुंगभद्रेवर लढाई झाली. सर्व वेढले गेले. पळून जाण्यासहि फारसा मार्ग राहिला नाहीं. तेव्हां कांहींनीं वेषांतरें केलीं. कांहीं तसेच दडून राहिले. कांहीं पकडले गेले. बहिरजी घोरपड्यानें राजारामास खांद्यावर मारून पळविलें व नंतर एकट्याच बहिरजी व राजाराम यांनीं अंबूरपर्यंतचा मार्ग आक्रमिला. असें करितांना ते कासिमखानाच्या मुलखांतून व सैन्यांतूनहि गेले. त्यांनीं बेदनुरांत गुप्तपणें कांहीं दिवस काढले असावेत. अश्व रत्नें खरेदी करणें वगैरे जो मजकूर दिला आहे तो या बेदनूर प्रांतांतलाच असावा. मात्र केशव कवीनें जें कासीमखानाच्या गुप्त हेरांनाहि त्यांचा सुगावा लागला नाहीं असें म्हटलें आहे तें त्याचें म्हणणें केवळ कासीमखानाच्या लोकांनीं त्यांना पकडलें नाहीं एवढ्यावरून रचलेलें अनुमान असावें. बेदनुराहून अंबूर येथें गेल्यानंतर राजाराम मराठ्यांच्या कर्नाटकांत शिरला. तेथील अधिकारी बाजी काकडे यास बहिरजीनें बहुधा वेळूरास गांठून सर्व वृत्तांत कळविला व त्याची व राजारामाची गांठ घालून दिली. अंबूर हें मजबूत ठिकाण आहे. येथें बाजी काकडे यांनीं राजाराम महाराजांचें स्वागत केलें.

यापूर्वीच कर्नाटकचे मुख्य सुभेदार हरजी राजे महाडिक मृत्यु पावले होते. त्यामुळें बाजी काकडयाला साहाजिकच पुढाकार देणें जरूर होतें. त्यानेंहि पुढाकार घेऊन महोत्साह करून लोकांची जमवाजमव केली व पुढील कार्यभाग आटोपला. मात्र केशवानें अंबूरपर्यंतचीच सविस्तर हकीकत दिली आहे. येथें पांचव्या सर्गाची व काव्याची समाप्ती झाली.

जेधे शकावलीप्रमाणें राजाराम ता. २८ आक्टोबर १६८९ला वेळूरास गेला असें म्हटलें आहे. यावरून तो अंबूरला निदान दोन तीन दिवस तरी पूर्वी गेला असावा असें अनुमान काढण्यास हरकत दिसत नाहीं. येथून तो पुढें जिंजीस गेला व तेथें त्याला राजेरजवाडे येऊन मिळाले वगैरे उल्लेख दुसऱ्या सर्गाच्या प्रारंभीं आलेच आहेत.

उपसंहार

वरील सर्व हकीकतीवरून दुसऱ्या सर्गातील हकीकत सोडली तर केशव कवींनीं जी जी माहिती दिली आहे ती फक्त राजारामाचे निकट सानिध्यांत काय काय घडलें किंवा राजारामानें व्यक्तिशः काय केलें किंवा राजारामाच्या खास हालचाली कोणत्या व कशा झाल्या इतकेंच दर्शविणारी आहे. असें करण्याचा कवीचा उद्देश कोणता असावा हें निश्चित सांगता येणार नाहीं. केशव कवि रूपसिंहाच्या चकमकीचें वर्णन देतो. परंतु त्यानें कांहींस कैद केले व नंतर त्यांना अमानुष छळलें, किंवा प्रल्हादपंत राजारामाला भेटले वगैरेसारखे महत्वाच्या प्रसंगांचे उल्लेख जाणूनबुजून गाळले असतील असें संभवत नाहीं. केशवाला कोणीतरी राजारामाच्याच पार्तीच्या ज्या हालचाली सांगितल्या किंवा कदाचित् तो या पार्तीबरोबर असल्यास त्याला जितक्या समजल्या तितक्याच त्यानीं नमूद केल्या असाव्यात. इतर मंडळी केशवाला माहिती सांगण्यापूर्वीच केशवानें ग्रंथसमाप्ती केली असावी किंवा ती राजारामाजवळ येऊन पोहोंचण्यास बराच अवधि लागला असावा व त्यामुळें त्यांची हकीकत त्याला वेळींच समजू शकली नाहीं. तुंगभद्रेवरून बरीच मंडळी रामेश्वराकडे

वळली. कारण त्यांनीं मराठ्यांच्या कर्नाटकाकडे मोर्चा लावला असता तर त्यांचा शत्रूनें संशय घेतला जाऊन तीं पकडलीं गेली असतीं. उलट त्यांनीं आडमार्गानें जाण्याचें ठरविल्यामुळें राजारामाचे अनुयायी राजारामास एखाद महिना उशिरानें मिळाले असल्यास नवल नाहीं. सारांश, या चरित्रानें राजारामाच्या एका महत्वाच्या हालचालीचा इतिहास आपणांस प्राप्त झाला आहे. तोहि महाराष्ट्र मंडळाच्या इतिहासाच्या दृष्टीनें भागशःच लाभला आहे. परंतु जें केशव कवीच्या उपकारानें पदरांत पडत आहे तें इतकें महत्वाचें व नवें आहे कीं, आपणास तत्कालीन प्रचलित इतिहास व लोकसमजुती बऱ्याचशा सुधारतां येऊन योग्य व खऱ्या वस्तुस्थितीचा बोध करून घेतां येतो. सारांश, या केशव कवीच्या ग्रंथानें राजाराम महाराजांच्या इतिहासांत फारच मोठी व महत्वाची भर घातली आहे.

शेवटीं तंजावरच्या ग्रंथालयाचे चिटणीस श्रीयुत सांबमूर्तीराव यांनीं मला याकामीं मूळ काव्याची नकल देण्यांत व ती पुन्हां माझ्या समजुतीप्रमाणें फेरतपासून देण्यांत जी मदत केली त्याबद्दल त्यांचे, व माझे मित्र श्री. गिरिधर भिवाजी नरे यांनीं मला हा ग्रंथ व मराठी अर्थ लावण्यांत जें बहुमोल साहाय्य केलें त्याबद्दल त्यांचे आभार मानून मीं हें समालोचन पुरें करितों.

६७८, बुधवार पेठ,<br>पुणें शहर, १७ जून १९३१.

वा. सी. बेंद्रे.

[—वरील निबंध ता. १७ जून १९३१ रोजीं सकाळीं भारत इतिहास संशोधक मंडळाच्या एकविसाव्या वार्दिवसानिमित्त भरलेल्या सभेंत वाचला.]

राजारामचरित्राचा लेखक व संभाजी महाराजांस रामायण सांगणारा केशव पुरोहित एकच असावा असा समालोचनांत मीं आधाराशिवाय तर्क केला होता [पृ. ३-४]. आतां थोडीशी पुढें मजल मारण्याचा सुयोग आल्यानें संभाजीचा केशवपंडित धर्मशास्त्रप्रणेता व लेखक असल्याचें सिद्ध करतां आलें व वरील तर्क खरा असल्याबद्दल हा चरित्रग्रंथ वाचकांच्या हातीं देण्यापूर्वी सांगता आलें हा एक योगायोगच होय.

शामजी नायक पुंडे (संभाजीचा कर्नाटकांतील एक प्रख्यात सुभेदार) याच्या खास संग्रहांतील इ. स. १६८२-८३त लिहिलेला "दंडनीति" नांवाचा ग्रंथ समालोचन व चरित्र छापून झाल्यानंतर आज माझे हातीं आला. त्याचें शेवटीं "श्रीमन्महाराजाधिराजक्षत्रियकुलावतंससिंहासनाधीश्वरश्रीशंभुराज-छत्रपतिविरचिते ग्रंथे बुधभूषणे श्रीमत्पुरोहितदामोदरभट्टात्मजकेशवपंडितविरचित-धर्मकल्पलतांतर्गतनीतिमंजर्यां दंडनीतिप्रकरणम्" असा उल्लेख आहे. त्यावरून संभाजीचा केशव पुरोहित लेखक व कवि होता हें स्पष्ट होत आहे. शिवाय या 'दंडनीती'चा कर्ता व 'राजारामचरिता'चा कर्ता रामभक्त असल्याचेंहि दोन्हीहि ग्रंथांच्या प्रशस्तीवरून सिद्ध होत आहे. याखेरीज दोन्हीहि ग्रंथांत 'तनुते' हाच शब्दप्रयोग 'रचणें' या अर्थी केला असून भाषासरणी सारखीच आहे. तेव्हां एकाच प्रदेशांत, एकाच कालांत, कवि, लेखक, धर्मशास्त्रज्ञ, राजमान्य, अशा ब्राह्मण जातीच्या आणि एकाच नांवाच्या व गुणधर्माच्या दोन व्यक्ति संभवणें क्वचित कदाचित अशक्य म्हटलें तरी चालेल. सारांश, संभाजीला रामायण सांगणारा केशवपंडित व राजारामाचा चरित्रलेखक केशवपंडित हे एकच असें निश्चित होत आहे.

नवीन धागा हातीं आल्यानें केशवपंडिताचा वृत्तांत असा सांगता येतो कीं, "केशवभट पंडित हा दामोदरभटाचा मुलगा. याचें उपनांव पुरोहित, गोत्र कौशिक, ऋग्वेदी, वेदाध्यायी, सूत्र आश्वलायन, परशुराम क्षेत्रांत संगमेश्वरचा राहणारा. हा शिवाजीमहाराजांसंनिध होता. महाराज त्याचे

हातून दानाध्यक्षपणाचें प्रयोजन घेत होते. शिवाजीमहाराजांनंतर तो संभाजीजवळ होता. संभाजीहि त्याचे हातून दानाध्यक्षपणाचें प्रयोजन घेऊन चालवीत होते." [ले. ४४ पृ १५७ सनदापत्रांतील माहिती.] त्यानें 'धर्मकल्पलता' हा ग्रंथ लिहिला. त्यांतील 'दंडनीतिप्रकरण' संभाजीमहाराजांच्या 'बुधभूषणांत' इ. स. १६८२-३त सामिल केलें. [दंडनीतिप्रकरण]. संभाजीनें त्याचे मुखें रामायण श्रवण केलें. त्यावरून संतुष्ट होऊन पुराणश्रवणाची सांगता व्हावी म्हणून त्याला राजापूर प्रांतांतील संगमेश्वर तालुक्यांत कोंड पांच व शेतें ठिकाणें तीन एकूण भूमि महसूल दाभोळी लारी सोळाशेंचें भूमिदान धारादत्त देऊन ता. २९ दिसेंबर १६८४रोजीं दानपत्र करून दिलें. संभाजीनंतर तो राजारामाबरोबर होता. (ले. ४४ पृ. १५७-८ स. मा.). त्यानें इ. स. १६८९च्या सप्टेंबरांत पन्हाळगडावरील नवरात्र महोत्सवांत बराच पुढाकार घेतला होता व त्यानें ता. ४ जानेवारी १६९०त राजारामचरित्राचा प्रस्तुतचा ग्रंथ लिहून पुरा केला." (पृ. ३०. व ३९).

"राजारामानें मौजे फुलचरी तर्फ फुणगांव [परचुरी तर्फ फुणगुस] व मौजे पुरीये [पुर्ये] तर्फ देवळें असे दोन गांव ता. ८ मे १६९४ रोजीं दिल्याचें, व ताराबाईनें पन्हाळा प्रांतांतील वाडी मोताई मौजे भोगांव तर्फ बोरगांव ता. २१ सप्टेंबर १७२० रोजीं 'गृहिणीदान' दिल्याचा उल्लेख केशवभटाच्या रामचंद्र नांवाच्या मुलानें

---

१ इसवी सन १६८६च्या मार्च १६चें मोरेश्वर पंडितरायाच अधिकारी पुरुषांच्या सहीनें अखिल ब्रह्मवृंदास वगैरे काढलेलें एक पत्र राजवाडे खंड ८ ले. ४० पृ. ३६-८ वर छापलें आहे. त्यांत गंगाधर रंगनाथ नांवाच्या ब्राह्मणांस पंक्तिपावन केल्याचें जाहीर केलें आहे. या पत्रावर महेशदासाखालीं केशव पंडितानें आपलें "संमत" घातलें आहे. यावरून केशवपंडित यावेळींहि दानाध्यक्ष असावा हें सिद्ध होत आहे.

केला आहे. ताराबाईनंतर शाहूनेंहि त्याचें पुढें चालविलें आहे. (पृ. १५७-८ स. मा.). ताराबाईनें रामचंद्राला दान दिलें हें अगदीं स्पष्ट आहे. परंतु राजारामानें दान दिलें तें केशवाला कीं रामचंद्राला हें नक्की होत नाहीं. राजारामाची सनद केशवभटाच्या नांवाची असेल तर केशवभट इ. स. १६९४पर्यंत हयात होता असें ठरेल. परंतु राजाराम चरित्रांत दिलेल्या माहितीवरून केशव इ. स. १६९०त वारला असावा असें वाटतें। तसें नसतें तर त्यानें इ. स. १६८९च्या नोव्हेंबरानंतरची कांहींतरीहि हकीकत सांगितली असती. यावरून इ. स. १६९४तील पत्र केशवाच्या 'मुलाचें चालवणें योग्य' म्हणून रामचंद्रालाच करून दिलें असावें: मौजे पुर्ये येथें हें कऱ्हाडे घराणें अद्याप नांदत असल्याचें माझे मेहुणे श्री. शिवराम गणेश गुप्ते यांनीं मुद्दाम तपास करून देवरूखहून कळविलें आहे.

केशवकवि जर शिवाजी संभाजी व राजाराम या तिघांच्याहि सांनिध्यांत दानाध्यक्षपणाचें काम पहात होता तर त्यानें प्रस्तुत चरित्रांतील त्यांचेबद्दल किंवा राजघराण्यांतील माणसांबद्दल कांहींच उल्लेख कां केला नाहीं हा प्रश्न उद्भवतो. तसा उल्लेख केला नाहीं हें स्पष्टच आहे. आणि तर्क करूं म्हटलेंच तर एकच गोष्ट शक्य दिसते कीं, बहुधा केशवानें शिवाजी संभाजी व राजाराम यांच्या कारकीर्दींतील निरनिराळ्या प्रसंगांचे निरनिराळे ग्रंथ रचले असावेत व त्या त्या प्रसंगानुसार विस्तार आल्यानें प्रस्तुत चरित्रांत प्रसंगविशेषाखेरीज अन्य गोष्टी लिहिण्याची जरूर भासली नसावी. हा तर्क स्वीकारला तर केशवपंडिताचे आणखीहि ग्रंथ सांपडले पाहिजेत आणि ते सांपडतील अशी आशाहि करण्यास पुष्कळ जागा आहे.

विजयादशमी
२१ आक्टोबर १९३१
१७८ बुधवार, पुणें.

वा. सी. बेंद्रे.

॥ श्री ॥

केशवकविकृतं

# राजारामचारितम्

## प्रथमः सर्गः

श्रीगणेशायनमः ।

(आर्या)

जयति रघुवंशतिलकः कौसल्यानंदवर्धनो रामः ।
दशवदननिधनकारी दाशरथिः पुंडरीकाक्षः ॥ १ ॥

(अनुष्टुप)

नमस्तस्मै मुनीशाय श्रीयुताय तपस्विने ।
सर्वज्ञानाधिवासाय तस्मै वाल्मीकये नमः ॥ २ ॥

(शार्दूलविक्रीडित)

त्रैलोक्याधिपतिः श्रियः पतिरसौ रामावतारत्रयं ।
कृत्वा संविदधे जगत्त्रयमिदं निःकोणपं सर्वतः ॥
भूयोयं जगतां शिवाय सद्यो मानुष्यदेहं दधत् ।
राजाराममहीपतिर्विजयते दिल्लीशदर्पापहः ॥ ३ ॥

(अनुष्टुप)

प्रणम्य जानकीनाथं राजाराममहीपतेः ।
यशःप्रबंधं तनुते पंडितः केशवाभिधः ॥ ४ ॥
श्रीमान्परशुरामोसौ यस्मिन् क्षेत्रे प्रपूज्यते ।
तत्क्षेत्रवासी विप्रस्तु विधिज्ञः सत्यवाक् शुचिः ॥ ५ ॥

---

१ अत्र मूले 'ल'स्थाने 'ळ' इति लिखितं । २ मूल०-जगत्रयमिदं ।

वेदवेदांगनिपुणः षट्कर्मनिरतः सुधीः ।
भगवद्भक्तिनिष्णातः सर्वप्राणिहिते रतः ॥ ६ ॥
न्यायार्जितधनेनैव कुटुंबपरिपोषकः ।
शंभुवर्मणि भूपाले दिष्टधर्ममुपेयुषि ॥ ७ ॥[3]
चिंतयामास मनसि कथं क्षेमं भवेन्नृणां ।
अस्मिन् कलियुगे घोरे महाम्लेच्छजयावहे ॥ ८ ॥
म्लेच्छराजेन सर्वत्र वर्णधर्मविघातिना ।
धर्मक्षेत्रेषु सर्वेषु नाशितेषु दुरात्मनः[4] ॥ ९ ॥
एवं चिंतयमानं तं स्वसमाधिमुपागतं ।
शुक्लवर्षे माघमासे शुक्लपक्षे शनेर्दिने ॥ १० ॥
चतुर्थ्यां भाविवृत्तान्तं राजारामजयावहं ।
शिवनारदसंवादरूपेणैव सविस्तरं ॥ ११ ॥
द्विजस्वप्ने समवदद्भवानीपतिसन्निभः ।
हिताय सर्वलोकानां भक्तानुग्रहणाय च ॥ १२ ॥
कदाचिन्नारदो योगी त्रिदिवं गिरिशालयात् ।
जगाम सत्कृतस्तत्र देवेंद्रप्रमुखैः सुरैः ॥ १३ ॥
विज्ञापितः प्रश्रयेण भगवान्भुवनत्रये ।
आश्चर्यं[5] किं त्वया दृष्टं हर्षवानिव लक्ष्यसे ॥ १४ ॥
नारदस्तां तदा प्राह देवेंद्रममितद्युतिः ।
गौरीपतिं नमस्कर्तुं गतोऽहं[6] रजताचलं ॥ १५ ॥
तत्रोमासहितं रुद्रं प्रणम्य पुरतः स्थितः ।
एतस्मिन्नंतरे शिष्यो भार्गवस्य महात्मनः ॥ १६ ॥[7]
महेंद्राचलसंस्थस्य समायाद्गिरिशांतिकं ।
प्रणम्य दंडवद्भूमौ बद्धांजलिरभाषत ॥ १७ ॥
अंतेवासी भार्गवस्ते यद्विज्ञापयति प्रभो ।
श्रूयतां करुणासिंधो भक्तानां भयभंजन ॥ १८ ॥
स्वामिन् सह्याचले पूर्वं दत्वा स्वं परशुं शुभं ।
स्थापितो दुष्टशिक्षार्थं भक्तसंरक्षणाय च ॥ १९ ॥

---

३ मूलग्रंथपृष्ठं १ समाप्तं ।
४ मूल०-दुरात्मना ।
५ मूल०- आश्चिर्यं ।
६ अत्र मूले अवग्रहलोपोऽस्ति ।
७ मूलग्रंथपृष्ठं २ समाप्तं ।

एतावत्कालपर्यंतं तवाज्ञाविहितः प्रभो ।
सांप्रतं कलिकंदेन सार्वभौमाभिमानिना ॥ २० ॥
उत्सादितो धर्मसेतुर्हेतुः पुण्यस्य कर्मणः ।
भूमिः पापभराक्रांता कर्तव्यं किमतः परं ॥ २१ ॥
नास्ति तन्निग्रहे शक्तिर्महेंद्रादि सुरेष्वपि ।
भूमिपालेषु मुनिषु ब्राह्मणेषु महत्स्वपि ॥ २२ ॥
वैष्णवं दाशरथिना धनुर्नीतं पुरा मम ।
परशुः खंडितः पूर्वं क्रौंचाचलविभेदने ॥ २३ ॥
इदानीमस्य दमने त्वमुपायं कुरु प्रभो ।
इति विज्ञाप्य शिष्यस्तु तूष्णीमास शिवाग्रतः ॥ २४ ॥
ततः स भगवानाह मेघगंभीरया गिरा ।[९]
न भयं कलिकंदाद्धः संभविष्याति भार्गव ॥ २५ ॥
कुभांडो नाम दैत्येंद्रस्तपसा तोषयद्धि मां ।
तस्मै दत्तं प्रसन्नेन सार्वभौमपदं मया ॥ २६ ॥
अवधिश्च कृतस्तस्य यदा त्वं भार्गवाश्रमं ।
विलुंठयसि दर्पेण रामराज्यं जिघृक्षसि ॥ २७ ॥
तद्राज्यं ब्रह्मभूयिष्ठं तदाप्स्यसि पराभवं ।
भवशालाख्यवंशे हि राजारामो महीपतिः ॥ २८ ॥
ब्राह्मण्यश्च वदान्यश्च हरेरंशं प्रतापवान् ।
सुरांशभूतैः सचिवैर्ब्राह्मणैः क्षत्रियैर्वृतः ॥ २९ ॥
मम भक्तवरः श्रीमानवतीर्णो धरातले ।
कलिकल्मषनाशाय धर्मसंरक्षणाय च ॥ ३० ॥
कुलांडस्याभिमानं तु सोपनेष्यति सांप्रतं ।
इति श्रुत्वा शिवोद्गीतं शिष्यः प्रायात्कृतानतिः ॥ ३१ ॥
नारदस्तु ततः स्तुत्वा भगवंतं सनातनं ।
प्रश्रयेण वदद्वृत्तं यथादृष्टं महीतले ॥ ३२ ॥
भगवन् भवतो भक्तो रामवर्मा महीपतिः ।
हृतश्रीः कलिकंदेन सार्वभौमाभिमानिना ॥ ३३ ॥
अधुना स कथं स्वीयं राज्यं प्राप्स्यति भूपतिः ।[११]

---

८ मूल०-तवाज्ञाविहिता ।
९ मूलग्रंथपृष्ठं ३ समाप्तं ।
१० मूल०-कृथं ।
११ मूलग्रंथपृष्ठं ४ समाप्त ।

कृपया तद्वद स्वामिन् दीनबंधो दयानिधे ॥ ३४ ॥
भगवांस्तु ततः प्राह नारदं दिव्यदर्शनं ।
स राजा मम सद्भक्तः सर्वधर्माभिरक्षकः ॥ ३५ ॥
म्लेच्छाक्रांतं निजं राष्ट्रं दृष्ट्वा स्वीयं बलं तथा ।
नयप्रचारचतुरैरमंत्रयत मंत्रिभिः ॥ ३६ ॥
युद्धं तत्राभिमन्यन्त केचिच्छूरा जयैषिणः ।
केचिद्दानं साम केचित् भेदं केचित्तथाश्रयं ॥ ३७ ॥
इति नानाविधधियो यथाप्रज्ञं समूचिरे ।
मंत्रिभिर्मंत्रितं तत्तु नास्पृशन्नृपमानसं ॥ ३८ ॥
ततो मद्भक्तमुख्येन वृद्धसम्मतबुद्धिना ।
समेन वाचस्पतिना सर्वलोकहितैषिणा ॥ ३९ ॥
[12]सर्वश्रीकरणेनाशु श्रीमत्प्रह्लादशर्मणा ।
महत्त मतिसामर्थ्यशालिना बोधितो नृपः ॥ ४० ॥
राजेंद्र समयोस्माकं विपरीतः परस्य तु । [13]
अनुकूल इवाभाति तस्माद्युद्धं न रोचये ॥ ४१ ॥
सामाद्युपायाः सर्वेऽपि[14] निग्रहार्ये खलस्य हि ।
न प्रीतिं जनयिष्यंति पूर्ववैरानुबंधिनः ॥ ४२ ॥
तस्मात्स्वीयां राज्यधुरं रामचंद्रे धुरंधरे ।
अनाहार्ये रामभक्ते विश्वास्ये वीरसंमिते ॥ ४३ ॥
शौर्यौदार्यगुणापेते यशस्विनि महामतौ ।
अमात्यनीलकंठस्य सुते संस्थापय प्रभो ॥ ४४ ॥
त्वं तु कैश्चिन्नरैर्युक्तः कर्नाटं गच्छ सत्वरं ।
स्वराज्यरक्षणे यत्नं कुरु राजन्नतांद्रितः ॥ ४५ ॥
इति प्रह्लादवचनं सुराचार्यनयानुगं ।
संमतं मंत्रिमुख्यस्य नीलकंठस्य धीमतः ॥ ४६ ॥
श्रीमोरेश्वरपुत्रस्य शुभवैभवशालिनः ।
श्रुत्वा विमाव्य मनसि हर्षं प्राप्यातुलं नृपः ॥ ४७ ॥ [16]
रामचंद्राख्य सचिवे मौले राज्यधुरंधरे ।
राज्यं विन्यस्य सकलं राज्यांगाविकलं प्रभुः ॥ ४८ ॥

---

१२ मूळ०-सर्वे श्रीकर० ।
१३ मूळपंचपृष्ठं ५ समाप्तं ।
१४ मूळ०-निग्रहान्ये ।
१५ मूळ०-शौर्यौदार्यगुणोपेने ।
१६ मूळपंचपृष्ठं ६ समाप्तं ।

सार्धं प्रधानपुरुषैः प्रह्लादप्रमुखैर्द्विजैः ।
मार्गे बहुविधान्विघ्नान् विनिवार्य महामतिः ॥ ४९ ॥
भैरजीकं घोरफडं सुग्रीवसमविक्रमम् ।
मित्रं लब्ध्वा महाबाहुर्महासाहसिकं बली ॥ ५० ॥
मदेकभक्तियोगेन कर्नाटं प्राप्स्यसि ध्रुवं ।
तत्र गत्वा राजगडोपत्यकाचंद्रिपत्तने ॥ ५१ ॥
महेंद्रनगरीरम्ये साम्राज्यं स विधास्यति ।
इति श्रुत्वा नारदस्तु शंकरं प्राह विस्मितः ॥ ५२ ॥
ब्राह्मणः साधनैर्हीनः कंटकैः परिवेष्टितं ।
रामचंद्रः कथं राज्यमनंगं पालयिष्यति ॥ ५३ ॥
ततो ब्रवीद्भवानीशो नारदं परमादरात् ।
राजारामस्य सद्भक्तेर्मया साम्राज्यमर्पितम् ॥ ५४ ॥[17]
हरेश्चतुर्थोवर्तारो[18] रामवर्मा ह्यसंशयं ।
तत्सेवानिरतस्यास्य द्विजस्यावेहि वैभवम् ॥ ५५ ॥
राजाराम[19]नृपे स्वीयैर्गते कर्नाटकं तदा ।
इति श्रीरामसचिवः परां चिंतामवाप्स्यति ॥ ५६ ॥
पालितं वीरमुख्यैर्यच्छ्रीशिवप्रमुखैर्नृपैः ।
मोरेश्वरप्रभृतिभिः प्रधानपुरुषैरिदम् ॥ ५७ ॥
सप्तांगसहितं राज्यं पराभेद्यं समृद्धिमत् ।
इदानीमंगाविकलं पालयामि कथं त्विदम् ॥ ५८ ॥
इति चिंतयं[20]तस्तस्य स्वप्ने श्रीजानकीपतिः ।
द्विजवर्यस्वरूपेण श्रीफलं संप्रदास्यति ॥ ५९ ॥
तदौ[21] हि शौर्यधैर्यादि गुणास्तस्मिन्महामतौ ।
प्रादुर्भूता भविष्यंति शूराणां सौख्यवर्धनाः ॥ ६० ॥
ततः प्रभृति भूपस्य सम्मतः सचिवोत्तमः ।
राजारामस्य तद्राज्यं गिरिदुर्गाणि भूरिशः ॥ ६१ ॥
म्लेंच्छराजगृहीतानि गिरिदुर्गाणि भूरिशः ।[22]
म्लेंच्छराजगृहीतानि विद्रुतानि बलानि च ॥ ६२ ॥
सत्यवाक्यामृतेनैव संगृहीष्यति सत्वरम् ।

---

१७ मूलग्रंथपृष्ठं ७ समाप्तं ।
१८ मूल०-हेश्चतुर्थोवतरो ।
१९ मूल०-राजारामन्यपे ।
२० मूल०-चिंतयस्तस्य ।
२१ मूल०-तदादि ।
२२ मूलग्रंथपृष्ठं ८ समाप्तं ।

म्लेंच्छरायवधूनाथान् जेष्यति स्वबलेत्तथा ॥ ६३ ॥
सर्वेषु दुर्गदेशेषु राजाराममहीपतेः ।
म्लेंच्छराजगृहीतेषु शासनं वितनिष्यति ॥ ६४ ॥
सचिवानुष्ठितं त्वेवं संश्रुत्य स महीपतिः ।
संप्रहृष्टमना भूत्वा स्वदेशबलसंयुतः ॥ ६५ ॥
कार्नाटबलसंपन्नः सर्वैश्वर्ययुतः प्रभुः ।
म्लेंच्छराजं पराजित्य संमान्य सचिवोत्तमम् ॥ ६६ ॥
कलत्रपुत्रसंपन्नः प्रधानपुरुषैर्वृतः ।
रायदुर्गे गिरिवरे स्थित्वा सिंहासनोत्तमे ॥ ६७ ॥
श्रीसीतापतिवत्सर्वां पालयिष्यति मेदिनीं ।
इति शंभुमुखात् श्रुत्वा भाविवृत्तं महीपतेः ॥ ६८ ॥
राजारामस्य भवन् हर्षोऽस्माकं महानभूत् ॥ ६९ ॥
स्वप्नमेवंविधं दृष्ट्वा प्रतिबुध्य द्विजोत्तमः । [२३]
अतुलं हर्षमापेदे चिंताभयविवर्जितः ॥ ७० ॥

(शार्दूलविक्रीडित)

श्रुत्वा तत्स्वप्नवृत्तं द्विजवरगदितं लोकसंतोषबीजम् ।
राजारामस्य नित्यं विजयविभवदं पंडितः केशवाख्यः ॥
आनंदाब्धौ निमग्नः समरचयदमुं रामराजप्रभावम् ।
स्तोयैः पद्यैरनेकैरिह वदति पुरस्तत्प्रधानप्रभावम् ॥ ७१ ॥ [२४]

इति श्रीराजारामचरिते केशवपंडितकृतौ स्वप्नवृत्तं नाम प्रथमः सर्गः ॥

---

२३ मू० सन्नत्य ।     २४ मूलग्रंथपृष्ठ ९ समाप्त ।

## द्वितीयः सर्गः

(अनुष्टुप)

कर्नाटकगतं भूपं श्रुत्वा स यवनेश्वरः ।
बलानि प्राहिणोत्तत्र स्वयमन्वागमद्बली ॥ १ ॥
रामचंद्रस्य विषये संस्थाप्य म्लेंच्छनायकान् ।
वसतीर्विंशतीर्गत्वा सुश्राव नृपविक्रमम् ॥ २ ॥
कर्नाटविषयैर्भूपैरेकीभूय महीपतेः ।
उपायनानि दत्तानि धनानि विविधानि च ॥ ३ ॥
सेना बहुविधाः स्वीया दानमानप्रतोषिताः । [२५]
प्रेषितास्तस्य सेवार्थे म्लेंच्छसंमर्दनक्षमाः ॥ ४ ॥
स्वमित्रबलसंपन्नो राजारामः प्रतापवान् ।
युद्धायागच्छतीत्येतत् श्रुत्वा दीनमनाभवत् ॥ ५ ॥
तद्भयेनैव मार्गेऽसौ न्यवसत्पृतनावृतः ।
तत्प्रयुक्तानि सैन्यानि कष्टेन पुरतोऽगमत् ॥ ६ ॥
एतस्मिन्नंतरे म्लेंच्छ नायकैर्देशविप्लवः ।
प्रारब्धो गिरिदुर्गाणि संगृहीतानि कानिचित् ॥ ७ ॥
वेष्टितानि पराण्यासन् स्वीयापि[२६] परपक्षगाः ।
जातास्तदा रामचंद्रश्चिंतयामास चेतसि ॥ ८ ॥
राज्ञा मद्धस्तविन्यस्तं राज्यमेतज्जिघृक्षवः ।
परितो यवनाः प्राप्ताः सर्वांगविकलं त्विदम् ॥ ९ ॥
राज्यं कथं मया रक्ष्यं सत्यसंधेन मानिना ।
रिपुर्महाबलः श्रीमान् निकटे वर्तते मम ॥ १० ॥
दूरदेशस्थितः स्वामी महाराजोधुना मम ।
इत्येवं चिंतितार्थस्य स्वप्ने सीतापतिः स्वयम् ॥ ११ ॥
चिंतामणिस्वरूपेण श्रीफलं दत्तवाँस्तदा । [२७]
प्रातः स्वप्नं द्विजाग्र्यान् सः श्रावयित्वा द्विजाग्रणीः ॥ १२ ॥
सर्वेतं भूसुराः प्रोचुर्विजयस्तव संप्राति ।
भविष्यति न संदेहो रामांघ्रिन्यस्तचेतसः ॥ १३ ॥

---

२५ मूलग्रंथपृष्ठं १० समाप्तं ।
२६ स्वीयापि=स्वियः अपि ।
२७ मूलग्रंथपृष्ठं ११ समाप्तं ।

इति द्विजवचः श्रुत्वा स प्रभुः प्रीतिमानभूत् ।
स्वीयेषु दुर्गदुर्गेषु समाक्रांतेषु शत्रुभिः ॥ १४ ॥
न चचाल निजस्थानात् संक्षुब्धोऽब्धिरिवापरः ।
श्रीमत्परशुरामाख्यस्तदा क्षत्रियवृत्तिमान् ॥ १५ ॥
रामचंद्रकरांभोजसंजातः प्रथितः क्षितौ ।
तद्धितैषी तद्यशोर्थी तत्सेवानिरतः शुचिः ॥ १६ ॥
एकांते सुखमासीनं तं विज्ञापयति स्म सः ।
स्वामिन् राज्यमिदं राज्ञा न्यस्तं त्वद्धस्तपंजरे ॥ १७ ॥
लुठितं सकलैर्म्लेंच्छैः स्वीयैरपि दुरात्मभिः ।
दुर्गाणि संगृहीतानि स्वीयैरपि परैरपि ॥ १८ ॥
विशाळगिरिदुर्गं हि सांप्रतं विद्यते तव ।
अत्रापि दुर्गसामग्री परिपूर्णैव भाति मे ॥ १९ ॥
परितो यवनाक्रांतो देशः संप्रति वर्तते ।
दूरदेशे स्थितः स्वामी कोशहते विपुलः प्रभो ॥ २० ॥[२९]
तदिदानीं विक्रमस्व परेषां विजयाय भोः
इति तद्वचनं श्रुत्वा स्मितं कृत्वा महामतिः ॥ २१॥
रामं परशु पूर्वं तं जिगीषुः प्रशशंसह ॥
ततो निजामशिक्षायै संताजीकं महाबलम् ॥ २२ ॥
उपनाम्ना घोरफडं धनाजी जाधवं तथा ।
वीरमान्यं वीरतरं समादिश्य प्रहर्षितः ॥ २३ ॥
प्रस्थानतूर्यनिनदं कारयामास तत्क्षणम् ।
ततः श्री सचिवः सैन्यैः षड्विधैः परिवारितः ॥ २४ ॥
सुमुहूर्ते शुभे लग्ने प्रस्थानमकरोत्प्रभुः ।
महिमत्तगिरिं गत्वा संगमेशपुरं प्रति ॥ २५ ॥
गत्वा ताम्रचमूनाथं प्रबलं युद्धदुर्मदम् ।
पराजित्य तदश्वांस्तान्गृहीत्वा युद्धलालसः ॥ २६ ॥
भारेरायमुखांश्चोरान्शृंगारपुरवासिनः
बंदीकृत्य गमत्तूर्णं गुणवंतगडं प्रति ॥ २७ ॥
तद्दुर्गमात्मसात्कृत्वा विद्राव्य गिरिवासिनः ।
तत्र स्वीयान्प्रतिष्ठाप्य दुर्गं सुंदरनामकम् ॥ २८ ॥

---

२८ मूल०-सकळैर्मेच्छैः ।          २९ मूलग्रंथपृष्ठं १२ समाप्तं ।

वशीचक्रे तथा दंतपाटणस्थं धरापतिं ।
वसंतदुर्गमगमत् पदातिबलसंवृतः ॥ २९ ॥
निजामविजयार्थं यान् संत घोरफडादिकान् ।[30]
प्रथमं प्राहिणोत्तैर्हि निजामः परिलुंठितः ॥ ३० ॥
गजाश्वादि धनं तस्य बह्वानीतं तदारणात् ।
भूधरोपत्यकायां तु जीवमात्रावशेषितः ॥ ३१ ॥
गतश्रीः शस्त्रभिन्नांगः करवीरं ययौ खलः ।
ततो घोरफडाद्यास्ते समीयुः सचिवांतिकम् ॥ ३२ ॥
ते तदा सत्कृतास्तेन म्लेच्छयुद्धे मनो दधुः ।
आगतं सचिवं श्रुत्वा शिवराजप्रवर्धिताः ॥ ३३ ॥
नायकाः पत्तिसंधानां समागच्छन् प्रहर्षिताः ।
गृहीतदुर्गाः केचिच्च केचिद्दुर्गजिघृक्षवः ॥ ३४ ॥
केचिद्युयुत्सवो म्लेच्छैरश्वसेनायुताः परे ।
संमार्जितुं निजागांसि नृपसेवाविधित्सया ॥ ३५ ॥
पादयोः पतिता राजसचिवस्य महात्मनः ।
ततस्तानुक्तिसत्कारैः सत्कृत्याशु प्रहर्षयन् ॥ ३६ ॥
स प्रदायाभयं तेषां तत्तत्कार्येष्वयोजयत् ॥ ३७ ॥

(पुष्पिताग्रा)

अथ नृपसचिवः प्रहर्षितः स्वं
बलमतुलं समनोत्सुकं विलोक्य ।
यवनजलधिशोषकुंभयोनिः
मतिमदधाद्विजयाय सिंहनाम्नः ॥ ३८ ॥
इति श्रीराजारामचरिते काव्ये द्वितीयः सर्गः ॥[32]

---

३० मूलग्रंथपृष्ठं १३ समाप्तं । ३२ मूलग्रंथपृष्ठं १४ समाप्तं ।
३१ मूल० संप्रदाया० ।

# तृतीयः सर्गः

(अनुष्टुप)

अथ श्रीरामराजस्य भाविवृत्तं पुरंदरः ।
श्रुत्वा प्रोवाच सदसि त्रिकालज्ञं मुनीश्वरम् ॥ १ ॥
महर्षे रामराजासौ वीरव्रतमशिक्षितः ।
सुकुमारोऽनभिज्ञश्च क्लेशानां मार्गगामिनाम् ॥ २ ॥
आमनोर्नृपवंशस्य करीरः प्रियदर्शनः ।
राजलक्षणसंपन्नः प्रियवक्ता प्रियंकरः ॥ ३ ॥
जनानां प्राणरूपोऽसौ तेजस्वी भाविविक्रमः ।
सीतया प्राणसमया पट्टराज्ञासमन्वितः ॥ ४ ॥
महाराजेन पित्रास्य घातुकेन महीभृताम् ।
श्रीशिवछत्रपतिना सिंहासननिषेदुषा ॥ ५ ॥
संभाजीकेन च भ्रात्रा ज्वलज्ज्वलनतेजसा ।
विलुंठितेषु सर्वेषु पौरजानपदेषु च ॥ ६ ॥
दस्युभिः कंटकाकारैः समाक्रांतासु वीथिषु ।
मेघवर्षेण नितरामुत्तटासु सरित्सु च ॥ ७ ॥
कथं कर्नाटकं प्रागात् कथ्यतां तन्महामुने ।
देवर्षिः प्राह देवेंद्रं महेंद्रं श्रुणु भूपतेः ॥ ८ ॥
राजारामस्य विजयगतिं[33] कर्नाटकं प्रति ।
प्रधानपुरुषैः सार्धं मंत्रयित्वा महीपतिः ॥ ९ ॥[34]
पाराशरे दुर्गवरे दुर्गादेवीं वरप्रदाम् ।
प्रतिपादिनमारभ्य नवरात्रे विशेषतः ॥ १० ॥
पूजयित्वान्वहं देवीं तत्पदन्यस्तमानसः[35] ।
त्रिकालेपूजनैर्धूपैर्दीपैर्नीराजनादिभिः ॥ ११ ॥
नानोपहारैश्च तथा जपैर्ब्राह्मणभोजनैः ।
नटनर्तकगीतैश्च बह्वीनां वारयोषिताम् ॥ १२ ॥
सुंदरीणां प्रमत्तानां यौवनेन मदेन च ।
नृत्तैर्बहुविधैश्चापि गीतैरपि दिवानिशम् ॥ १३ ॥

---

३३ मात्रालोपः । ३५ मूल॰-तत्पदन्यस्तमानः ।
३४ मूलग्रंथपूर्णं ३५ समाप्तं ।

तथा डमरुहस्तानां चंडमुंडविधारिणाम् ।
तुलजाभक्तिसक्तानां तांडवैश्च विशेषतः ॥ १४ ॥
मेषच्छागसहस्राणां मंडलोपरि धावताम् ।
स्वरवच्छिन्न[36]शिरसां सद्यः स्वर्गमुपेयुषाम् ॥ १५ ॥
बलिदानैरसंख्यातैः कुमारीपूजनैस्तथा ।
सुवासिनीनां साध्वीनां पूजनैर्भोजनैस्तथा ॥ १६ ॥
बंदिनां स्तुतिपाठैश्च नानादेशनिवासिनाम् ।
प्रेक्षणीयैर्बहुविधैर्भवानीं प्रीणयन्नृपः ॥ १७ ॥
अथ स्वप्ने भवानी तं राजानं भक्तवत्सला ।
उवाच पुत्र मा भैषीर्बिल्वशाखार्चनं कुरु ॥ १८ ॥[37]
सर्वे विघ्ना विनश्यंति सफलस्ते मनोरथः ।
भविष्यति न संदेहो रामः खलु भवान् हरिः ॥ १९ ॥
यथाहं दाशरथिना सुस्थितेन कुशासने ।
दशाननवधार्थाय प्रार्थिता वरदायिनी ॥ २० ॥
वरं दत्तवती तुभ्यं तत्प्रसादेन रावणः ।
त्वया हतो महाबाहो सपुत्रबलवाहनः ॥ २१ ॥
तदिदानीं महाराज राजीवसमलोचन ।
मया सुगुप्तः सततं यत्रकुत्रापि गच्छ भोः ॥ २२ ॥
दुर्बुद्धयो न शक्ष्यंति द्रष्टुं त्वां किमुधर्षितुम् ।
एवं भवानी तं भूपं सांत्वयित्वा महानिशि ॥ २३ ॥
पुरतस्तस्य नृपतेरंतर्धिमगमद्द्रुतम् ।
ततः प्रभाते नृपतिर्द्विजाग्र्येभ्यः प्रशंस तत् ॥ २४ ॥
द्विजाभयमिति प्रोचुर्यथार्थं देवभाषितम् ।
ततो नृपः समादिश्य बिल्वशाखाविधौ द्विजान् ॥ २५ ॥
श्रीविठ्ठलकेशवमुखान् साचार्यान्सपुरोहितान् ।
कृतं तैर्विधिवत्तत्र बिल्वशाखाप्रबोधनम् ॥ २६ ॥
भगवत्याः सुराधीश तेनाजय्यो नृपोऽभवत् ।
ततो नवम्यां भूपालैः सुस्नातः कृतमंगलैः ॥ २७ ॥
जापकैर्ब्राह्मणैः सार्धं होमारंभमचीकरत् ।
पूजयित्वा गणपतिं कृत्वा पुण्याहवाचनम् ॥ २८ ॥[38]

---

३६ मूल०-स्वरवद्राच्छिन्नशिरसां ।
३७ मूलग्रंथपृष्ठं १६ समाप्तं ।
३८ मूलग्रंथपृष्ठं १७ समाप्तं ।

होममारेभिरे विप्राः कृतकौतुककंकणाः ।
होमावसाने नृपतिः ब्राह्मणैः सह मंत्रवित् ॥ २९ ॥
जयप्रशानि नृपतेश्चिन्हानि समुदैक्षत ।
विधूम्रो विस्फुलिंगश्च रथमेघसमस्वनः ॥ ३० ॥
प्रदक्षिणाशिखोद्दीप्तः स्वर्णवर्णः शुभाकृतिः ।
प्रहुतेषु च हव्येषु यदा स्वीदृग्घुताशनः ॥ ३१ ॥
मंडलाधिपते राज्ञस्तदा विद्यान्महाजयम् ।
इति द्विजेभ्यः श्रुत्वासौ नृपः प्रमुदितोऽभवत् ॥ ३२ ॥
ततः पूर्णाहुतिर्दत्वा वन्हौ प्रज्वालिते शुभे ।
गजहस्तप्रतीकाशां वसोर्धारामपातयत् ॥ ३३ ॥
ब्राह्मणैः पठ्यमानेषु मंत्रेषु स्वरपूर्वकम् ।
वदत्सु बंदिमुख्येषु नृपस्य बिरुदावलीः ॥ ३४ ॥
नृत्यत्सु वारमुख्यासु हरितो बाधिराभवत् ।
एवं समाप्य होमं तु द्विजान्संपूज्य भक्तितः ॥ ३५ ॥
दक्षिणां प्रददौ तेभ्यो यथायोग्यं स्वशक्तितः ।
ततः पुनर्महादेवीं महादेवमनःप्रियाम् ॥ ३६ ॥
पूजयित्वा पुनः स्तुत्वा प्रणिपत्य पुनःपुनः ।
क्षमाप्य लोकजननीं भक्ताभयविधायिनीम् ॥ ३७ ॥
पारोकं विधिवच्चक्रे तुष्टपुष्टजनैर्वृतः ।
नटनर्तकसंवेभ्यः कुलेभ्यो वारयोषिताम् ॥ ३८ ॥
सर्वेषां स्तुतिकर्तॄणां कवीनां च विशेषतः ।
प्रीत्या वित्तं बहु प्रादात् वस्त्राण्याभरणानि च ॥ ३९ ॥[४१]

(इंद्रवज्रा)

एवं भवान्या नवरात्रयोग्यम् ।
महोत्सवं लोकमनोऽभिरामम् ॥
संपाद्य राजा मनसा तुतोष ।
निराधिना भूपति चक्रवर्ती ॥ ४० ॥

इति श्रीमहाराजाधिराजमहाराजछत्रपतिराजारामचरिते केशवपंडितकृतौ नवरात्रमहोत्सवो नाम तृतीयः सर्गः ॥

---

३९ मूल० विधूमो ।
४० मूल०-धाराणां ।
४१ मूलग्रंथपृष्ठ १८ समाप्त ।

# चतुर्थः सर्गः

(अनुष्टुप)

ततः प्रभाते नृपतिः संपाद्यावश्यकं विधिम् ।
संपूज्य देवान्विप्रांश्च बुभुजेऽन्नं चतुर्विधम् ॥ १ ॥
मंत्रिभिस्तुरगारूढैः गजारूढः स्वयं ततः ।
मुख्येन सेनापतिना तथान्यैः सैन्यनायकैः ॥ २ ॥
पत्तिभिः पत्तिदलपैः[42] गजस्थैर्हयसादिभिः ।
ब्राह्मणैः क्षत्रियैर्वैश्यैर्शूद्रैरन्यैः समान्वितः ॥ ३ ॥
विभूषितैः सुवस्त्राद्यैर्जयमंगलवादिभिः ।
तुरंगाः शिक्षितास्तज्ज्ञैरुर्भावर्तान[43] महाजवान् ॥ ४ ॥
शुभपल्याणसंयुक्तानुन्नतान्भूषितांस्तथा ।
महागजान् भद्रमंद्रमृगजातिकुलोद्भवान् ॥ ५ ॥
कुथाढ्यान् शिक्षितांस्तज्ज्ञैर्लोलघंटानलंकृतान् ।
पुरस्कृत्यागमद्राजा मुहूर्ते विजयाभिधे ॥ ६ ॥
अपराजितादिग्भागे शम्यश्मंतकभूरुहौ ।
संपूज्य विधिवत्तत्र महोत्साहो महाद्युतिः ॥ ७ ॥
संस्तूयमानः कविभिर्जगाम निजमंदिरम् ।
तत्र नीराजितो दारैरुदारैः प्रेमवर्धनैः ॥ ८ ॥[44]
अतिचक्राम रजनीं सांत्वयन्वामलोचनाः ।
अथो ये कलिकंदेन पाराशरगिरिग्रहे ॥ ९ ॥
नियुक्ताः म्लेच्छनाथास्ते परिवव्रुर्गिरिं तदा ।
आवृतं म्लेच्छसैन्येन गिरिमालोक्य भूपतिः ॥ १० ॥
तुच्छीकृत्य तु तान्सर्वान्महाम्लेच्छविनाशकः ।
नारायणसुते श्रीमच्छंकरे लोकशंकरे ॥ ११ ॥
राज्यैकदेशं निदधे क्षारिदुर्गसमाश्रयम् ।
रामचंद्रे तु सकलं राज्यं विन्यस्य गूढधीः ॥ १२ ॥
तस्य हस्ते धनाजीकं संताजीकं च शंकरम् ।
अश्वसेनाधिपान् सर्वान् तथा पत्तिगणाधिपान् ॥ १३ ॥

---

४२ मूल०-ुग्गा ।

४३ मूल०-शिक्षितास्तज्ज्ञैमुषा० ।

४४ मूलग्रंथपृष्ठं १९ समाप्तं ।

दत्वा सामाहितमना गमनाय मतिं दधौ ।
द्विजाग्र्येभ्यस्तदा दत्त्वा दानानि विविधानि च ॥ १४ ॥
द्विजैः कृतस्वस्त्ययनः केशाद्यैर्विशेषतः ।
अथ पांथोचितं वेषं विधाय नृपसत्तमः ॥ १५ ॥
मंगलानि समालभ्य कृत्वा गां च प्रदक्षिणाम् ।
प्रतस्थे नृपशार्दूलः साकेतपतिवद्वनम् ॥ १६ ॥
अग्रे सेनापतिः पश्चात् मानसिंघोऽरिमर्दनः ।
सत्यप्रतिज्ञः प्रह्लादः श्रीप्रह्लाद इवापरः ॥ १७ ॥
हरिभक्तः सुमतिमान् नृपसेवाविशारदः ।[४५]
तद्वस्तकोऽनंतसुतः कृष्णशर्मा महामतिः ॥ १८ ॥
तथा प्रधानः सुमतिर्नीलकंठश्च सानुजः ।
मोरेश्वरतनूजन्मा संभाव्यमतिविक्रमः ॥ १९ ॥
तत्करांभोजसंजातः सत्ववानुद्धवाभिधः ।
अन्वगच्छन्महीपालं महीपालहिते रतः ॥ २० ॥
कृष्णात्मजो नीलकंठः स्वामिसेवाविचक्षणः ।
सदा नृपहिते सक्तः प्रियवक्ता प्रियंकरः ॥ २१ ॥
खंडोबल्लाळमुख्याश्च कायस्थाश्चित्रगुप्तजाः ।
चंद्रसेनान्वयाश्चान्ये श्रीदाल्भ्यकृतगोपनाः ॥ २२ ॥
बाजीकदमनामाथ खंडोजीकोदमस्तथा ।
एते चान्ये च तं भूपमनुजग्मुः पुरंदरम् ॥ २३ ॥
सर्वे तुरंगमारूढाः प्रलयंतः परस्परम् ।
न ज्ञाताः परिधिस्थैस्तैर्म्लेच्छैरेते विमोहितैः ॥ २४ ॥[४६]
हेमंतो धावमानास्ते तुरंगाः पथि संकटे ।
नृपप्रभावाद्गच्छन्तो नैव दृष्टा दुरात्मभिः ॥ २५ ॥
तथैवोन्मार्गगा मार्गे स्रवंती कलुषोदकाः ।
तीर्णाः श्रीरामराजस्य प्रभावादनुयायिभिः ॥ २६ ॥
कृष्णमृत्स्नान्वितक्षेत्रे निदाघे न चलंति ये ।
ते तुरंगाः पंकचिते मार्गे गच्छन्त्यथांगणे ॥ २७ ॥
हिंस्रा व्याघ्रादयस्तद्वदुरगा भयहेतवः ।

---

४५ मूलग्रंथपृष्ठं २० समाप्तं । ४६ मूल०—परिधिस्थैस्तैर्म्लेच्छै० ।

न दृष्टिविषयं याता रामराजानुयायिनाम् ॥ २८ ॥[47]
ये रामराजानुगताः सर्वे ते पुण्यशालिनः ।
गच्छतस्तस्य सा रात्रिरल्पिकेवाभवत्तदा ॥ २९ ॥
अथोदयाद्रि तिलकेऽभ्युदिते दिननायके ।
कृष्णातटं समापेदे रामः स्वजनसंयुतः ॥ ३० ॥
तां कृष्णां स्वतनुं साक्षाद्दृष्ट्वा हर्षसमाकुलः ।
स्वजनैः सहितो वीरः सस्नौ तत्र यथाविधि ॥ ३१ ॥
संतर्प्य पितृदेवांश्च नरदेहं विडंबयन् ।
ततो नृपानुगाः सर्वे तर्तुं कृष्णां समुद्यताः ॥ ३२ ॥
कृतप्रयत्ना अपि ते नोपायमुपलेभिरे ।
अथ भूपवरः श्रीमान् स्वानुभावप्रवर्तितः ॥ ३३ ॥
स्वभृत्यानित्यवोचन्मे भवंतो भवतानुगाः ।
सर्वेषां पुरतो भूत्वा परं पारं ययौ नृपः ॥ ३४ ॥
सर्वेऽप्यनुययुः शीघ्रं जानुजघ्नजलास्तदा ।
एवं गच्छन् महाराजः पथि म्लेच्छेशगोपिते ॥ ३५ ॥[48]
नानाविधजनैर्युक्तः पुनः प्राप सरिद्वराम् ।
कलिकंदस्यानुचरैः ज्ञातं तद्रामभूपतेः ॥ ३६ ॥
कर्नाटदेशगमनं कलिकंदनिकृंतकम् ।
म्लेच्छराजः कुमतिमान्वर्तते चंडशासनः ॥ ३७ ॥
श्रीरामराजयाज्ञायां यदि विघ्नं न कुर्महे ।[49]
ज्ञात्वास्मान्शत्रुपक्षीयान् घातयिष्यति निश्चितम् ॥ ३८ ॥
इत्येवं निश्चितधियः पथि विघ्नान्यकुर्वत ।
सेनापतिस्तदा तस्य दैवहीनोऽर्थतत्परः ॥ ३९ ॥
नृपतत्त्वानभिज्ञोऽसौ पश्चाद्गतिमुपाययौ ।
तद्वीसमधियोऽन्येऽपि तामेव गतिमन्वयुः ॥ ४० ॥
तेषां तथा गतिं श्रुत्वा चारेभ्यो भीमविक्रमः ।
स्थिरबुद्धिर्महातेजाः धैर्यान्न चलति स्म सः ॥ ४१ ॥
ततः श्रीरामसेवायै भैरजीकः समागमत् ।

---

४७ मूलग्रंथपृष्ठं २१ समाप्तं ।
४८ पाठभेदः—म्लेच्छेशपालिते ।
४९ मूल०-कर्णाटदेश० ।
५० मूलग्रंथपृष्ठं २२ समाप्तं ।

युतो मल्लजिता भ्रात्रा घरघोरपडाम्बयः ॥ ४२ ॥
कर्पीन्द्रतुल्यसामर्थ्यः स्वसैन्यपरिवारितः ।
राजारामस्य चरणावानम्य स्थिरभक्तिवान् ॥ ४३ ॥
नृपमूचे महाबाहुः साहसी रिपुमर्दनः ।
मया ह्यनुचरेण त्वं महाराजहितैषिणा ॥ ४४ ॥
सेवितः सचिवैः सर्वैर्व्रज कर्नाटकं प्रति ।
मार्गे ये समुदेष्यंति विघ्नास्तान् त्वत्प्रसादतः ॥ ४५ ॥
निवारयिष्यामि विभो भगवत्पदसमाश्रयः ।
ततः सरिद्वरां तीर्त्वा राजारामो द्विजैर्वृतः ॥ ४६ ॥
ससैन्यभैरजीकेन युक्तः प्रायात्पथः क्रमात् ।[५१]
मार्गे मार्गे म्लेच्छपतेः सैन्यपालाः बलैर्वृताः ॥ ४७ ॥
सर्वान्पथः समावृण्वन् राजारामजिघृक्षया ।
तैः सार्धं संगरं चक्रुस्तत्र तत्र मदोद्धताः ॥ ४८ ॥
प्रासहस्ता[५२] महाराष्ट्रा रामप्रियचिकीर्षया ।
बहु युध्वा महावीरा म्लेच्छसेनाधिपैः सह ॥ ४९ ॥
तेषां सैन्यं च बहलं स्वीयमल्पं प्रबुध्यते ।
चिंताविष्टाः परिश्रांताः क्षुत्क्षामाः श्रांतवाहनाः ॥ ५० ॥
यदा जातास्तदा रामप्रभावेन प्रवर्तितौ ।
भवशालो रूपसिंहः स्वसैन्येन समन्वितः ॥ ५१ ॥
जगत्स्थापकसंताजिद्वारौ वीरबलाधिकौ ।
पालितौ शिवराजेन तदानृण्याय संगतौ ॥ ५२ ॥
महाराजं नमस्कृत्य महाबलपराक्रमौ ।
ऊचतुर्मधुरं वाक्यं म्लेच्छा ये त्वज्जिगीषवः ॥ ५३ ॥
परापतंति परितः[५३] सन्नद्धा युद्धदुर्मदाः ।
आत्मप्राणान्पणीकृत्य तानावां विजयावहे ॥ ५४ ॥
प्राणः सर्वस्य जगतस्त्वं तु सर्वगतः प्रभुः ।
सुखं गच्छ महाराज दुष्टधीभिरलक्षितः ॥ ५५ ॥
इत्थं श्रीरूपसिंहस्य संताजीकस्य चोभयोः ।[५४]
श्रुत्वा वचस्तु तोषोऽसौ म्लेच्छसेनासमावृतः ॥ ५६ ॥

---

५१ मूलग्रंथपृष्ठं २३ समाप्तं ।
५२ मूल०-प्रासहस्तां ।
५३ पाठभेदः-पतितः ।
५४ मूलग्रंथपृष्ठं २४ समाप्तं ।

तदाभवन्महाजन्यं म्लेच्छानीकेन चोभयोः ।
पश्यत्सु सर्वलोकेषु राजारामेव पश्यति ॥ ५७ ॥
म्लेच्छसेनां च महतीं वीक्ष्य भूमिपतिस्तदा ।
विचारयामास निजे निराधौ मनसीश्वरः ॥ ५८ ॥
एभिर्युद्धे कृते किं वा फलं स्यान्मम संप्रति ।
कुमांडपरिभूत्यर्थमवतारो ममाधुना ॥ ५९ ॥
संजातः पृथिवीपृष्ठे तद्योग्यां मतिमाश्रये ।
यथा कथंचिदेते हि नियोज्या मतिदामभिः ॥ ६० ॥
शीघ्रं कर्नाटकं गत्वा महोपायान्करोम्यहम् ।
निश्चित्यैवं स मतिमान् संताजीकं चमूमुखे ॥ ६१ ॥
संस्थाप्य रूपसिंहं तु समानीय पुरोगमत् ।
ग्रामान्घोषांश्च दुर्गाणि खेटखर्वटपत्तनान् ॥ ६२ ॥
समतीत्य क्षितिपतिस्तुंगभद्रातटं ययौ ।
अगाधां सरितं ज्ञात्वा पुनर्म्लेंच्छांश्च पृष्ठगान् ॥ ६३ ॥
दुष्टांश्च विषयाधीशान् सेनाधीशमिदं जगौ ।
रूपसिंह महाबाहो त्वमेको बहवः परे ॥ ६४ ॥
नायं देशो युद्धयोग्यः कालश्च बलवानयम् ।
मया सह समागच्छ मास्तु ते मानसी व्यथा ॥ ६५ ॥
क्षितिपेन समादिष्टः क्षत्रधर्मपरायणः ।
रूपसिंहः पदादेकात्र चचाल दृढव्रतः ॥ ६६ ॥
अवादीच भूपतिं चैवं महाराज दयानिधे ।
अमानुषस्त्वं भूपालः स्वेच्छागतिमवाप्नुहि ॥ ६७ ॥
पालयन् च जनान् सर्वान् स्वराज्यं प्राप्नुहि द्रुतम् ।
त्वया सह समागच्छे यद्यहं तर्हि भूपते ॥ ६८ ॥
यवनैरावृताः सर्वे विनश्यंति न संशयः ।
इत्थं श्रीरूपसिंहस्य वचः श्रुत्वा महीपतिः ॥ ६९ ॥
मानयामास तं भूयो म्लेच्छानीकोपवेष्टितः ॥ ७० ॥

---

५५ मूलग्रंथपृष्ठं २५ समाप्तं ।     ५६ मूल० म्लेंच्छानीकपवेष्टितः ।

(उपेंद्रवज्रा)

तदा महेशं परमादरेण ।
स्मृत्वा भवानीमपि भूमिपालैः ॥
पुरो ददर्शाद्भुतरूपवेषौ ।
वैश्यद्विजौ नंदिसमं वृषं च ॥ ७१ ॥

इति श्रीराजारामयशप्रबंधचरिते काव्ये केशवपंडितकृतौ चतुर्थः सर्गः ॥

## पंचमः सर्गः

(अनुष्टुप)

अथ म्लेंच्छपतेः सैन्यैर्वेष्टिते स्वीयमंडले ।
पुरोविधाय वृषभं समालभ्य च पाणिना ॥ १ ॥
तद्वृषस्पर्शतोऽलक्ष्यः स बभूव दुरात्मनाम् ।
भैरजीकमुवाचेदं राजा मतिमतां वरः ॥ २ ॥
भैरजीक महावीर म्लेंच्छाक्रांते स्वमंडले ।
निःसर्तुं नास्ति मार्गोऽत्र तथापि प्रव्रजामहे ॥ ३ ॥
भृंगिरिटी हि वैश्योऽयं नंदीशोऽयं वृषस्त्वयम् ।
जयदेवसुतः साक्षात् त्र्यंबकः प्रमथस्त्वयम् ॥ ४ ॥
शंभुना प्रेषितो मेऽद्य मार्गदर्शनहेतवे ।
यथा दाशरथेः प्राप्ते संकटे मारुतात्मजः ॥ ५ ॥
तत्तत्समयकृत्येषु साहाय्यं कृतवान्पुरा ।
तथेदानीं त्वया कार्यं वीराग्रण्येन साधुना ॥ ६ ॥
मद्भक्तियुक्तचित्तेन मत्सेवानुविधायिना ।
अवतारचरित्रं ते प्रथामायास्यति ध्रुवम् ॥ ७ ॥
इति संश्रावितो राज्ञा भैरजीकः पुरातनम् ।
वृत्तमत्यद्भुतं वीरो गमने बुद्धिमादधौ ॥ ८ ॥

---

५७ मूळग्रंथपृष्ठं २६ समाप्तं । ५८ पाठभेदः—अवतारयशस्त्वावा प्रथा० ।

तिष्ठत्सु म्लेंच्छमुख्येषु सर्वतः सबलेष्वपि ।
तथा कंटकजालेषु पथिषु प्रसृतेष्वपि ॥ ९ ॥
नृपोपकरणैः सर्वैः सहितः समयोचितैः ।
शास्त्री सनाथः सुभुजः साहस्यमितविक्रमः ॥ १० ॥
स्कंधेनादाय नृपतिं पुप्लुवे म्लेंच्छमध्यतः ।
न तं बबाधे कश्चिद्धि रामतेजोपबृंहितम् ॥ ११ ॥
अथ भूपानुगाः सर्वे प्रस्थिते सति भूपतौ ।
अभिदध्युः शिवं राज्ञश्चिताभयसमन्विताः ॥ १२ ॥[59]
कथं गच्छामहे सर्वे म्लेंच्छसागरमध्यतः ।
पुनश्च राजचरणौ कदा द्रक्ष्यामहे वयम् ॥ १३ ॥
ततस्ते भिन्नमतयस्तत्काष्ठकृतबुद्धयः ।
केचित्कार्पटिका वेषाः दीनवेषधराः परे ॥ १४ ॥
केचित्तत्रैव निवसन् सुगुप्ता यामवासिभिः ।
मुनिवेषधराश्चान्ये वैश्यवेषधराः परे ॥ १५ ॥
संतेरुर्विषमांभोधिं राजारामप्रभावतः ।
राजारामस्तु सकलं सैन्यसागरमत्यगात् ॥ १६ ॥
श्रीभैरवेण सहितस्तुंगभद्रामतीतरत् ।
तुंगभद्रांभसि स्नात्वा संतर्प्य पितृदेवताः ॥ १७ ॥
भुक्त्वा यथेच्छं तत्तीरे भैरजीकहृतक्लमः ।
धात्रीकृत्यं भृत्यकृत्यं मित्रकृत्यं तथैव च ॥ १८ ॥
स्नेहसंबंधिनां कृत्यं कृतवान्भैरवस्तदा ।
स्वाद्वन्नैः स्वादुपेयैश्च स्वादुभक्ष्यैर्मनोरमैः ॥ १९ ॥
तांबूलसंप्रदानैश्च सुस्वादुवचनैस्तथा ।
स्नानैर्नानाविधैस्तल्पत्पादसंवाहनादिभिः ॥ २० ॥
उपाचरन्महाराजं मार्गक्लेशासहं विभुम् ।
गच्छतस्तस्य राजर्षे मार्गे तिग्मरुचिस्तथा ॥ २१ ॥
न चातिसंतप्तकरः संबभूव यतात्मनः ।[61]
भूमार्दवेन शैत्येन चापस्पर्शेन मारुतः ॥ २२ ॥
वितानक्रियया काशं छायाभिस्तरवस्तथा ।
ऋतवः फलपुष्पैश्च भूमिपालं सिषेविरे ॥ २३ ॥

---

५९ मूलग्रंथपृष्ठं २७ समाप्तं ।
६० मूल० नानाविधैस्तद्रुत्पाद० ।
६१ मूलग्रंथपृष्ठं २८ समाप्तं ।

नृत्तैर्मयूराश्च पिकाः कलालापैर्मृगव्रजाः ।
प्रदक्षिणप्रक्रमणैर्मनो जन्हुर्महीपतेः ॥ २४ ॥
नानावर्णस्तथा गावः सवत्सा गोपपालिताः ।
लक्षार्णश्चै सुपुष्टांगाः दर्शनान्नुनुदुः क्लमम् ॥ २५ ॥
गायंत्यो रामचरितं पथि हालिककन्यकाः ।
सुस्वरैश्च हरंति स्म महीपतिमनःक्लमम् ॥ २६ ॥
म्लेच्छकासीमसेनायां स्वसीमामत्यजन्नृपः ।
कदाचिदागतस्तत्र न्यवसद्भैरवान्वितः ॥ २७ ॥
गच्छन्नापणवीथिषु मिलन्नापि च सैनिकैः ।
संचरन् राजमार्गेऽपि धनिभिः संवदन्नपि ॥ २८ ॥
क्रीणन्नपि शुभानश्वान् रत्नानि विविधान्यपि ।
वितरन्नपि दीनेभ्योऽनुरूपं तुष्टिदं धनम् ॥ २९ ॥
न विज्ञातो गूढचारैश्चारैरपि दुरात्मनः ।
कासीमस्य महाराजप्रभावेण विमोहितैः ॥ ३० ॥[६३]
एवं यथासुखं गच्छन्निर्भयः परवीरहा ।
अविज्ञातः कुमतिभिर्ग्रामेषु नगरेषु च ॥ ३१ ॥
दाशरथ्यवतारे हि चतुर्दश समाः स्वयम् ।
सीतयानुगतः पत्न्या वनवासमकल्पयत् ॥ ३२ ॥
अस्मिन्किलावतारे तु कतिभिर्दिवसैः प्रभुः ।
एकाकी वनवासं तु व्यपाक्रामत्सुखोचितः ॥ ३३ ॥
ततः स्वदेशनिकटे समागच्छन् धृतव्रतः ।
अमूरनगरस्यायं देवालयमुपाययौ ॥ ३४ ॥
तत्र स्थित्वा महाराजो भैरजीकं गतक्लमम् ।
चित्तज्ञं सर्वशूराणां चारवेषं महाबलम् ॥ ३५ ॥
प्राहिणोत्काकडाख्यस्य बाजीरायस्य संनिधौ ।
भैरजीकस्तमभ्येत्य वृत्तं राज्ञः सविस्तरम् ॥ ३६ ॥
पाराशरान्निर्गमनं तुंगभद्रातटावधि ।
ससैन्यस्य महीभर्तुरागमं च समंत्रिणः ॥ ३७ ॥
म्लेच्छैस्तस्यानुगमनं युद्धं दैनंदिनं तथा ।

---

६२ मूल०-उक्षाणश्च ।

६३ मूलग्रंथपृष्ठं २९ समाप्तं ।

सर्वं तत्कथयामास तस्य चित्तविवित्सया ॥ ३८ ॥[६४]
त्वं तु राज्ञः छत्रपतेः प्रियः प्राणो बहिश्चरः ।
देशोऽस्मिन् स्थापितस्तेन स्वामिभक्तिं यदीच्छसि ॥ ३९ ॥
तर्हीदानीं मया सार्धमेहि यत्र नृपोत्तमः ।
श्रुत्वा भैरववाक्यं तत्तं तथेति च सोऽब्रवीत् ॥ ४० ॥
तस्य निष्कलुषं चेतः स्वामिभक्तिं तथाविधाम् ।
ज्ञात्वा भूयश्च तं प्राह सार्थोऽत्र मम विद्यते ॥ ४१ ॥
द्विजः कश्चित्समभ्येत्य पुनरायाति तेऽतिकम् ।
सन्नद्धाः सर्व पर्वते भवंतु तव सैनिकाः ॥ ४२ ॥
इत्युक्त्वा नृपमभ्येत्य तच्चेष्टितमभाषत ।
तदाकर्ण्य नृपः प्राह तमिहानय सत्वरम् ॥ ४३ ॥
भूयोऽगमद्भैरजीकस्तत्सान्निधिमथावदत् ।
समागतो महाराज इति वार्ताहरा मम ॥ ४४ ॥
वदंति दर्शनार्थं त्वं सोपायनकरस्त्वरन् ।
तदा तस्य भटाः केचिज्जाताभिज्ञा महाबलम् ॥ ४५ ॥
भैरजीकं जानते स्म तरवारिरणादिभिः ।
सर्वेऽप्येनं मिलंति स्म प्रणामालिंगनादिभिः ॥ ४६ ॥[६५]
तद्वाक्यसममेवासावुदतिष्ठत्ससैनिकः ।
क्व स्वामी मे महाराजः सांप्रतं वर्तते सखे ॥ ४७ ॥
श्रुत्वैतत्पुरतो भूत्वा विलसच्छूरिकाकरः ।
भैरवः प्राह तान् सर्वान् दर्शयन्जगतीपतिम् ॥ ४८ ॥
अस्मिन् देवालये स्वामी वर्तते लघु गच्छत ।
इति वाक्यामृतेनैव संतुष्टाः काकडादयः ॥ ४९ ॥
यथा प्रधानं पुरतः शिरःचुंबिमहीतलाः ।
उपायनानि पुरतो महार्हाणि निधाय ते ॥ ५० ॥
प्रणेमुस्तं महाराजं वीरत्रयगुणान्वितम् ।
वाग्भिः कांश्चित्स्मितैः कांश्चित् दृशा कांश्चिदरिंदमः ॥ ५१ ॥
संभावयामास नृपः सुभटांस्तत्र संगतान् ।
अकारयन्महाराजः स्वस्त्यागमनसूचकान् ॥ ५२ ॥

---

[६४] मूलग्रंथपृष्ठं ३० समाप्तं ।
[६५] मूलग्रंथपृष्ठं ३१ समाप्तं ।

वादित्रशब्दान् बहुशो नलयंत्र[६६]महाध्वनीन् ।
तदा महानुत्सवोऽभूज्जनानां देशवासिनाम् ॥ ५३ ॥
धर्मराजागमे यद्वदिंद्रप्रस्थनिवासिनाम् ।[६७]
स्वराज्यं प्राप्य तद्वृद्धं सर्वलोकनमस्कृतः ॥ ५४ ॥
प्रतिपच्चंद्रसदृशः कलोभिर्ववृधे नृपः ॥ ५५ ॥

( शार्दूलविक्रीडित )

एवं श्रीमवशालवंशतिलकः श्रीरामराजप्रभुः ।
दिल्लीशेन महाबलैः पथिकृतान् प्रत्यूहशैलानिव ॥
सर्वान् म्लेंच्छगणान्विमोह्य महसा श्रीवैष्णवेनाधुना ।
तेषामेव पराभवाय विजयी वर्वर्ति कर्नाटके ॥ ५६ ॥

इति श्रीमन्महाराजाधिराजाधिराजमहाराजछत्रपतिराजाराम-
चरिते काव्ये केशवपंडितकृतौ पंचमः सर्गः ॥[६८]

---

६६ मूल०—नलयत्र० ।

६७ मूलग्रंथपृष्ठं ३२ समाप्तं ।

६८ मूलग्रंथपृष्ठं ३३ समाप्तं ।

---

सूचना-'म्लेच्छ' शब्दो मूले केषुचित्स्थलेषु 'म्लेंच्छ' इत्यन्येषु च 'म्लेच्छ' इति लिखितः पुनरस्माभिस्तु स सर्वेष्वेव स्थलेषु 'म्लेंच्छ' इति मुद्रितः । गीर्वाणभाषायां तु स 'म्लेच्छ' इति लिख्यते ।

ॐ

केशवकविकृत

# छत्रपति राजाराम महाराज यांचें चरित्र

## सर्ग पहिला.

श्रीगणेशाला नमस्कार असो.

कौसल्येचा आनंद वाढविणारा व रावणाचा वध करणारा असा जो रघुवंशाचा तिलक दशरथपुत्र राम त्याचा विजय असो. १.

ऋषिश्रेष्ठ श्रीसंपन्न अशा त्या तपस्वीला ( नारदाला ) नमस्कार असो. ज्याच्या ठिकाणीं सर्व ज्ञान अधिष्ठित झालें आहे त्या वाल्मिकीलाहि माझें नमन असो. २

तीन वेळां रामावतार घेऊन त्रिजगतांतून सर्व राक्षसांचा नायनाट करणारा व पुन्हां जगाच्या कल्याणासाठीं व दिल्लीशाच्या गर्वहरणार्थ राजाराम महीपतीच्या रूपानें मनुष्यदेह धारण करणारा जो त्रैलोक्यनाथ लक्ष्मीपति त्याचा विजय असो. ३

जानकीनाथाला नमस्कार करून केशव नांवाचा पंडित राजाराम महीपतीच्या यशोवर्णनाचें काव्य रचित आहे. ४

ज्या क्षेत्रांत श्रीमत् परशुरामाचें पूजन केलें जातें त्या क्षेत्रांतील रहिवासी विधिज्ञ सत्यवादी शुचिर्भूत वेदशास्त्रप्रविण षट्कर्म करणारा, उत्तम बुद्धि-

मान भगवद्भक्तिपरायण प्राणिमात्रांच्या हितांत रत असणारा केवळ न्यायानेंच मिळविलेल्या धनावर आपल्या कुटुंबाचें परिपोषण करणारा असा ब्राह्मण [केशव कवि] संभाजी महाराजांनीं यमधर्म स्वीकारल्याचें[1] ऐकून व या घोर कलियुगांत महान् म्लेंच्छांचा विजय होत आहे, दुरात्मा म्लेंच्छराजानें सर्वत्र वर्णाश्रमधर्माचा ऱ्हास केला आहे व सर्व धर्मक्षेत्रांचा नाश केला आहे असें पाहून आतां लोककल्याणाचा मार्ग कोणता म्हणून चिंता करूं लागला. ५-९

याप्रमाणें तो चिंताक्रांत व विचारमग्न झाला असतां सर्व लोकांच्या हितासाठीं व भक्तांवर अनुग्रह करण्याकरितां शुक्ल संवत्सरांतील माघ महिन्याच्या शुक्ल चतुर्थीला शनिवारीं[2] भवानिपतीसारखा देव त्या ब्राह्मणाच्या स्वप्नांत येऊन शिवनारदसंवादरूपानें राजाराम महाराजांच्या यशाचा भाविवृत्तांत सविस्तर सांगूं लागला. १०-१२

" एकदां नारदमुनि कैलासाहून स्वर्गांत गेले. देवेंद्रादि प्रमुख देवांनीं तेथें त्यांचा सन्मान केला. १३

' हे भगवन्, आपण आज आनंदित झालेले दिसतां तरी या त्रिजगतांत कोणतें आश्चर्य पाहिलेंत तें सांगा म्हणून त्यांनीं नम्रपणें विनंती केली. [१४

तेव्हां तेजस्वी नारद देवेंद्राला म्हणाले कीं, शंकराला नमस्कार करण्याकरितां मीं कैलासाला गेलों होतों. १५

तेथें उमेसह शंकराला नमस्कार करून समोर उभा राहिलों असतां महेंद्राचलनिवासी महात्मा भार्गवाचा शिष्य गिरिशाजवळ आला व साष्टांग नमस्कार घालून हात जोडून बोलूं लागला. १६-१७

---

१ ता. ११ मार्च १६८९ रोजीं औरंगझेबानें संभाजी महाराजांचा शिरच्छेद करविला.

२ शुक्ल संवत्सर शके १६११ माघ शु. ४ शनवार ४ जानेवारी १६९०.

"हे भक्तांचें भय हरण करणाऱ्या दयासागर प्रभो, आपला शिष्य भार्गव यानें आपणांस जी विनंती केली आहे ती ऐकावी. १८

हे स्वामिन्, पूर्वी आपण दिलेला व दुष्टांचें शासन व भक्तांचें संरक्षण करण्यासाठीं सह्याचलावर आपल्या आज्ञेप्रमाणें स्थापन केलेला आणि आजपर्यंत तेथें कायम असलेला धर्माचा सेतु व पुण्यकर्माचा हेतु असा तो आपला पवित्र परशु, हे प्रभो, सांप्रत सार्वभौमपदाचा अभिमान धरून आलेल्या कलिपुरुषानें[१] उखडून टाकला आहे. पृथ्वी पापभारानें वांकून गेली आहे. तरी आतां काय करावें! १९-२१

त्याचें निवारण करण्याची शक्ति महेंद्रादि देव मोठमोठे राजे ऋषि व ब्राम्हण यांतसुद्धां राहिली नाहीं. २२

दाशरथी रामानें माझें वैष्णव धनुष्य पूर्वीच नेलें. परशुहि मागें क्रौंचाचलाचा भेद करितांना मोडला. २३

तरी आतां, हे प्रभो, त्याचें दमन करण्यासाठीं आपण कांहीं उपाय योजा." अशी विनंती निवेदन करून तो शिष्य शिवासमोर स्तब्ध उभा राहिला. २४

नंतर मेघगंभीरवाणीनें भगवान् शंकर म्हणाले, "हे भार्गव, कलिपुरुषापासून तुम्हांस भय नाहीं. २५

कुभांड[२] नांवाच्या दैत्यराजानें मला आपल्या तपानें संतुष्ट केलें होतें म्हणून त्याजवर मीं प्रसन्न होऊन त्याला सार्वभौमपद दिलें होतें. २६

परंतु, 'तूं गर्वानें भार्गवाश्रमाचा नाश करशील व ब्राम्हण्यानें परिपूर्ण असें रामराज्य घेण्याची इच्छा धरिशील तेव्हां तूं पराभव पावशील' अशी अट घातली होती. २७-२८

---

१ औरंगझेबनें.

२ कुभांड राक्षस बाणासुराचा मुख्य मंत्रि असल्याचें पुराणांतरीं म्हटलें आहे.

आतां ब्रह्मनिष्ठ उदार विष्णूचे अंश व पराक्रमी, आणि देवांशभूत अशा सचिव ब्राह्मण व क्षत्रियांनीं परिवेष्टित असा माझा परम व श्रीमान् भक्त राजाराम महीपति हा कलिकलंक धुवून काढण्यासाठीं व धर्मसंरक्षणार्थ पृथ्वीतलावर भोंसलेवंशांत अवतीर्ण झाला आहे. २८-३०

तो कुलांडोंचा गर्व सांप्रत हरण करील." याप्रमाणें शिवाचे उद्गार श्रवण करून त्या शिष्यानें त्याला नमस्कार केला व तो निघून गेला. ३१

तदनंतर नारदानें सनातन भगवान शंकराची स्तुति केली आणि त्यानें पृथ्वीतलावर घडलेलें वर्तमान जसें पाहिलें होतें तसेंच तें आदरपूर्वक निवेदन केलें. ३२

" हे भगवन्, आपला भक्त राजाराम महीपति याचें राज्य सार्वभौमाभिमानी कलिपुरुषांनीं हरण केलें आहे. ३३

तरी तें त्याचें राज्य त्याला आतां परत कसें मिळेल तें, हे दीनबंधू दयाळू स्वामी, आम्हांस कृपा करून सांगा." ३४

तेव्हां दिव्यस्वरूपी नारदाला भगवान शंकर म्हणाले, " तो राजा माझा मोठा भक्त असून सर्व धर्मांचा रक्षणकर्ता आहे. ३५

आपलें राष्ट्र व त्याचप्रमाणें आपलें सैन्य म्लेंच्छांनीं पादाक्रांत केलेलें पाहून तो राजनीतिप्रवीण व चतुर मंत्र्यांशीं खलबत करूं लागेल. ३६

कांहीं शूर मंत्री जयशालसेनें युद्धाचा सल्ला देतील. कांहीं साम कांहीं दान कांहीं भेद कांहीं आश्रयाचा अवलंब वगैरे नानाप्रकारचे विचार आपापल्या मतिप्रमाणें सुचवितील. परंतु त्या मंत्र्यांनीं सुचविलेले ते विचार राजाच्या मनास येणार नाहींत. ३७-३८

नंतर जो माझ्या भक्तांमध्यें मुख्य, वृद्धांनाही ज्याचा बुद्धिवाद संमत आहे असा बृहस्पतिसारखा, सर्व लोकांच्या हिताची इच्छा करणारा, सर्व

---

५ कुमांडालाच कुलांड म्हणून उल्लेखिलें आहे.

६ औरंगझेबानें.

प्रकारच्या संपत्तीला कारण असणारा व जो मीं दिलेल्या बुद्धीनें समर्थ झाला आहे असा प्रल्हादपंत राजाला शीघ्र सल्ला देईल कीं, ३९-४०

' हे राजेंद्र, हा समय आपल्याला विपरीत व शत्रूला अनुकूल असा दिसतो. त्यामुळें मला युद्ध करणें आवडत नाहीं. ४१

त्याचप्रमाणें पूर्व वैरामुळें शत्रूच्या नाशार्थ योजलेले सर्व सामादि उपायहि आम्हांस पसंत पडत नाहींत. ४२

याकरितां राज्यकार्यधुरंधर, स्वभावतःच रामभक्त, विश्वासू, वीरांना पूज्य, शौर्यौदार्यादी गुणांनीं युक्त, यशस्वी, महा बुद्धिमान्, असा जो अमात्य नीळकंठाचा पुत्र रामचंद्र याच्यावर आपला राज्यकारभार सोंपवून आपण कांहीं निवडक लोकांनिशीं सत्वर कर्नाटकास जावें आणि निरलसपणें स्वराज्यरक्षणाचा प्रयत्न करावा. ' ४३-४५

अशाप्रकारचें बृहस्पतीलाहि शोभणारें आणि बुद्धिमानें व शुभवैभवशाली व मोरेश्वर पंडिताचा पुत्र नीलकंठ मुख्य प्रधान त्यालाहि संमत असलेलें हें प्रल्हादवचन ऐकून राजाला मनांत फार हर्ष होईल. ४६-४७

राज्यधुरंधर अशा रामचंद्र नांवाच्या अमात्याच्या शिरावर सर्व राज्य सोंपवून व आपण राज्यकारभारापासून अलिप्त होऊन प्रल्हादादि प्रमुख ब्राम्हण व प्रधानपुरुषांसह, सुमित्रासारखा पराक्रमी महाबाहू मोठा साहसी आणि बलवान असा जो बहिरजी घोरपडा त्यास मित्र करून, तो महान बुद्धिमान राजा माझ्या अनन्य भक्तियोगानें मार्गांतील नानाविध विघ्नें दूर करित करित कर्नाटकास खचित जाऊन पोंहोंचेल. तेथें गेल्यावर राजगिरीच्या पायथ्यावरील इंद्रनगरीप्रमाणें सुंदर असलेल्या चंदी शहरांत तो आपलें

---

७ राजगिरी— जिंजी किल्ल्याचा एक सर्वांत उंच व मुख्य टेकडी.

८ चंदी— जिंजी— हा किल्ला मद्रासच्या नैऋत्येस ८० मैलांवर दक्षिण अर्काट प्रांतांत आहे. मुख्य किल्ला राजगिरी कृष्णगिरी व चंद्रायदुर्ग अशा तीन टेकड्या मिळून बनला आहे.

साम्राज्य स्थापन करील." असें ऐकून नारद विस्मित झाला व शंकराला म्हणाला. ४८-५२

"शत्रूनें परिवेष्टित व विस्कळीत झालेल्या राज्याचें तो ब्राह्मण रामचंद्र साधनांशिवाय कसें पालन करील?" ५३

तेव्हां परमादरानें शंकर नारदाला म्हणाले कीं, "राजारामाच्या सद्भक्तीमुळें मीं त्याला साम्राज्य अर्पण केलें आहे. ५४

राजाराम हा निःसंशय विष्णूचा चवथा रामावतार आहे. त्याच्या सेवेंत तत्पर असलेल्या त्या ब्राह्मणाचें वैभव जाण. ५५

राजाराम महाराज स्वतः कर्नाटकांत गेल्यावर त्या श्रीराम अमात्याला मोठी चिंता उत्पन्न होईल. ५६

श्री शिवाजीप्रभृति राजांनीं आणि मोरेश्वरप्रभृति प्रधानांनीं व वीरांनीं रक्षण केलेलें हें सप्तांगयुक्त शत्रूला अजिंक्य भरभराट पावलेल्या परंतु आतां विस्कळीत झालेल्या अशा या राज्याचें मी कसें रक्षण करूं. ५७-५८

अशी तो चिंता करीत असतां त्याच्या स्वप्नांत श्रीजानकीपति ब्राम्हण-रूपानें येऊन त्याच्या हातीं नारळ देईल. ५९

तेव्हां शूरांचें सौख्यवर्धन करणारे शौर्यधैर्यादि गुण त्या महा बुद्धिमान् पुरुषाच्याठिकाणीं प्रादुर्भूत होतील. ६०

नंतर राजादिकांचा तो आवडता मंत्रिश्रेष्ठ राजारामाचें तें राज्य अनेक डोंगरी किल्ले, म्लेंच्छराजानीं घेतलेले कित्येक गिरिदुर्ग व त्याचप्रमाणें म्लेंच्छ-राजानीं कैद केलेलें व पळवून लावलेलें सैन्य सत्यवचनानेंच तो लवकरच परत आपल्या ताब्यांत घेईल. नंतर आपल्या सैन्यानिशीं म्लेंच्छराजाच्या सेना-पतीला जिंकील व म्लेंच्छराजानें घेतलेल्या राजाराम महाराजांच्या सर्व किल्ल्यांवर पुन्हां आपला अधिकार स्थापित करील. ६१-६४

आपल्या मंत्र्यानें केलेलें हें सर्व कृत्य ऐकून तो राजा मनामध्यें संतोष पावेल, सर्व ऐश्वर्यानें युक्त असा तो राजा नंतर स्वदेशांतील व कर्नाटकांतील

सैन्यानिशीं म्लेच्छराजाचा पराभव करील व त्या सचिवोत्तमाचा सन्मान करून नंतर आपल्या स्त्रीपुत्रांसह व प्रधानमंत्र्यासह सर्व किल्ल्यांत श्रेष्ठ अशा रायगडावरील[1] उत्तम सिंहासनावर आरूढ होऊन श्रीरामाप्रमाणें सर्व पृथ्वीचें पालन करील." ६५-६८

याप्रमाणें श्रीशंकराच्या तोंडून राजाराम महाराजांचें भाविवृत्त ऐकिलें, म्हणून, हे इंद्रा, आम्हांस मोठा आनंद झाला आहे." ६८-६९

अशा प्रकारचें स्वप्न पाहून तो द्विजश्रेष्ठ जागा झाला व चिंता व भय दूर होऊन त्याला अतुल आनंद झाला. ७०

राजारामाला चिरकालिक विजय व वैभव प्राप्त करून देणारा असा त्या द्विजवरानें सांगितलेला लोकसंतोषकारक स्वप्नवृत्तांत ऐकून केशव-पंडित आनंदसागरांत निमग्न झाला व हा राजारामप्रभावाचा ग्रंथ रचिता झाला. आतां तो पुढें आपल्या अनेक पद्यांनीं त्याच्या प्रधानांच्या प्रभावाचें वर्णन करील. ७१

केशवपंडितकृत राजारामचरित्रांतील स्वप्नवृत्त नांवाचा पहिला सर्ग समाप्त.

---

१ रायगड = महाडाचे उत्तरेस सुमारें ८ मैल– महाड तालुका, कुलाबा जिल्हा.

## सर्ग दुसरा

राजा कर्नाटकाला गेला असें ऐकून त्या यवनेश्वरानें आपलें सैन्य तिकडे रवाना केलें व तो पराक्रमी स्वतःहि मागोमाग गेला. १

रामचंद्राच्या बाजूसहि त्यानें म्लेंच्छ सेनापती पाठविले. वीस मुक्काम गेल्यावर राजाचा पराक्रम त्याच्या कानावर आला. २

कर्नाटकांतील राजे एक होऊन त्यांनीं महाराजाला विविधप्रकारचे नजर-नजराणे व धन दिलें आणि म्लेंच्छराजाचें संमर्दनास योग्य अशा सेनेला द्रव्य व मानमरातबानें संतुष्ट करून त्याच्या मदतीस पाठविलें. ३-४

आपल्या मित्र राजांच्या सैन्यानें संपन्न झालेला प्रतापी राजाराम लढाई देण्यास येत आहे असें ऐकून तो (म्लेंच्छराजा) मनांत दीन झाला. ५

सैन्यानें परिवेष्टित असतांनासुद्धां नुसत्या भयानेंच तो त्यानें (राजारामानें) पाठविलेल्या सैन्याला मार्गांत तोंड देत देत कसाबसा पुढें चालून गेला. ६

दरम्यान म्लेंच्छ सेनापतींनीं देश उध्वस्त करण्यास प्रारंभ केला व कांहीं किल्ले घेतले. ७

पवित्र क्षेत्रांना वेढा दिला तेव्हां आपले लोक शत्रुपक्षाला जाऊन मिळत आहेत असें पाहून रामचंद्रपंत मनांत विचार करूं लागला. ८

" राजानें माझ्या हातांत सोंपविलेलें हें राज्य घेण्याच्या इच्छेनें यवन सर्व बाजूनें प्राप्त झालेले आहेत. राज्याचीं सर्वांगें विस्कळीत झालेलीं आहेत. महाबलवान व श्रीमान असा शत्रू तर अगदीं माझ्या निकट येऊन ठेपला आहे. माझे स्वामी महाराज तर दूर देशीं आहेत. तरी आतां सत्यप्रतिज्ञ व मानी अशा मला हें राज्य संरक्षण कसें करितां येईल ? " ९-११

---

१० औरंगझेब.

११ रुस्तुम किंवा सर्जाखान, खान-इ-ज़मान फतेह जंग खान ( शेख निजाम ) व इखलासखान.

अशारीतीनें तो चिंताक्रांत झाला असतां श्रीराम चिंतामणीरूपानें त्याच्या स्वप्नांत येऊन त्याचे हातीं नारळ दिला. तेव्हां प्रातःकालीं त्या द्विजश्रेष्ठानें आपलें स्वप्न ब्राह्मणवर्गांना निवेदन केलें. ११-१२

तेव्हां ते सर्व ब्राह्मण बोलले कीं, "रामाच्या चरणीं रत असलेल्या तुमचा निःसंशय विजय होणार." १३

असें त्या द्विजांचें वचन ऐकून तो थोर पुरुष आनंदित झाला आणि शत्रूनें त्याला त्याच्या किल्ल्यांत वेढला असतांनासुद्धां आपल्या स्थानापासून-न ढळणाऱ्या प्रक्षुब्ध समुद्राप्रमाणें तो ढळला नाहीं. १४-१५

रामचंद्राच्या हाताखालीं वाढून पृथ्वीवर प्रसिद्धीस आलेला, त्याचें हित इच्छिणारा, यश चिंतणारा व त्याच्या सेवेंत रत असलेला असा क्षत्रियवृत्तीमान शुचिर्भूत व श्रीमान परशुराम रामचंद्र एकांतांत स्वस्थ बसलेला पाहून त्याला विनंति करिता झाला. "हे स्वामिन्, महाराजानें तुमच्या हातीं सोंपविलेलें हें राज्य सकल म्लेंच्छांनीं व आपल्यांतीलहि दुष्ट लोकांनीं लुटलें आहे. आपले किल्ले आपल्याच लोकांनीं व शत्रूनें बळकाविले आहेत. १५-१८

सांप्रत विशाळगड[13] मात्र तुमचा आहे व किल्ल्यावरील सामुग्रीहि परिपूर्ण आहेशी मला वाटते. १९

परंतु सध्यां देश सर्व बाजूंनीं यवनांनीं व्यापिला आहे. स्वामी दूर-देशीं आहेत. पण, हे प्रभो, तुमचा खजिना विपुल आहे. २०

तरी, हे स्वामिन्, आतां शत्रूला जिंकण्यासाठीं पराक्रम केला पाहिजे." २१

अशा प्रकारची त्याची विनंती ऐकून त्या जयेच्छु महाबुद्धिमान् पुरुषानें स्मित करून परशुरामाची प्रथम प्रशंसा केली. २२

---

१२ विशाळगडीं

१३ विशाळगड—कोल्हापूरच्या ईशान्येस ४५ मैल, कोल्हापूर संस्थान.

नंतर निजामाला[14] शासन करण्यासाठीं महाबलवान संताजी घोरपडे व वीरमान्य व वीरश्रेष्ठ धनाजी जाधव यांस आज्ञा केली. त्यानीं आनंदित होऊन तत्क्षणींच कूच करण्याच्या तुतारीचे आवाज काढण्यास सांगितलें. २२-२४

नंतर तो श्रीसचिव प्रभु आपल्या षड्विध सैन्यासह सुमुहूर्तावर व शुभ-लग्नावर प्रस्थान करिता झाला. २४-२५

महिमतगडा[15]वरून संगमेश्वराला[16] गेला. तेथें युद्धांत अजिंक्य अशा प्रबल म्लेंच्छ सेनापतीला पराजित केलें. त्याचे घोडे पाडाव केले. शृंगारपुर-[17]निवासी युद्धलालसी मोररायमुखी[18] चोरांना बंदींत टाकून तो सत्वर गुणवंतगडाला गेला. २५-२७

तो गड काबीज केला. तेथील लोकांस पळवून लाविलें. आपले लोक तेथें ठेवले. नंतर सुंदरगड[20] वश केला. त्याचप्रमाणें दंतपाटणच्या राजाला जिंकून पायदळासह वसंतदुर्गाला[22] गेला. २८-२९

---

१४ निजाम-खान-इ-ख़मान फतेह-जंग-खान अथवा शेख निजाम.

१५ महिमतगड-कोल्हापूरचे वायव्येस सुमारें ५० मैल व विशाळगडचे उत्तरेस सुमारें १५ मैल. संगमेश्वर तालुका, रत्नागिरी जिल्हा.

१६ संगमेश्वर-रत्नागिरीचे ईशान्येस सुमारें २५ मैल. संगमेश्वर तालुका, रत्नागिरी जिल्हा.

१७ शृंगारपूर-संगमेश्वराचे पूर्वेस सुमारें १५ मैल संगमेश्वर तालुका, रत्नागिरी जिल्हा.

१८ मोररायमुखी याचा अर्थ लागत नाहीं. मालेराई करणाऱ्यांचे प्रमुख असा अर्थ लावणें कदाचित सयुक्तिक होईल. 'ल' चे जागीं 'र' लिहिला गेला असावा.

१९ गुणवंतगड-शृंगारपूरचे ईशान्येस सुमारें १६ मैल व पाटणापासून नैऋत्येस सुमारें १० मैल. पाटण तालुका, सातारा जिल्हा.

२० सुंदरगड-दातेगड-पाटणच्या पश्चिमेस सुमारें ३ मैल, पाटण तालुका, सातारा जिल्हा.

२१ दंत पाटण-पाटण-साताऱ्याच्या दक्षिणेस सुमारें २५ मैल, पाटण तालुका, सातारा जिल्हा.

२२ वसंतदुर्ग-पाटणच्या पूर्वेस सुमारें २० मैल व कराडचे वायव्येस सुमारें ६ मैल. कराड तालुका, सातारा जिल्हा.

## सर्ग दुसरा

निजामाला जिंकण्यासाठीं पाठविलेल्या संताजी घोरपड्यादिकांनीं प्रथम निजामाचा पराभव करून नंतर त्याचे हत्ती घोडे व पुष्कळ द्रव्य हरण केलें. तेव्हां सर्व ऐश्वर्याचा नाश झाला आहे व सर्वांगावर शस्त्राच्या जखमा झाल्या आहेत असा तो खल कसाबसा जीव बांचवून पर्वताच्या पायथ्याशीं वसलेल्या करविरास गेला. ३०-३२

नंतर ते घोरपडे वगैरे लोक सचिवाजवळ गेले. ३२

तेव्हां त्यानें त्यांचा सत्कार केला. त्यांनींहि म्लेंच्छांशीं लढण्याचा निश्चय केला. ३३

सचिव आलेला ऐकून शिवराजानें सांभाळ केलेले पायदळाचे नायक आनंदानें एकत्र मिळाले. त्यापैकीं कांहींनीं किल्ले बळकाविलेले होते व कांहीं किल्ले घेण्याची इच्छा धरून होते. ३३-३४

कांहीं म्लेंच्छांशीं लढाई देण्यास उत्सुक झालेले होते कांहीं घोडदळांसह होते. ते सर्व आपापल्या अपराधांचें संमार्जन करण्याच्या हेतूनें त्या महात्म्या राजसाचिवाला शरण गेले. ३५-३६

नंतर त्यानें त्यांचा मानसन्मान केला. त्यांना आनंदित केलें व अभय देऊन त्यांची योग्य कार्यावर योजना केली. ३६-३७

नंतर म्लेंच्छरूपी उदधीचें शोषण करणारा जणुं अगस्त्य मुनीच अशा त्या हर्षित झालेल्या राजाच्या सचीवानें संतुष्ट मनानें आपल्या अतुल सैन्याकडे विलोकून सिंहें नांवाच्या वीराला जिंकण्याचें मनांत आणलें. ३८

राजाराम चरित्रकाव्याचा दुसरा सर्ग समाप्त.

---

२३ करवीर—कोल्हापूर— १६°४१' अक्षांश व ७४°१७' रेखांश. कोल्हापूर संस्थानाची राजधानी.

२४ औरंगझेबानें रायगड घेण्यास पाठविलेल्या झिंशोपसिंहालाच उद्देशून हें लिहिलें असावें.

## सर्ग तिसरा

याप्रमाणें रामराजाचा भाविवृत्तांत ऐकून इंद्र त्रिकालज्ञ नारदाला म्हणाला. १

हे महर्षे, वीरव्रतांत अशिक्षीत, सुकुमार, प्रवासांचे क्लेश न अनुभवलेला, मनूपासून आतांपर्यंत झालेल्या राजवंशांतील कोंवळा कोंब, सुरूप, राजलक्षणसंपन्न, प्रिय बोलणारा, लोकांचें प्रिय करणारा, जनतेला प्राणरूप असलेला, तेजस्वी, भाविविक्रम, केवळ त्याचा प्राणच असलेली अशी पट्टराणी, सिंहासन लालसेनें महीपालांचा पाडाव करणारा त्याचा पिता श्रीशिवछत्रपति व उज्वलउज्वल तेजाप्रमाणें चमकणारा भाऊ संभाजि यांच्या विरहित असलेला राजाराम, जिकडे तिकडे प्रजा लुटली जात असतांना, सर्वत्र चोरचोरटे कंटकाप्रमाणें पसरलेले असतांना व विपुल पावसानें मार्गांतील नद्या तुडुंब भरून गेल्या असतांनाहि कर्नाटकांत कसा गेला तें, हे महामुने, आम्हांस सांगा. २-८

नारदमुनी इंद्राला म्हणाले, हे महेंद्रा, राजाराम भूपालाचा कर्नाटकाचा विजयी प्रवास ऐक. ८-९

महाराजानें प्रधानपुरुषांबरोबर खलबत करून पन्हाळगडावरील वरप्रदायिनी दुर्गादेवीचे पूजनास नवरात्राच्या प्रतिपदेपासून आरंभ केला. ९-१०

तिच्या चरणावर माथा ठेवून देवीचें दररोज पूजन केलें. ११

आणि धूपदीपनीरांजनादि त्रिकालपूजेनें, नानाप्रकारचे नैवेद्य, त्याचप्रमाणें जप, ब्राह्मणभोजनें, नटनर्तकांचीं गाणीं, यौवन व मद यांनीं प्रमत्त झालेल्या अनेक सुंदर वारयोषितांचें अहोरात्र चालणारें नानाप्रकारचें नृत्यगायन, तसेंच विशेषेंकरून हातीं डमरू व गळ्यांत भयंकर मुंड धारण करणाऱ्या

---

२५ पाराशरगड– पन्हाळा–कोल्हापूरच्या ईशान्येस १२ मैल कोल्हापूर संस्थान.
२६ ता. ४ सप्टेंबर १६८९ बुधवार.

## सर्ग तिसरा

तुळजाभवानीच्या भक्तीनें आसक्त झालेल्यांचें तांडव, मंडळावर धावणारे शिरें तुटतांना ओरडणारे व तावडतोब स्वर्गारोहण करणारे सहस्रावधी बकरे व मेंढे यांचीं असंख्य बलिदानें त्याचप्रमाणें कुमारीपूजन साध्वी सुवासिनींचें पूजन व भोजन, नाना देशांहून आलेल्या बंदिजनांचा स्तुतिपाठ, आणि नानाप्रकारचे इतर देखावे वगैरेनीं त्या राजानें भवानीला संतुष्ट केलें. ११-१७

नंतर ती भक्तवत्सल भवानी स्वप्नांत येऊन त्या राजाला म्हणाली, " हे पुत्रा, भिऊं नकोस. बिल्वशाखेचें पूजन कर. १८

त्यायोगें सर्व विघ्नांचा नाश होईल व तुझा मनोरथ सफल होईल. तूं स्वतः विष्णूचा रामावतार आहेस यांत संशय नाहीं. १९

पूर्वी दर्भासनावर बसलेल्या त्वां दाशरथीनें रावणवधासाठीं माझी वरदायिनीची प्रार्थना केल्यावरून मीं तुला वर दिला व त्या प्रसादानें, हे महाबाहो, तूं रावणाला त्याच्या सैन्य व पुत्रांसह ठार मारलेंस. २०-२१

आतां हे कमलनेत्र महाराजा, माझ्या सामर्थ्यानें सतत अदृष्ट झालेला असा तूं वाटेल तेथें जा. २२

दुष्ट लोक तुला ओळखण्यास किंवा इजा करण्यास समर्थ होणार नाहींत" अशा रीतीनें मध्यरात्रीं भवानीनें त्या नृपाचें सांत्वन करून त्या राजाच्या समोर ती अंतर्धान पावली. २३-२४

नंतर त्या राजानें द्विजाग्रणींस तो वृत्तांत निवेदन केला. २४

द्विज म्हणाले, " तुला अभय आहे. देवीनें यथार्थच सांगितलें." तेव्हां राजानें बिल्वशाखाव्रत करण्यास ब्राम्हणांस आज्ञा केली. २५

श्री विद्वान केशवपंडिताकडून ब्राम्हण आचार्य व पुरोहित यांना निमंत्रित केलें आणि त्यांच्याकडून देवीचें बिल्वशाखाप्रबोधनव्रत विधियुक्त करविलें. त्यायोगें, हे इंद्रा, राजा अजिंक्य झाला. २६-२७

नंतर नवमीला राजानें सुस्नात होऊन व मंगलविधी करून जापक ब्राम्हणांच्या साहाय्यानें होमास प्रारंभ केला. गणपतीचें पूजन केल्यानंतर पुण्याहवाचन केलें. २७-२८

यज्ञांकण करून ब्राम्हणांनीं होमास आरंभ केला. होम संपतांच त्या मंत्रज्ञ राजानें ब्राम्हणांसह नृपतीस जयप्रद अशीं सुचिन्हें पाहिलीं. २९-३०

" आहुती दिली असतां ज्यावेळीं अग्नि धुरकट, ठिणगीयुक्त, मोठ्या रथासारखा आवाज करणारा, उजवीकडे ज्वाला असलेला, तेजस्वी, सुवर्णवर्ण, शुभाकार दिसतो त्यावेळीं मंडलाधिपति राजाचा मोठा विजय होतो असें समजावें. " याप्रमाणें ब्राम्हणांचें वचन ऐकून तो राजा प्रमुदित झाला. ३०-३२

नंतर पूर्णाहुती देऊन प्रज्वलित केलेल्या पवित्र अग्निमध्यें हत्तीच्या सोंडेसारखी मोठी तुपाची धार सोडली. ३३

ब्राम्हण स्वरपूर्वक मंत्रपठण करीत असतां, बंदिजनांचे पुढारी राजाची स्तुतिस्तोत्रें म्हणत असतां व मुख्य वारयोषिता नाच करीत असतां सर्व दिशा बधिर होऊन गेल्या होत्या. ३४-३५

अशारीतीनें होमाची समाप्ती झाल्यानंतर ब्राम्हणांचें भक्तिपुरःसर पूजन केलें व त्यांना यथायोग्य व स्वसामर्थ्याप्रमाणें दक्षिणा दिल्या. ३५-३६

नंतर महादेवाच्या मनाला प्रिय असणाऱ्या महादेवीची पुन्हां पूजा केली. पुन्हां स्तवन केलें व पुनः पुनः नमस्कार केला. भक्तांना अभय देणाऱ्या लोकजननीची क्षमा याचिली. ३६-३७

तुष्टपुष्ट अशा जनांसह विधियुक्त प्रायश्चित्त केलें. ३८

---

२७ ता. १३ सप्टेंबर १६८९ शुक्रवार.

नटनर्तकांच्या संघांना, वारयोषितांच्या तांड्यांना, सर्व स्तुतिपाठकांना व विशेषतः कवींना राजानें प्रीतिपूर्वक पुष्कळ द्रव्य व वस्त्राभरणें दिलीं. ३८-३९

अशारीतीनें लोकांच्या मनाला आनंद देणारा तो भवानीचा नवरात्र महोत्सव त्या चक्रवर्ति भूपतीकडून संकटविरहित विधियुक्त पार पडल्यामुळें तो राजा मनांत तोष पावला. ४०

श्रीमहाराजाधिराज महाराज छत्रपति राजारामचरित्रांतील केशवपंडितकृत नवरात्र महोत्सव नांवाचा तिसरा सर्ग समाप्त.

## सर्ग चवथा

नंतर प्रातःकाळीं राजानें आवश्यक विधी उरकून देवब्राम्हणांचें पूजन केलें व चतुर्विध अन्न सेवन केलें. १

आपण स्वतः गजावर आरूढ होऊन, अश्वारूढ झालेले मंत्री, मुख्य सेनापती, त्याचप्रमाणें दुसरे सेनानायक, पायदळ, पायदळांचे नायक, गजांवरून व अश्वांवरून लढणारे योद्धे, ब्राम्हण क्षत्रिय वैश्य शूद्रादि इतर लोकांसह, चांगलीं वस्त्रें धारण केलेले व जयमंगल घोष करणारे, वस्तादांनीं शिकविलेले व दोन्ही बाजूला भोंवरे असणारे वेगवान, सुंदर खोगिरांनीं युक्त, उंच व भूषित केलेले घोडे, भद्र मंद व मृग या जातींत उत्पन्न झालेले आणि झुलीनें व लोलक घंटादिकांनीं अलंकृत केलेले व तज्ञांनीं शिकविलेले असे मोठे हत्ती पुढें घालत असतां राजा विजयादशमीच्या सुमुहूर्तावर निघाला. २-६

ईशान्य दिशेस असलेल्या शमीवृक्षाचें व आपट्याचें विधिपूर्वक पूजन केल्यानंतर कवींनीं स्तुति केलेला असा तो महोत्साही व तेजस्वी आपल्या मंदिरांत गेला. ७-८

तेथें उदार अंतःकरणाच्या व प्रेमवर्धन करणाऱ्या स्त्रियांनीं त्याला नीरांजनांनीं ओवाळलें. स्त्रियांचें सांत्वन करित करित त्यानें तेथें रात्र घालविली. ८-९

तेव्हां कलिपुरुषानें पन्हाळगड घेण्यासाठीं पाठविलेले म्लेंच्छसेनापती तेथें आले व त्यांनीं गडाला वेढा घातला. राजानें म्लेंच्छसैन्यानें किल्ल्यास वेढा दिलेला पाहिला. ९-१०

परंतु त्या सर्वांना तुच्छ लेखून महान म्लेंच्छाचाहि नाश करणारा तो

---

२८ ता. १७ सप्टेंबर १६८९ शनवार.

राजा लोककल्याण करणाऱ्या शंकराजी नारायणाकडे कोरीगडास[२९]भोंवतालचा राज्याचा भाग सोंपवून व बाकी राहिलेलें राज्य त्या गूढबुद्धि राजानें रामचंद्रपंताच्या ताब्यांत दिलें. ११-१२

त्याच्या हाताखालीं संताजी, धनाजी व शंकराजी, आणि घोडदळाचे सेनापती व त्याचप्रमाणें पायदळाचे सेनापतीहि दिले. सामाकडे लक्ष देऊन तो गमनाचा विचार करूं लागला. १३-१४

तेव्हां द्विजाग्रणींना नानाप्रकारचीं दानें दिलीं. द्विजांनींहि आणि विशेषतः केशवादींनीं "स्वस्त्ययन" चिंतलें. १४-१५

नंतर पांथोचित वेष धारण करून त्या नृपसत्तमानें मंगलाशिर्वाद घेतला व गाईला प्रदक्षिणा घातली. नंतर तो नृपशार्दूल अयोध्यापती ज्याप्रमाणें वनवासास गेला त्याप्रमाणें तो निघाला. १५-१६

अग्रभागीं सेनापती व मागें शत्रूचें मर्दन करणारा मानसिंह, जणुं दुसरा प्रल्हादच असा हरिभक्त सुमतीमान नृपसेवातत्पर व सत्यप्रतिज्ञ प्रल्हादपंत, त्याचा हस्तक महाबुद्धिमान कृष्णाजी अनंत, त्याचप्रमाणें मोरोपंताच्या पुत्राला साजेल अशी बुद्धि व पराक्रम अंगीं असलेला सुमती नीळकंठ प्रधान व त्याचा धाकटा भाऊ, त्याच्या हाताखालीं वाढलेला व राजाच्या हितासाठीं झटणारा उद्धव नांवाचा सत्ववान हे महाराजांच्याबरोबर गेले. १७-२०

स्वामिसेवाविचक्षण, नृपहितांत सदा आसक्त, प्रियवक्ता व प्रिय करणारा असा नीळकंठ कृष्ण व दाल्भ्यऋषींनीं सांभाळ केलेल्या चंद्रसेनानुवंशीयांतील अग्रेसर खंडो बल्लाळ व इतर चित्रगुप्त कायस्थ, बाजी कदम व त्याचप्रमाणें खंडोजी कदम हे व दुसरे कित्येक, हे इंद्रा, राजाबरोबर गेले. २०-२३

---

२९ कोरीगड-पुण्याचे पश्चिमेस सुमारें ४० मैल, पौड खोरें, पौड तालुका, पुणें झा. भोर संस्थानांतील सुधागड तालुक्याच्या सीमेवर.

३० बहिरोपंत.

मोहित झालेल्या म्लेंच्छसेनापतींच्या रक्षकांनीं त्या घोड्यांवर बसून व परस्परांत मिसळून जाणाऱ्यांना ओळखलें नाहीं. २४

ते खिंकाळणारे व धावणारे घोडे मार्गांतील अनेक अडचणींतून जात असतांनाहि नृपप्रभावामुळें त्या दुरात्म्यांना दिसले नाहींत. २५

त्याचप्रमाणें श्रीरामराजाच्या प्रभावेंकरून त्याचे अनुयायी मार्गांतील उन्मार्गगामी गढूळ नद्याहि उतरून गेले. २६

उन्हाळ्यांत काळ्यामातीच्या क्षेत्रांतून चालूं न शकणारे असे ते घोडे ज्याप्रमाणें अंगणांतून चालावेत त्याप्रमाणें चिखलाच्या मार्गांतूनहि चालून गेले. २७

व्याघ्रादि हिंस्र पशु व त्याचप्रमाणें भयंकर सर्प त्या राजारामाच्या अनुयायांच्या दृष्टीसहि पडले नाहींत. २८

रामराजाच्या मागून जाणारे ते सर्व पुण्यशाली वाट चालत असतां त्यांना रात्र लहान वाटली. २९

उदयगिरीच्या शिखरावर सूर्य आल्यानंतर तो रामराजा स्वजनांसह कृष्णातीरीं पोहोंचला. ३०

त्याच्या शरिरासारखी सावळी असलेली ती कृष्णानदी पाहून तो आनंदित झाला व त्या वीरानें आपल्या परिवारासह तींत यथाविधि स्नान केलें. ३१

आपल्या देहाचें विडंबन करून पितृदेवांचें तर्पण केलें. नंतर ते राजाचे सर्व अनुयायी कृष्णानदी पार जाण्यास उद्युक्त झाले. ३२

प्रयत्न करूनसुद्धां त्यांना उतार सांपडला नाहीं. तेव्हां श्रीमान भूपवर आपल्या प्रभावानें प्रवर्तीत होऊन तुम्हीं माझ्या मागें या असें तो आपल्या नोकरांना म्हणाला आणि आपण सर्वांच्या पुढें होऊन तो राजा परतीराला गेला. ३३-३४

---

३१ कृष्णातीरीं—पन्हाळ्यापासून ५०—६० मैलांच्या टापूंतच कोठें तरी मुक्काम झाला असला पाहिजे. नक्की ठिकाण समजण्यास अद्याप साधन उपलब्ध नाहीं.

तेव्हां ज्यांच्या गुडघ्यापर्यंतच पाणी लागलें असे ते सर्व त्याच्या मागून गेले. ३५

याप्रमाणें म्लेंच्छराजानें रक्षित अशा त्या मार्गातून महाराजा जात असतां आपल्या सर्वप्रकारच्या लोकांसह तो पुन्हां एका मोठ्या नदीजवळ[३२] आला. तेव्हां कलिकंदाच्या अनुचरांनीं विचार केला कीं, राजा कलिपुरुषाच्या नाशार्थ कर्नाटक देशाला जात आहे व कुमतिमान म्लेंच्छराजा[३३] तर या बंड-शासनाला उत्सुक झालेला आहे. ३५-३७

तेव्हां जर या रामराजाच्या प्रवासांत आपण विघ्न न केलें तर आपण शत्रुपक्षाला मिळालों असें समजून तो आपला निश्चित नाश करील. ३८

अशाप्रकारें निश्चय करून त्यांनीं मार्गांत विघ्न करण्याचें ठरविलें. नंतर त्यांचा दैवहीन व द्रव्याभिलाषि सेनापती राजाचा उद्देश न जाणतां त्याचा पाठलाग करूं लागला. त्याच्या बुद्धिनुरूप विचार करणारे इतर सुद्धां तोच मार्ग स्वीकारूं लागले. ३९-४०

परंतु हेरांकडून त्यांच्या हालचालींची बातमी ऐकूनहि तो भीमपराक्रमी स्थिरबुद्धि व महातेजस्वी राजा धैर्यापासून चळला नाहीं. ४१

नंतर थोर अशा घोरपडे घराण्यांतील बहिरजी आपल्या मालोजी नांवाच्या भावासह श्रीराजाराम महाराजांच्या सेवेला धावला. ४२

हनुमानासारखा सामर्थ्यवान आपल्या सैन्यानें वेष्टित, राजारामाच्या चरणीं विनम्र व स्थिरभक्तिमान, महाबाहु, साहसी व शत्रूचें मर्दन करणारा असा तो राजाला म्हणाला कीं, "महाराजाच्या हितैषी अशा माझी व सचीव यांची सेवा घेऊन आपण कर्नाटकास चलावें. ४३-४५

मार्गांत जीं जीं विघ्नें उत्पन्न होतील तीं तीं तुमच्या प्रसादानें तुमच्याच चरणाचा आश्रय करून मी, हे विभो, निवारण करीन." ४५-४६

---

३२ बहुधा वर्धा नदी असावी. ३३ औरंगझेब.

नंतर ब्राम्हणांनीं परिवेष्टित असा तो राजाराम आपलें सैन्य व बाहिरजी यांसह ती मोठी नदी पार उतरून पुढचा मार्ग आक्रमूं लागला. ४६-४७

राजारामाला पकडण्याच्या इच्छेनें म्लेंच्छपतीच्या सैन्यपालांनीं आपल्या सैन्यांसह त्याच्या मार्गांतील सर्व वाटा रोखून धरल्या. ४७-४८

तेव्हां राजारामाचें प्रिय करण्याच्या इच्छेनें मदोद्धत झालेल्या महाराष्ट्रीय भालाइतांनींहि त्यांच्याबरोबर ठिकठिकाणीं युद्ध केलें. त्या महावीरांनीं त्या म्लेंच्छसेनानायकांबरोबर बहुत युद्ध केलें. ४८-४९

तेव्हां त्यांचें सैन्य मोठें असून आपलें अल्प आहे असें समजून आलें. ५०

जेव्हां ते चिंताविष्ट परिश्रांत व भुकेनें व्याकुल झाले आणि त्यांचीं वाहनें अगदीं थकून गेलीं तेव्हां राजारामाच्या प्रभावेंकरून धैर्यवान अत्यंत वीरबली महाबळी पराक्रमी व शिवराजानीं सांभाळ केलेले असे ते संताजी जगताप व रूपसिंह भोंसले आपल्या सैन्यासह उपकारांची फेड करण्यासाठीं पुढें सरसावले व महाराजास नमस्कार करून ते मधुर वाणीनें बोलले कीं, "युद्ध-लालसेनें उन्मत्त झालेले आततायी व कवचधारी म्लेंच्छ तुम्हांस जिंकण्याकरितां सर्व बाजूनें चालून येत आहेत. तेव्हां आम्हीं आमचे प्राण पणाला लावून त्यांच्यावर विजय मिळवूं. ५०-५४

तूं सर्वांचा राजा व सर्व जगताचा प्राण आहेस. तेव्हां, हे महाराजा, तूं त्या दुष्टबुद्धींच्या नजरेस न पडतां निघून जा." ५५

श्रीरूपसिंह व संताजी जगताप या दोघांचें हें भाषण ऐकून म्लेंच्छ सैन्यांनीं वेढलेल्या त्याला संतोष झाला. ५६

नंतर त्या दोघांचें म्लेंच्छाबरोबर महायुद्ध झालें. तें सर्व लोकांनीं पाहिलें व राजारामानेंहि पाहिलें. ५७

म्लेंच्छ सेना मोठी आहे असें पाहून तो भूमीपती राजा आधिरहित मनाशीं विचार करूं लागला. ५८

याच्याशीं युद्ध केल्यानें सांप्रत मला कोणती फलप्राप्ती होईल. कुभांडाचा पराभव करण्यासाठींच पृथ्वीतलावर सध्यांचा माझा अवतार झाला असल्यानें त्यास उचित अशीच मला मति धारण केली पाहिजे. युक्तिवादाच्या सांखळीनें कसें तरी यांना बांधिलें पाहिजे. ५९-६०

कर्नाटकाला त्वरित जाऊन मी मोठे उपाय योजीन. अशा प्रकारचा निश्चय करून त्या बुद्धिमान राजानें सैन्याच्या तोंडावर संताजीला ठेवून व व आपण रूपसिंहाला बरोबर घेऊन पुढें गेला. ६१-६२

गांव, गवळीवाडे, दुर्ग, खेडीं, खोऱ्यांतील खेडीं, चांडाळगृहें, वगैरे मागें टाकीत टाकीत राजा तुंगभद्रेच्या तीरावर पोहोंचला. ६२-६३

नदी अगाध आहे, म्लेंच्छ पाठीवर पुन्हां चालून येत आहेत व देशाचे अधिपतीहि दुष्ट आहेत असें जाणून राजा सेनापतीला असें म्हणाला कीं, ६३-६४

"हे महाबाहो रूपसिंहा, तूं एकटा असून शत्रू पुष्कळ आहेत. हा देश युद्धाला योग्य नाहीं. काल बलवान आहे. तरी तूं मनांत खेद न करितां माझ्याबरोबर चल." ६४-६५

राजानें असें सांगितलें असतांना सुद्धां तो क्षत्रधर्मपरायण व दृढव्रत रूपसिंह एक पाऊलहि ढळला नाहीं. ६६

तो राजाला म्हणाला, हे दयानिधे महाराज, तुम्ही अमानुषी राजे आहांत. तुम्हीं आपल्या इच्छेप्रमाणें निघून जा. ६७

सर्व जनतेचें पालन करा व स्वराज्य लवकरच प्राप्त करून घ्या. तुमच्याबरोबर मी आलों तर हे भूपति, यवनानीं वेढलेले आपले सर्व लोक निःसंशय नाश पावतील. ६८-६९

---

३४ तुंगभद्रेच्या तीरावर—मासिर-इ-आलमगिरीप्रमाणें मुमानगड व जारा या किल्ल्यांजवळ चकमक घडली असावी. परंतु 'जारा' हें नकलकारानें चुकीचें लिहिलें असावें व त्याबद्दल बंकापूरच्या पूर्वेस असलेलें 'हिरा' मुलुखांत असावें असें प्रो. सरकारचें मत आहे.

म्लेंच्छ सैन्यानें घेरलेल्या त्या राजानें रूपसिंहाचें हें भाषण ऐकून त्याचा पुन्हां गौरव केला. ६९-७०

नंतर जेव्हां राजानें परम आदरानें भवानी व महेश यांचें स्मरण केलें तेव्हां त्यांनीं अद्भुत रूप व वेष धारण केलेले द्विज व वैश्य असे दोघे व नंदीसारखा बैल आपल्यासमोर असलेला पाहिला. ७१

श्रीराजाराम महाराजांच्या यशोवर्णनाच्या काव्याचा केशवपंडितकृत चवथा सर्ग समाप्त.

## सर्ग पांचवा

आपले लोक म्लेंच्छसैन्यानें वेढले आहेत असें पाहून त्यानें त्या बैलाला आपल्या हातानें धरून समोर उभें केलें. १

त्या बैलाला स्पर्श करितांच तो त्या दुष्टात्म्यांस दिसेनासा झाला. बुद्धिवानांत श्रेष्ठ असा तो राजा बाहिरजीला म्हणाला कीं, २

" हे महावीर बाहिरजी, आपलें सर्व मंडळ म्लेंच्छांनीं वेढलें आहे. बाहेर पडण्यास मार्ग नाहीं. तरीहि मी यांतून निघून जाणार आहे. ३

हा वैश्य भृंगरिटि आहे. हा वृषभ नंदी आहे व हा शिवगण जयदेवसुत साक्षात् त्र्यंबकच आहे. शंकरांनीं मला मार्ग दाखविण्याच्या हेतूनें यांना पाठविलें आहे. ४-५

पूर्वी दाशरथीला संकट प्राप्त झालें असतां ज्याप्रमाणें मारुतीनें त्या त्या समयीं व कार्यांत साहाय्य केलें त्याप्रमाणें माझ्याठायीं भक्ति धरून असलेला व माझी सेवा करणारा असा, हे वीराग्रणी साधू, तूं आतां मला साहाय्य कर म्हणजे तुझें अवतारकृत्य खास प्रसिद्धीस येईल. ५-७

याप्रमाणें जेव्हां अद्भुत व पुरातन वृत्त राजानें बाहिरजीला सांगितलें तेव्हा तो वीर जाण्यासाठीं सिद्ध झाला. ८

सर्व बाजूस सबळ असे म्लेंच्छांचे मुख्य लोक उभे असतां व त्याचप्रमाणें मार्गांत संकटांचीं जाळीं पसरविलीं असतां तो शस्त्रधारी सनाथ आजानुबाहु साहसी अमितविक्रमी राजाला खांद्यावर घेऊन नृपतीस समयोचित अशा सर्व उपकरणांसह म्लेंच्छामधून निघून गेला. रामाच्या तेजानें वृद्धिंगत झालेल्या त्याला कसलाहि अडथळा झाला नाहीं. ९-११

आपण सर्व या म्लेंच्छसागरांतून कसे निसटूं व आपणांस राजाचे चरण पुन्हां केव्हां दृष्टीस पडतील या चिंतेनें व भयानें व्याकुळ झालेल्या राजाच्या सर्व अनुचरांनीं राजा जात असतां राजाचें कल्याण चिंतलें. १२-१३

नंतर त्या भिन्नमतवादींनीं आपलें मन घट्ट केलें आणि त्यांतील कांहींनीं कापडींचा म्हणजे यात्रेकरूंचा वेष धारण केला, कांहींनीं भिकाऱ्यांचा वेष घेतला. १४

दक्षिणेंतील लोकांनीं कांहींना दडवून ठेवलें ते तेथेंच राहिले. कांहींनीं बैराग्यांचा वेष घेतला, कांहीं व्यापारी बनले. १५

अशा रीतीनें ते सर्व राजारामाच्या प्रभावानें संकटसागरांतून तरून गेले. १६

राजारामहि सर्व सैन्यसागर ओलांडून श्रीबहिरजीसह तुंगभद्रा नदी ओलांडून गेला. तुंगभद्रेंत स्नान करून पितृदेवतांचें तर्पण केलें.

१६-१७

त्या नदीतीरावर बहिरजीनें ज्याचा थकवा घालविला आहे अशा त्यानें यथेच्छ भोजन केलें. १८

त्यावेळीं बहिरजीनें दाईचें नोकरांचें मित्राचें त्याचप्रमाणें स्नेहसंबंधीयांचें सर्व काम केलें. १८-१९

स्वादिष्ट अन्नांनीं, गोड पेयांनीं, मधुर व मनोरम अशा भक्ष्य पदार्थांनीं, तांबूल देऊन, गोड बोलून, त्याचप्रमाणें नानाविध खाद्यपदार्थांनीं व पदचर्यादि सेवा करून मार्गांतील क्लेश सहन करण्यास असमर्थ असलेल्या अशा आपल्या स्वामी महाराजाची त्यानें सेवा केली. १९-२१

जात असतां त्या आत्मसंयमी राजर्षीच्या मार्गांत त्यावेळीं सूर्याचे किरण अति तापदायक झाले नाहींत. २१-२२

भूमीनें आपल्या मार्दवानें, वाऱ्यानें थंड पाण्याच्या तुषारानें, आकाशानें आच्छादन धरून, त्याचप्रमाणें तरूंनीं आपल्या छायांनीं, ऋतूंनीं फलपुष्पांच्या योगानें त्या राजाची सेवा केली. २२-२३

मयूरांनीं आपल्या नाचानें, कोकिलांनीं आपल्या सुस्वर आलापांनीं व हरणांच्या कळपांनीं त्याचेभोंवतीं फिरून महीपतीचें मन रिझविलें. २४

गोवळ्यांनीं पाळलेल्या नानावर्णांच्या सुपुष्ट व सवत्स धेनू आपल्या दर्शनानें राजाचे श्रम हरण करित होत्या. २५

मार्गांत रामचरित्र गाणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुली आपल्या सुस्वरानें राजाचें मन हरण करित होत्या. २६

राजा आपली सीमा ओलांडून कधीं कधीं बहरजीसह कासीमखानाच्या असंख्य सेनेंत जाऊन राहात असे. २७

बाजाराच्या रस्त्यानें जात असतां, सैनिकांत मिसळला असतां, राजमार्गांत संचार करित असतांना, धनिक लोकांबरोबर संभाषण करित असतांनासुद्धां, सुंदर घोडे व विविध रत्नें विकत घेत असतांनाहि किंवा गरिब लोकांना अनुरूप संतुष्ट करणारें द्रव्य देत असतां महाराजाच्या प्रभावानें विमोहित झालेल्या दुरात्मा कासीमखानाच्या गुप्तपणें फिरणाऱ्या हेरांनींहि राजाला ओळखलें नाहीं. २७-३०

याप्रमाणें आपल्या इच्छेप्रमाणें व निर्भयपणें ग्रामांतून व शहरांतून गमन व शत्रूंच्या वीरांचें हनन करणाऱ्यास दुष्ट लोकांनीं ओळखलें नाहीं. ३१

रामावतारांत चवदा वर्षें सीता बरोबर असतांनासुद्धां तो त्याला वनवास भासला. ३२

परंतु या अवतारांत राजानें कित्येक दिवस एकट्यानेंच वनवास केला असतांनासुद्धां त्याला तो सुखोचित असाच झाला. ३३

नंतर तो धृतव्रत राजा आपल्या राज्याच्या सीमेवर असलेल्या अमूर नांवाच्या नगरांतील एका देवालयांत गेला. ३४

तेथें राहून महाराजानें ज्याचे श्रम श्रांत झाले आहेत, जो सर्व शूरांचें चित्त जाणणारा आहे अशा त्या महा बलवान बहिरजीला गुप्त हेराचा वेष देऊन

---

३५ अमूर–अंबूर–उ. अ. १२°४८' व पू. दे. ७८°४३' अंबूर दुर्ग हा अतिशय अवघड ठिकाणीं वसलेला आहे. –उत्तर अर्काट जिल्हा, मद्रास इलाखा.

बाजीराव काकड्याकडे पाठविलें. बहिरजीनें त्याचे समीप जाऊन राजाचें सैन्य व मंत्री यांसह पन्हाळ्याहून केलेल्या प्रयाणापासून तों तुंगभद्रेच्या तीरावर येईपर्यंतचा प्रवास म्लेंच्छांनीं केलेला त्यांचा पाठलाग व त्याचप्रमाणें प्रतिदिनीं झालेलें युद्ध वगैरे राजाचा सविस्तर वृत्तांत त्याचें मानस जाणण्याच्या इच्छेनें त्याला सांगितला. ३५-३८

"तूं छत्रपती महाराजाचा आवडता व केवळ त्यांचा बहिश्चर प्राणच आहेस ह्मणून तुला या देशांत ठेवलें आहे. तरी जर स्वामिभक्तिची इच्छा करित असशील तर आतां राजा आहे त्या ठिकाणीं माझ्याबरोबर चल." हे त्या ठिकाणीं बहिरजीचें वाक्य ऐकून 'बरें तसें असो' असें तो ह्मणाला. ३९-४०

त्याचें निष्कलंक मन व त्याचप्रमाणें त्याची स्वामिभक्ति जाणून "माझ्याबरोबरचे लोक येथेंच आहेत" असें तो त्याला म्हणाला. ४१

त्यांतील एक 'द्विज' आहे त्याला भेटून मीं पुन्हां तुझेजवळ परत येतों तोंपर्यंत तुझे सर्व सैनिक सज्ज ( कवचबद्ध ) होऊं दे. ४२

असें बोलून तो राजाजवळ आला व त्यानें घडलेलें सर्व वृत्त सांगितलें. तेव्हां तें ऐकून राजा म्हणाला, "त्याला येथें सत्वर घेऊन ये." ४३

बहिरजी पुन्हां त्याच्याजवळ गेला व म्हणाला, "महाराज आले आहेत असें माझे हेर सांगत आहेत. तरी तूं त्यांच्या दर्शनाला नजराण्यासहित सत्वर चल." तेव्हां त्याच्या सैन्यांतील कांहीं ओळखीच्या लोकांनीं त्या महापराक्रमी बहिरजीला त्याच्या तरवारीवरून व शब्दावरून ओळखलें आणि ते सर्व नमस्कारालिंगन वगैरे देऊन भेटले. ४४-४६

त्याचें हें वाक्य ऐकतांच तो ससैनिक उठला आणि म्हणाला, "हे मित्रा, माझे स्वामीमहाराज सांप्रत कोठें आहेत?" ४७

तें ऐकून सर्वांना जगत्पती दाखविण्यासाठीं हातीं खंजीर घेतलेला तो बहिरजी पुढें होऊन म्हणाला. ४८

"या देवळ्यांत महाराज आहेत. सत्वर चला." या वाक्यामृतानेंच संतुष्ट झालेली काकडे वगैरे मंडळी वीरोचित तीन्हीहि गुणांनीं

युक्त अशा महाराजाला प्रधानांप्रमाणें त्याचे समोर भूमीतलापर्यंत शीर लववून नम्रतेनें व पुढें बहुमोल नजरनजराणे टेवून प्रणाम करिती झाली. ४९-५१

शत्रूचें दमन करणाऱ्या राजानें कांहींसह बोलत, कांहींशीं स्मित करून व कांहींवर नुसता दृष्टिक्षेप टाकून तेथें जमलेल्या त्या सर्व वीरांची संभावना केली. ५१-५२

स्वस्त्यागमनसूचक असे नानाप्रकारच्या वाद्यांचे ध्वनी व बंदुकांचे मोठमोठे आवाज महाराजानीं काढविले. ५२-५३

ज्याप्रमाणें धर्मराजाच्या आगमनानें इंद्रप्रस्थवासीयांनीं महोत्सव केला त्याप्रमाणें तेथील लोकांनीं व रहिवाशांनीं महोत्सव केला. ५३-५४

त्यायोगें वृद्धिंगत झालेलें स्वराज्य प्राप्त झाल्यामुळें सर्व लोकांनीं वंदित असा तो राजा प्रतिपदेच्या चंद्राप्रमाणें कलानीं वाढूं लागला. ५४-५५

याप्रमाणें श्रीभोंसलेवंशाचा तिलक श्रीराजारामप्रभु महाबळी दिल्लीशानें पर्वतासारखीं विघ्नें उत्पन्न केलीं असतांहि सर्व म्लेंच्छांना श्रीविष्णूच्या तेजानें मोहित करून त्यांचा पराभव करण्यासाठीं कर्नाटकांत विजयी होऊन राहिला आहे. ५६

श्रीमन्महाराजाधिराज महाराज छत्रपति राजारामाच्या काव्यचरित्रांतील केशवपंडितकृत पांचवा सर्ग समाप्त.

# शुद्धिपत्रक

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| 11 | 11 | followed | was followed |
| 13 | 7 | inspire | have inspired |
| १९ | २० | घोरपडे | मोरे |
| ३ | ६ | सात | बेचाळीस |
| २९ | २० | परशुरामोसौ | परशुरामोऽसौ |
| ३० | ९ | दुरात्मनः | दुरात्मना |
| ३० | १४ | द्विजस्स्वप्ने | द्विजः स्वप्ने |
| ३१ | २ | तवाज्ञाविहितः | तवाज्ञाविहिता |
| ३१ | ६ | शक्तिर्महेंद्रादि सुरेष्वपि | शक्तिर्महेंद्रादिसुरेष्वपि |
| ३१ | १० | दमन | दमने |
| ३१ | २० | हरेरंशं | हरेरंशः |
| ३१ | २४ | सोपनेष्यति | सोऽपनेष्यति |
| ३१ | २७ | प्रश्रयेण वद० | प्रश्रयेणावद० |
| ३२ | ५ | स्वार्य | स्वीयं |
| ३२ | १४ | महत्त मति० | महत्तमति० |
| ३२ | १५ | समयोस्माकं | समयोऽस्माकं |
| ३२ | २१ | शौर्योदार्यगुणापेते | शौर्यौदार्यगुणोपेते |
| ३२ | २९ | रामचंद्राख्य सचिवे | रामचंद्राख्यसचिवे |
| ३२ | ३० | राज्यांगाविकलं | राज्यांगाविकलः |
| ३३ | ६ | प्राप्स्यसि | प्राप्स्यति |
| ३३ | १२ | ततो ब्रवी० | ततोऽब्रवी० |
| ३३ | १४ | हरेश्चतुर्थोवतारो | हरेश्चतुर्थोऽवतारो |
| ३३ | १६ | स्वीयैर्गते | स्वीये गते |
| ३३ | २४ | शौर्यधैर्यादि गुणा० | शौर्यधैर्यादिगुणा० |
| ३४ | १३ | हर्षोस्माकं | हर्षोऽस्माकं |
| ३५ | १३ | दीनमनाभवत | दीनमनोऽभवत् |
| ३५ | १६ | म्लेंच्छ नायकै० | म्लेंच्छनायकै० |
| ३५ | २४ | महाराजोधुना | महाराजोऽधुना |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३५ | २८ | सर्वेतं | सर्वे तं |
| ३६ | १० | लुठितं | लुंठितं |
| ३६ | १० | दुरात्मभि। | दुरात्मभिः। |
| ३६ | १८ | परशु पूर्वे | परशुपूर्वे |
| ३६ | १८ | प्रशशंसह | प्रशशंस ह |
| ३६ | २३ | श्री सचिवः | श्रीसचिवः |
| ३६ | २९ | बंदीकृत्य गम० | बंदीकृत्यागम० |
| ३७ | ४ | संत घोरफडा० | संतघोरफडा० |
| ३७ | ६ | गजाश्वादि धनं | गजाश्वादिवनं |
| ३७ | ६ | तद्वारणात् | तदा रणात् |
| ३८ | १९ | महेंद्र | महेंद्र |
| ३९ | २० | किमुधर्षितुम् | किमु धर्षितुम् |
| ४० | ६ | प्रदक्षिणा० | प्रदक्षिण० |
| ४० | ८ | मंडलाधिपते राज्ञा० | मंडलाधिपतेर्राज्ञा० |
| ४० | २८ | भूपति चक्रवर्ती | भूपतिचक्रवर्ती |
| ४१ | ५ | बुभुजेन्नं | बुभुजेऽन्नं |
| ४२ | ४ | केशवाद्यै० | केशवाद्यै० |
| ४२ | २१ | पुरंदरम् | पुरंदर |
| ४२ | २९ | मार्गे गच्छ० | मार्गेऽगच्छ० |
| ४३ | ५ | अथोदयाद्रि तिल० | अथो दयाद्रितिल० |
| ४४ | ९ | भगवत्पाद० | भवत्पाद० |
| ४४ | ३० | वचस्तु तोषो० | वचस्तुतोषो० |
| ४९ | ९ | पुनरायाति | पुनरायामि |
| ५५ | १३ | बृहस्पतीलाहि शोभणारे | बृहस्पतीच्या नीतीला धरून असणारे |
| ५६ | १४ | झालेल्या अशा या राज्याचें | झालेलें असें हें राज्य |
| ५९ | १२ | रामचंद्र | रामचंद्रपंत |
| ६२ | १० | संभाजि | संभाजी |

# भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें.

## विक्रयालयशाखा

(३१३, सदाशिव, पुणें २.)

या शाखेचे विद्यमानें खालील व इतर खास **ऐतिहासिक मालांचीं** पुस्तकें विकत मिळतील.

१ भा. इ. सं. मंडळ—**स्वीयग्रंथमाला.**

२ भा. इ. सं. मंडळ—**पुरस्कृत ग्रंथमाला.**

३ **श्रीशिवचरित्रकार्यालयाचे** ग्रंथ.

४ कै. राजवाडे—**'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें'** (उपलब्ध खंड)

५ कै. खरे—**'ऐतिहासिक लेखसंग्रह'.**

६ **'पेशवे दप्तरांतील निवडलेले कागद'** ह्या हल्लीं चालू झालेल्या नवीन मालेचीं पुस्तकें, वगैरे वगैरे.

### याशिवाय

या शाखेमार्फत सभासद व इतर मागणीदारांचे सोईसाठीं ऐतिहासिक व वाङ्मयिक ग्रंथ **शोधपूर्वक मिळवून** पाठविण्यांत येतील. प्रत्येक ऑर्डरीबरोबर निदान निम्मी रक्कम पाठविली पाहिजे.